
ऑफिसमधील कर्मचारी दगदगीत आणि काळ...
असतात की त्यांच्यापैकी तर फारच थोडेजण जनतेविषयी सहानुभाव

...रच्या सामाजिक आर्थिक

# शासनसंस्था आणि व्यक्ती

## बर्ट्रांड रसेल

१८६७.
ग्रं. सं. ठाणें
निबंध
१५२६



REFBK-0015936

...खुरलेल्या स्वरूपातील नुकसानी-
...होतो. अशा प्रकारच्या कारणांमुळे सरकारला चलनवाढ थोपविणे कठिण जाते आणि जे सरकार चलनवाढीविरुद्ध उपाययोजना करते ते सरकार अप्रिय होण्याची शक्यता असते. सर्वसामान्य जनतेचे हितच केवळ डोळ्यापुढे ठेवून एखादे सरकार प्रामाणिकपणे प्रयत्न करते, तेव्हा समाजांतील प्रत्येक गटाला, ते मुद्दामच दुष्टपणाने आपल्या हिताकडे दुर्लक्ष करीत आहे असे वाटण्याचा धोका असतो. लोकशाहीमध्ये जसजशी सरकारी नियंत्रणाची कोटी वाढत जाते तसतशी ही अडचण वाढतच जाते. आणि त्याउपर

म्हणजे गैरवाजवी आशा बाळ...
पैलूविषयी मी आधी एके...
सरकारी अधिकारी आणि ज...
पैलूविषयी बोलणार आहे. आ...
सत्ता राबवितात त्यांचे, म्हण...
कार्यालयातील कनिष्ठ नोकर...
संबंध असतात. आणि हे हित...
असतातच असे नाही. ज...
सत्तेची लालसा आणि काम...

बर्ट्रांड रसेल

# शासनसंस्था आणि व्यक्ती

रीथ व्याख्यानमाला : १९४८-१९४९

भाषांतर

सुमन देवदत्त दाभोलकर

REFBK-0015936

पुणे

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

प्रकाशन क्रमांक : ३८

पहिली आवृत्ती : ऑगस्ट, १९६७

(इंग्रजी पहिली आवृत्ती : १९४९)

भाषांतरित आवृत्तीचे हक्क : © समाज प्रबोधन संस्था
इतर हक्क : जॉर्ज ॲलेन ॲंड अनविन लि०, लंडन

संपादन : वसंत पळशीकर

मुखपृष्ठ : बाळ ठाकूर

किंमत ३ रुपये

प्रकाशक :
शंकरराव देव
समाज प्रबोधन संस्था
४३०-३१ शनिवार, पुणे २

मुद्रक :
वि० पु० भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

Published by arrangement with
George Allen and Unwin,
40, Museum Street, London, U. K.

## प्रास्ताविक टीप

या व्याख्यानांची पूर्वतयारी करीत असताना माझी पत्नी पॅट्रिशिया हिच्या मोलाच्या साहाय्याचा लाभ मिळाला. केवळ तपशीलांबाबतच नव्हे, तर सर्वसाधारण सिद्धांत आणि आजच्या परिस्थितीशी घालावयाची त्यांची सांगड—याही बाबतींत हे साहाय्य मिळाले.

सामाजिक संघट्टन व मनुष्यस्वभाव १
सामाजिक संघट्टन आणि शासन-यंत्रणा २१
व्यक्तिमत्त्वाचे कार्य ४४
तांत्रिक ज्ञान आणि मानवी प्रकृतिधर्म यांतील संघर्ष ६५
नियंत्रण व उपक्रमशीलता यांची कार्यक्षेत्रे ९६
व्यक्तिगत व सामाजिक नीतिमत्ता ११९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७७०१२ वि: १ निबंध
क्रमांक १७२६ नों: दि: २०।११।६०

व्याख्यान पहिले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५९३६
ग्रंथ शाखा (स्थळप्रत)

# सामाजिक संघट्टन व मनुष्य-स्वभाव

या व्याख्यानमालेत मी एका मूलभूत प्रश्नाचा विचार करणार आहे. प्रगतीसाठी आवश्यक इतक्या प्रमाणात व्यक्तिगत उपक्रमशीलता आणि मनुष्यजातीच्या जीवनरक्षणासाठी आवश्यक इतक्या प्रमाणात संघट्टन यांचा एकमेकांशी मेळ आपल्याला कसा घालता येईल हा तो प्रश्न होय. सामाजिक सहकार शक्य करणाऱ्या मनुष्य-स्वभावातील विशिष्ट प्रेरणा मी प्रथम विवेचनासाठी घेईन. मानवी संस्कृतीच्या प्रारंभकाळच्या आदिम जाति-समाजांमध्ये या प्रेरणांच्या आविष्काराने कोणती वेगवेगळी रूपे घेतली त्याचा विचार प्रथम करू या. आणि त्यानंतर समाजाला प्रगल्भावस्था प्राप्त होत असताना संथ गतीने बदलत गेलेल्या समाज-संघटनांमुळे त्या रूपांमध्ये कसेकसे फेरफार होत गेले त्याचा विचार करू या. हा विचार करून झाल्यानंतर मी प्रथम वेगवेगळ्या ऐतिहासिक काळांमध्ये आणि समाजांमध्ये आढळून येणाऱ्या सामाजिक संघट्टनाची व्याप्ती व सघनता किती होती

याचा विचार करीन. तदनंतर आज अस्तित्वात असलेल्या समाजांच्या संदर्भात सामाजिक संघट्टनाची व्याप्ती व सघनता यांचा विचार करीन, आणि, शेवटी, नजीकच्या भविष्यकाळात सामाजिक संघट्टनाच्या विकासाची दिशा कोणती राहाण्याची शक्यता आहे त्याचा विचार करीन. समाजाला एकसंध राखणाऱ्या या विविध शक्तींचे विवेचन केल्यानंतर मग मी समाज करून राहाणाऱ्या मानवाच्या, व्यक्तिगत उपक्रमशीलता या दुसऱ्या अंगाचा विचार करीन. मानवी जीवनाच्या उत्क्रांतीच्या वेगवेगळ्या अवस्थांत व्यक्तिगत उपक्रमशीलतेने आजवर केलेले कार्य, आज ती बजावीत असलेले कार्य, आणि व्यक्तींची किंवा गटांची उपक्रमशीलता वाजवीपेक्षा जास्त किंवा वाजवीपेक्षा कमी होण्याच्या दृष्टीने भविष्यकाळातील शक्यता यांचा विचार आपण करू. एवढे झाल्यानंतर सध्याच्या काळातील एका मूलभूत प्रश्नाचा मी ऊहापोह करीन. आधुनिक उत्पादनतंत्राने संघटना आणि मानवी स्वभाव यांच्यांत निर्माण केलेला संघर्ष हा तो प्रश्न होय. मानवी स्वभावातील निर्मितीची आणि स्वामित्वाची—या दोन मूलभूत प्रेरणांपासून आधुनिक अर्थव्यवहारामागील प्रेरक हेतूंची झालेली फारकत, अशीही दुसऱ्या शब्दात या प्रश्नाची मांडणी करता येईल. हा प्रश्न पुढे मांडल्यानंतर तो सोडविण्यासाठी आपल्याला काय करता येईल याचा विचार मी करीन. आणि शेवटी व्यक्तिगत विचार, कृती आणि प्रतिभा यांचा समाजाच्या अधिसत्तेशी असलेला संबंध याचा नीतिशास्त्रांतील एक प्रश्न या दृष्टीने विचार करीन.

समाज करून राहणाऱ्या सर्व प्राणिमात्रांच्या–अर्थात मनुष्याच्याही –गटात आढळून येणारे सहकार्य व ऐक्य यांना काही प्रमाणात सहजप्रवृत्तीत आधार सापडतो. मुंग्या आणि मधमाशा यांच्यामध्ये ही सहजप्रवृत्ती पुष्कळशी पूर्णत्वाला गेलेली असते. मुंग्या आणि मधमाशा

आपल्या वारुळांतील किंवा पोळ्यातील समाजाशी सदैव एकनिष्ठ असतात. त्यांचे चित्त विचलित होत नाही आणि समाजविघातक कृत्ये करण्याचा त्यांना कधीच मोह पडत नाही असे दिसते! सामाजिक कर्तव्याला वाहिलेली अशी अविचल निष्ठा ही काही एका मर्यादेपर्यंत कौतुकास्पद आहे, परंतु अशा अविचल निष्ठेतही काही उणीवा अनुस्यूत आहेत. मधमाशा आणि मुंग्या कुठल्याही थोर कलाकृतीची निर्मिती करीत नाहीत, किंवा शास्त्रीय शोध लावीत नाहीत, किंवा 'सर्व मुंग्या ह्या एकमेकांच्या भगिनी आहेत' अशी शिकवणूक देणारा धर्मही प्रस्थापित करीत नाहीत! त्यांचे सामाजिक जीवन हे यांत्रिक, कमालीचे आखीव आणि गतिशून्य असते. उत्क्रांति-क्रमातील अशा रुद्धगतिक अवस्थेतून मुक्ती पावण्याची किंमत म्हणून मानवी जीवन-प्रवाह प्रसंगी उच्छृंखल–रौद्र असणे आपण इष्ट मानले आहे.

उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या अवस्थेतील मनुष्य हा एक दुर्बल व दुर्मिळ प्राणी होता. प्रागैतिहासिक काळात केव्हातरी त्याचे पूर्वज झाडावर रहाण्याचे सोडून देऊन खाली उतरले आणि त्यात आपल्या पायाच्या अंगठ्याचा हूकसारखा उपयोग करण्यापासून मिळणारे फायदे गमावून बसले. परंतु त्या जागी त्यांना हात व पाय यांचा लाभ झाला. आतापर्यंत जंगलातच वस्ती करून राहाणे त्यांना भाग होते, त्यापासून या बदलामुळे त्यांची सुटका झाली. परंतु अरण्यातून बाहेर पडून ज्या मोकळ्या मैदानात येऊन हे मानवी प्राणी राहू लागले त्या मैदानात त्यांना आफ्रिकेतील जंगलातल्या इतका अन्नाचा भरपूर पुरवठा मिळेनासा झाला. सर आर्थर कीथ यांच्या मते आदिमानवाच्या अवस्थेत माणसाला स्वत:पुरते अन्न मिळविण्यासाठी प्रत्येकी दोन चौरस मैलांच्या प्रदेशाची जरुरी भासत असे. या विषयांतील इतर काही अधिकारी व्यक्तींच्या मते आदिमानवाला या-

पेक्षाही अधिक प्रदेशाची जरूरी लागत असे. आजही अस्तित्वात असलेल्या मानवसदृश उच्चतम वानरजातींच्या आणि प्राचीनतम आदिम जमातींच्या उदाहरणांवरून आदिमानव अगदी लहान लहान गट करून रहात असावा असे वाटते. एकेक गट एखाद्या विशाल कुटुंबापेक्षा फार मोठा नसावा—म्हणजे सरासरी पन्नास ते शंभर व्यक्ती एकेका गटात असत असा अंदाज करता येईल. प्रत्येक गटात अंतर्गत सहकाराची भावना पुष्कळ प्रमाणात असावीसे दिसते. परंतु आपल्याच सजातीय अशा इतर गटांविषयी मात्र, संबंध येई त्यावेळी, शत्रुत्व प्रकट होई. जोपर्यंत मनुष्यप्राणी दुर्मिळ होता तोंपर्यंत इतर गटांशी संबंध क्वचितच येत असे आणि बहुतेक वेळा असा संबंध येणे फारसे महत्त्वाचे नसे. प्रत्येक गट आपापल्या प्रदेशात रहात असे आणि इतर गटांशी फक्त सीमा-प्रदेशातच संघर्ष उद्भवत. त्या प्राचीन काळात लग्ने गटातील व्यक्ति-व्यक्तींतच मर्यादित होतीसे दिसते. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात जात्यंतर्गत उत्पत्ती होत असणार. आणि मानव-प्रकार (व्हरायटीज) एकदा निर्माण झाले की त्यांची पैदास कायम होत असण्याची शक्यता बरीच असणार. जर एखाद्या गटाची वाढ झाली आणि त्यांना त्यांचा भू-प्रदेश अपुरा पडू लागला, तर शेजारच्या प्रदेशातील गटांशी त्यांचे झगडे होण्याची शक्यता असे. आणि अशा झगड्यात जात्यंतर्गत उत्पत्तीमुळे जो गट जीवशास्त्रीय दृष्ट्या अधिक उच्च श्रेणीचा बनला असेल, त्या गटाचा विजय होत असणार. त्यामुळे जीवशास्त्रीय दृष्ट्या हितकारक प्रकार टिकून त्याची वाढ होत गेली असेल अशी अपेक्षा आपण बाळगू शकतो. हे सर्व सर आर्थर कीथ यांनी मोठ्या प्रभावीपणे मांडून दाखविले आहे. मानव या संज्ञेस जेमतेम पात्र होतील असे आपले पूर्वज ह्या सर्व गोष्टींची विचारपूर्वक योजना करून वागले नसतील; सहजप्रवृत्तीच्या अबोध प्रक्रियेद्वाराच ह्या

गोष्टी घडल्या असणार. गटातील सर्व व्यक्तींची एकमेकांशी मैत्री व गटाबाहेरील व्यक्तींशी विरोधाची भावना ही त्या प्रक्रियेची दोन अंगे होत. प्राचीन टोळ्या इतक्या छोट्या छोट्या होत्या की प्रत्येक व्यक्तीला दुसरी प्रत्येक व्यक्ती अगदी चांगली माहितीची असणार. मैत्रीची भावना व एकमेकाशी ओळख या दोन गोष्टी त्या-वेळी अभिन्न असणार असे आपणास म्हणता येते.

सर्व सामाजिक गटांत कुटुंब हा गट अधिक बलिष्ठ आणि सहज-प्रवृत्तींनी घनिष्ठपणे बांधलेला होता आणि अजूनही आहे. मनुष्य-प्राण्यांमध्ये बाल्यावस्था दीर्घकाळ टिकत असल्यामुळे कुटुंबव्यवस्था अत्यंत आवश्यक बनते. तसेच, लहान मुलांच्या आईला त्यांना सोडून खाद्यपदार्थ गोळा करण्यास बाहेर जाणे अवघड असते. ह्या गोष्टींमुळेच मनुष्यप्राण्यांत कुटुंबाला पिता अत्यावश्यक ठरला. ही परिस्थिती बहुतेक जातीच्या पक्ष्यांमध्येही याच कारणास्तव दिसून येते. ह्यामुळेच अन्नासाठी पुरुषांनी शिकार करावयाची व बायकांनी घरी राहावयाचे अशी कामाची विभागणी अस्तित्वात आली असावी. शिकार करतांना परस्परांचा सहकार असला तर शिकार अधिक चांगली होऊ शकते, या वस्तुस्थितीशी कुटुंबप्रधान रचना लहान टोळीप्रधान रचनेत रूपांतरित झाल्याची ऐतिहासिक घटना संबंधित असावी. आणि अत्यंत प्राचीन काळापासून या लहानलहान टोळ्यांतील एकात्मतेची वाढ व विकास होण्यास त्यांचा इतर टोळ्यांशी चालणारा संघर्ष उपकारक ठरला असावा.

अगदी प्राथमिक अवस्थेतील मानवप्राणी व मानवसदृश सस्तन प्राणी यांचे पुरेसे अवशेष सध्या उपलब्ध आहेत. त्यांच्यावरून उत्क्रांतीतील निरनिराळ्या अवस्थांचे—मानवसदृश उच्चतम वानरजातीं-पासून अतिप्राचीन आदिमानवापर्यंतचे—पुरेसे सुस्पष्ट चित्र आपल्या

डोळ्यांसमोर उभे राहाते. मानवाचेच आहेत याविषयी ज्या अवशेषांबद्दल निःसंशय खात्री आहे असे आजवर सापडलेले अवशेष साधारणतः दशलक्ष वर्षांपूर्वीचे आहेत असा अंदाज केला गेला आहे. परंतु त्या आधी काही दशलक्ष वर्षे झाडावरून खाली येऊन जमिनीवर रहाणाऱ्या मानवसदृश वानरजाती अस्तित्वात होत्या असे दिसते. मानवाच्या या पूर्वजांची उत्क्रांतीतली श्रेणी ठरविण्याची विशेष कसोटी मेंदूचा आकार ही आहे. मेंदूचा आकार उत्क्रांतीच्या प्रारंभीच्या अवस्थांमध्ये बऱ्याच जलद गतीने वाढून सध्याच्या आकाराएवढा झाला; त्यानंतरच्या हजारो, लाखो वर्षांत मात्र हा आकार जवळजवळ तेवढाच राहिला आहे. ह्या लक्षावधी वर्षांत मानवाच्या ज्ञानात वाढ झालेली आहे, त्याने संपादिलेल्या कौशल्यांमध्ये भर पडली आहे. समाजसंघटनेतही प्रगती झालेली आहे. परंतु, आपणांस आज यासंबंधी जेवढे ज्ञान आहे त्यावरून पहाता, त्याच्या उपजत बुद्धिमत्तेत भर पडलेली दिसत नाही. सापडलेल्या मानवी सापळ्यांवरून जेथवर अंदाज बांधता येतो तेथवर, अशा प्रकारची केवळ जीवशास्त्रीय उत्क्रांती फार वर्षांपूर्वीच पूर्ण होऊन चुकली आहे असे दिसते. त्यावरून असा निष्कर्ष निघतो की आपली सध्याची उपजत बुद्धिमत्ता पॅलिऑलिथिक मानवापेक्षा विशेष भिन्न दर्जाची नाही. आपणांस याविषयी जे शिकवले जाते, त्यापेक्षा वस्तुस्थिती अशी उलट आहे. असे दिसते कीं प्रज्ञेचा उदय होण्यापूर्वीच्या काळात ज्या सहजप्रवृत्तींनी माणसाला लहानलहान टोळ्या करून राहण्यास प्रवृत्त केले, (ज्यावेळी टोळीतील सर्वांशी सख्य व टोळीबाहेरील इतर सर्वांशी शत्रुत्व असा अत्यंत परस्परविरोधी जीवनक्रम माणसाचा होता) त्याच सहजप्रेरणा आजही आपणात वास करीत आहेत असे दिसते. त्यानंतरच्या काळात झालेल्या बदलांमागील चालकशक्ती काही अंशी सहजप्रवृत्तीच्या प्राचीन

आधारातून व काही अंशी सामूहिक हिताच्या—बहुतेक वेळा अबोध व क्वचित प्रसंगी अस्फुटशा प्रकट—जाणीवेतून आलेली आहे. विवेकाच्या बैठकीवर सहजप्रवृत्तीतून स्फुरणाऱ्या वर्तणुकीहून निराळी वर्तणूक काही एका मर्यादेपर्यंत करता येते. मानवी सामाजिक जीवनात ताण निर्माण करणाऱ्या गोष्टींपैकी ही शक्यता ही एक गोष्ट आहे. परंतु जेव्हा अशा आचारामुळे सहजप्रवृत्तींवर फारच ताण पडतो तेव्हा निसर्ग आपला सूड उगवून घेतो; व्यक्ती पिचून तरी जाते किंवा विध्वंसक तरी बनते. आणि यापैकी कोणतीही एक गोष्ट विवेकाधिष्ठित समाजरचना ढासळण्यास कारणीभूत होऊ शकते.

सामाजिक संघट्टन हे गटातील एकमेकांविषयीच्या निष्ठेतून निर्माण झाले. शत्रूविषयीच्या भीतीच्या भावनेने ते अधिक दृढ बनले. हळूहळू अंशतः नैसर्गिक व अंशतः विचारपूर्वक प्रक्रियांमुळे स्वाभाविक संघट्टनाची व्याप्ती वाढत जाऊन सध्या आपण ज्याला राष्ट्र म्हणून ओळखतो अशा विशाल गटापर्यंत ते येऊन ठेपले आहे. ही विकासाची घटना घडून येण्यासाठी पुष्कळ वेगवेगळ्या प्रवृत्तींचा हातभार लागला आहे. अगदी प्राथमिक अवस्थेत गट-निष्ठेला नायकावरील निष्ठेमुळे बळकटी आली असली पाहिजे. एखाद्या मोठ्या गटातील सर्वजण एकमेकांस पुष्कळदा ओळखत नाहीत. तेथेही त्यांच्या टोळीचा मुख्य किंवा राजा हा गटातील सर्वांना ओळखीचा असू शकतो. टोळीनिष्ठेमुळे मर्यादित संख्येचा गट होऊ शकतो, तर नायकावरील व्यक्तिगत स्वरूपाच्या निष्ठेमुळे सहजप्रवृत्तीला धक्का न लावताही गटाच्या आकारात वाढ करणे या प्रकारे शक्य होते.

मानवजात एका विशिष्ट अवस्थेला पोहोचल्यानंतर नवीन विकास दिसून आला. अगदी प्रारंभीच्या अवस्थेत लढाईला सर्वस्वी कत्तलीचे स्वरूप होते. कालांतराने, हळूहळू काही प्रमाणात तरी, लढाई ही

जिंकून घेण्यासाठीची लढाई झाली. हार पावलेल्या लोकांना ठार करण्याऐवजी त्यांना गुलाम करण्यात येऊ लागले. जेत्यांच्या सेवेसाठी त्यांना राबविण्यात येऊ लागले. हे सुरू झाल्यानंतर कुठल्याही समाजात दोन प्रकारचे लोक दिसू लागले; एक त्या समाजातील मूळचे लोक, त्यांनाच स्वातंत्र्य उपभोगता येत असे आणि त्यांच्यामध्येच फक्त टोळीविषयी निष्ठा आढळे. आणि दुसरे गुलाम, जे केवळ भयामुळे आज्ञापालन करीत होते, परंतु ज्यांच्या मनात गटाविषयी सहजप्रवृत्तीतून स्फुरणारी निष्ठा नसे. उदाहरणार्थ, निनेव्हे आणि बॅबिलोन या शहरांची साम्राज्ये विस्तीर्ण होती. या साम्राज्यांतील प्रजाजनांना राज्यकर्त्या शहरवासी समाजाविषयी सामाजिक एकात्मतेची सहजस्फूर्त भावना वाटत नव्हती. त्यांना या शहरांच्या युद्धप्राविण्याबद्दल दहशत वाटत असे. आणि केवळ त्या दहशतीमुळे ह्या दोन शहरांचे इतके विस्तीर्ण साम्राज्य चालू शकले. त्या प्राचीन काळापासून ते आजपर्यंत युद्ध हेच एखाद्या समाजाचा विस्तार करण्याचे प्रमुख साधन राहिले आहे. आणि टोळी-निष्ठेऐवजी भय हाच वाढत्या प्रमाणात सामाजिक एकात्मतेचा स्रोत बनलेला आहे. हे परिवर्तन फक्त साम्राज्यांतर्गत मोठ्या समाजांपुरतेच मर्यादित नव्हते. स्पार्टासारख्या लहानशा शहर-राज्यातही स्वतंत्र नागरिक अल्पसंख्यच होते. आणि बहुसंख्य हेलॉटस्‌वर अतिशय निर्घृणपणे दडपशाहीचा वरवंटा फिरविण्यात येत असे. अतिशय प्रशंसनीय सामाजिक संघटन असलेले राज्य म्हणून प्राचीन काळी स्पार्टाची संभावना होत असे; आत्यंतिक भयामुळे वरकरणी सर्व समाज राज्यांशी एकनिष्ठ दिसत असे; एरवी ह्या संघटनात स्पार्टाच्या सर्व लोकांचा स्वेच्छापूर्वक अंतर्भाव करण्याची भाषा नव्हती.

मानवी समाजाच्या विकासाच्या पुढल्या अवस्थेत एका नवीन

प्रकारच्या निष्ठेची वाढ होऊ लागली. एकाच प्रदेशातील वा एकाच वंशाचे या गोष्टीवर ही निष्ठा आधारलेली नव्हती, तर समान धर्म हा त्या निष्ठेचा आधार बनला. पश्चिमी राष्ट्रांपुरतेच पहिले, तर अशा प्रकारच्या निष्ठेची सुरुवात ऑर्फिक समाजापासून झालेली दिसते; या समाजांनी गुलामांना स्वतंत्र नागरिक म्हणून दर्जा दिला. हे ऑर्फिक समाज सोडल्यास, प्राचीन काळी समाजांमध्ये धर्म आणि शासन या दोन गोष्टी एकमेकांशी अत्यंत घनिष्ठ प्रकारे सलंग्न होत्या. समान जीवनशास्त्रीय आधारावर विकसित आलेल्या गटांमधील सभासदांचा धर्मही सामान्यतः एकच असे. परंतु एकसांप्रदायित्व हा हळूहळू गटनिष्ठेचा अधिकाधिक शक्तिमान आधार बनत गेला आहे. अशा प्रकारच्या संप्रदायनिष्ठेची युद्ध करण्याची शक्ती केवढी मोठी असू शकते हे सातव्या आणि आठव्या शतकांत इस्लामधर्माने मिळविलेल्या विजयांमुळे दिसून येते. 'क्रुसेड्स' या नावाने प्रसिद्ध असलेली इस्लामी व ख्रिश्चन धर्मीयांतील युद्धे आणि नंतरच्या काळात युरोपात धर्मावरून झालेली युद्धे यांच्या पाठीमागची मोठी प्रेरक शक्ती धर्मनिष्ठा हीच होती. सोळाव्या शतकात पुष्कळदा धर्मनिष्ठेला राष्ट्रनिष्ठेपेक्षा अग्रहक्क दिला जाई. उदाहरणार्थ, इंग्लिश कॅथॉलिकच पुष्कळदा प्रॉटेस्टंट स्वदेशाविरुद्ध कॅथॉलिक स्पेनची बाजू घेत असत, आणि फ्रेंच प्रॉटेस्टंट ह्यूजेनॉटस कॅथॉलिक फ्रान्सच्या विरोधात प्रॉटेस्टंट इंग्लंडची बाजू घेत असत. आजच्या काळात सार्वत्रिक प्रसार पावलेल्या दोन संप्रदायनिष्ठांमध्ये जगातील बहुसंख्य जनता विभागली गेली आहे. ह्यापैकी एक संप्रदायनिष्ठा साम्यवादाची आहे, आणि या संप्रदायाला अत्यंत कडवी श्रद्धा आणि प्रमाण 'धर्मग्रंथ' यांमुळे मोठी शक्ती लाभते. दुसरी संप्रदायनिष्ठा कमी प्रमाणभूत आहे, परंतु सामर्थ्यात उणी नाही. त्या संप्रदायनिष्ठेला 'अमेरिकन जीवनपद्धती' असे

म्हणता येईल. अनेक निरनिराळ्या देशांतील लोकांनी तेथे जाऊन वस्ती केली आणि त्यातून आजच्या अमेरिकन राष्ट्राची घडण झालेली आहे. त्यामुळे त्या राष्ट्राला जीवशास्त्रीय एकात्मता नाही, परंतु तरीही युरोपियन राष्ट्रांइतकीच उत्कट ऐक्यभावना त्या राष्ट्रातही आढळते. ॲब्राहम लिंकनने म्हटल्याप्रमाणे "अमेरिका हे एका आदर्श कल्पनेला वाहिलेले राष्ट्र आहे." अमेरिकेत रहावयास जाणाऱ्या निर्वासितांच्या पहिल्या पिढीत युरोपच्या भावनाविवश आठवणी पुष्कळदा निघतात. परंतु त्यांच्या मुलांना बहुतेक करून अमेरिकेतील जीवनपद्धती युरोपातील जीवनापेक्षा अधिक आवडते. आणि अमेरिकन जीवनपद्धतीचा सर्व जगभर प्रसार झाला तर मानवजातीचे कल्याण होईल यावर त्यांची पूर्ण श्रद्धा असते. अमेरिकेत आणि रशियात संप्रदाय-निष्ठेमुळे निर्माण झालेले ऐक्य आणि राष्ट्रीय ऐक्यभावना यांचा संयोग झाल्यामुळे दोन्ही संप्रदायनिष्ठा अधिकच बलवान झालेल्या आहेत. परंतु या प्रतिस्पर्धी संप्रदाय-निष्ठांचे आकर्षण त्यांच्या त्यांच्या राष्ट्रांच्या सीमा ओलांडून गेले आहे. इतर राष्ट्रांतील लोकांनाही या संप्रदाय-निष्ठांनी आकृष्ट केलेले आहे.

आजच्या युगातली आपली विशाल गटांना वाहिलेली निष्ठा ही, लहान टोळ्यांच्या काळात राहाणाऱ्या गटनिष्ठा निर्माण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्याच मानसशास्त्रीय क्लृप्तीचा उपयोग करते. आणि ही निष्ठा त्या क्लृप्तीचा उपयोग करून घेते या घटनेत, या निष्ठेचे सामर्थ्य आणि आंतरिक समाधान देण्याची शक्ती या गोष्टींचा मूलस्रोतही आहे. मानवाच्या मेंदूचा आकार सध्याच्या आपल्या माहितीच्या आकाराएवढा झाला, त्या काळापासून तो आजपर्यंत माणसाच्या जीवनप्रकृतीत मूलतः काही विशेष फरक झालेला नाही. वेगवेगळे धर्म किंवा शिक्षण यांची शिकवणूक आणि प्रचार व आर्थिक-सामाजिक

संस्था मानव उत्क्रांत होत असल्याबद्दल ग्वाही देतात ती खरी नाही. मित्र आणि शत्रू असे मानवजातीचे दोन गट पाडण्याची आपली सहजप्रवृत्ती असते. मित्रांशी वागताना आपण सहकाराचे नीतितत्त्व मानतो. विरोधकांशी वागताना मात्र स्पर्धातत्त्वावर आपले वर्तन आधारित असते. परंतु हे मित्र–व–शत्रु–गट एकसारखे बदलत असतात. एका क्षणी माणसाला आपल्या धंद्यात आपल्याशी चढाओढ करणाऱ्या माणसाचा द्वेष वाटतो. परंतु दुसऱ्या क्षणी, जेव्हां दोघांनाही साम्यवादाची किंवा इतर बाहेरील शत्रूंची भीती वाटते, तेव्हा त्याच माणसाविषयी त्याच्या मनात बंधुभावना निर्माण होते. एकदा आपण कुटुंबाची परिसीमा ओलांडली की त्या पलिकडील समाजाचे संघट्टन परक्या शत्रूच्या भयातूनच साधते. परक्याचे भय ही अशी आपल्याला इतरांशी संघट्टन करावयास प्रवृत्त करणारी शक्ती आहे. सुरक्षिततेच्या काळात आपण आपल्या शेजाऱ्याचा द्वेष करून चालण्यासारखे असते. संकटकाळात आपल्याला त्याच्यावर प्रेम करावे लागते. सर्वसामान्य काळात, बसमध्ये शेजारी-शेजारी जी माणसे योगायोगाने बसतात, ती एकमेकांवर प्रेम करीत नाहीत. परंतु गेल्या महायुद्धाच्या काळात बॉंब-हल्ल्याच्या दिवसांत त्याच लोकांनी एकमेकांचा प्रेमाने संभाळ केला.

समाजात प्रभावीपणे एकात्मता निर्माण व्हावयाची असेल तर ‘परक्यांचे भय’ वाटेल अशी स्थिती असावी लागते, या घटनेमुळे जागतिक ऐक्याचा प्रश्न बिकट बनतो. कारण सर्व जगाचे जर एकच राष्ट्र बनले, आणि ते जर स्थिर होऊ शकले, तर ज्याचे भय बाळगावे असा शत्रूच त्या राष्ट्राला उरणार नाही; आणि संघट्टनास उद्युक्त करणाऱ्या भय या शक्तीच्या अभावी ते राष्ट्र कोलमडून पडण्याचा संभव निर्माण होईल. बौद्ध धर्म आणि ख्रिश्चन धर्म या दोन थोर

धर्मांनी, स्वतःच्या जमातीविषयी वाटणारी स्वयंस्फूर्त सहकाराची भावना सर्व मनुष्यमात्राविषयी वाटावी इतकी व्यापक करण्याचा प्रयत्न केला. विश्वबंधुत्वाच्या भावनेचा त्यांनी प्रचार केला. 'बंधुत्व' या शब्दाच्या उपयोगाने मूलतः रक्ताच्या नात्याची भावना व्यक्त होते. हे बंधुत्वाचे नाते या नैसर्गिक परिघाच्या पलीकडे नेण्याचा प्रयत्न या दोन धर्मांनी केला. आपण सर्वजण जर देवाची लेकरे असू तर आपण सर्व एकाच कुटुंबातील आहोत. व्यवहारात मात्र असे घडले की या तत्त्वावर श्रद्धा असणाऱ्या लोकांनी स्वधर्मीयांनाच तेवढे ईश्वराची लेकरे मानले आणि इतरांची संभावना सैतानाची अवलाद म्हणून केली. अशा रीतीने आपल्या जमातीबाहेरील लोकांविषयी शत्रुत्वाची भावना असणे या जुन्या प्रक्रियेचे पुनरुज्जीवन झालेले दिसून येते. या द्वेषभावनेमुळे धर्म अधिक बलिष्ठ झाला आणि धर्म-निष्ठेला एक कडवी धार आली. पण या धारेत सापडून धर्माचा प्रवाह मूळ हेतूपासून विचलित झाला. धर्म, नीतितत्त्वे, आर्थिक स्वहितदृष्टी, मनुष्यप्राण्यांचे अस्तित्व निसर्गसृष्टीत टिकून रहावे म्हणून जरूर असणारी धडपड, या सर्व दृष्टिकोनांतून विचार केला तर जागतिक सहकाराची अत्यंत जरुरी आहे, हे निर्विवादपणे बुद्धीला आकलन होईल. परंतु टोळी करून राहणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या काळापासून वारशाने चालत आलेल्या आपल्या सहजप्रवृत्ती वरील विचाराविरुद्ध बंड करून उठतात. कुणाचाच द्वेष जर करता येत नसेल, तर आयुष्यात फारशी चव रहाणार नाही; अमक्या-तमक्या नादान, हलकट माणसावर प्रेम करणारा माणूस हा क्षुद्र जंतू असला पाहिजे; कलह हेच जीवनाचे सूत्र आहे, आणि ज्या जगात, सर्वजण सर्वांच्यावर प्रेम करतात, त्या जगात, जीवनात काहीच स्वारस्य उरणार नाही, अशा प्रकारच्या प्रतिक्रिया माणसांच्या मनांत निर्माण होतात. तेव्हा,

मनुष्यमात्राचे ऐक्य कधीकाळी साधायचे असेल, तर आपल्या अंतर्यामी बऱ्याचशा अबोधरूपाने वास करणाऱ्या, प्राचीन काळात जिची मुळे आहेत अशा, परक्याविषयीच्या हिंस्र भावनेला यशस्वी बगल देण्याचा मार्ग आपल्याला शोधला पाहिजे. हे साध्य करण्यासाठी काही प्रमाणात आपल्याला कायद्याचे राज्य निर्माण करावे लागेल आणि काही प्रमाणात स्पर्धात्मक सहजप्रवृत्तींच्या अविष्कारासाठी निरुपद्रवी वाटा मोकळ्या करून देण्याची योजना करावी लागेल.

हा प्रश्न सोपा नाही आणि केवळ नीतिकल्पनांच्या आधारे तो सोडविता येणे शक्य नाही. मनोविश्लेषणशास्त्राच्या सिद्धांतात काही अतिशयोक्तीचा भाग आहे आणि काही खुळचट गोष्टींचाही समावेश त्यात झालेला आहे त्यात शंका नाही. असे असले तरी त्या शास्त्राने माणसांविषयीची बरीच मौलिक सत्ये उजेडात आणली आहेत. आपल्याकडे अशी एक जुनी म्हण आहे की मनुष्यस्वभावाला काही औषध नाही. मनोविश्लेषणशास्त्र म्हणजे या म्हणीवरील सविस्तर मल्लिनाथीच आहे. नैसर्गिक प्रेरणांना फार विरोधी जाणाऱ्या जीवनामुळे निर्माण होणाऱ्या ताणांचे परिणाम हे, निषिद्ध मानल्या गेलेल्या प्रेरणांच्या अत्युपभोगामुळे होणाऱ्या परिणामांइतकेच घातक असू शकतात ही गोष्ट आपण आता जाणतो. एका मर्यादेपलिकडे निसर्गनियमांना झुगारून देऊन जगण्याचा जेव्हा माणसे प्रयत्न करू लागतात तेव्हा त्या माणसांची मने कुढी, मत्सरग्रस्त आणि कमालीची असहिष्णु बनण्याची शक्यता असते. अशा वेळी त्यांच्या जीवनपटात क्रौर्याच्या रेषा उमटू लागतात, किंवा त्यांचे जीवन इतके नीरस होते की त्यांच्यात कोणतीही कृती करण्याची शक्ती रहात नाही. अर्वाचीन सुसंस्कृत समाजांशी अचानक संबंध आलेल्या रानटी जमातींत ह्या दुसऱ्या प्रकारचा परिणाम आढळून आलेला आहे. पापुआ बेटावरील

एका प्राचीन जमातीमध्ये टोळीबाहेरील शत्रूचा शिरच्छेद करून त्यांची कवटी हस्तगत करणे ही पुरुषाच्या आयुष्यातली गौरवाची गोष्ट मानली जाते. नररुंडमाला जमविणे ही त्या जमातीतील वीरपुरुषांची महत्त्वाकांक्षा असते. गोऱ्या लोकांच्या वर्चस्वाखाली आल्यापासून शिरच्छेदाची ही पारंपरिक मृगया बंद पाडण्यात आली. ह्या पापुअन जमातीतील पुरुषांच्या जीवनातली रगच संपली आणि त्यांना जगण्यातच रस वाटेना, असा या बंदीचा परिणाम झाला, असे मानवसंस्कृतिशास्त्रज्ञांनी वर्णन केले आहे. त्यांना शिरच्छेदाचा खेळ खेळून माणसांची मुंडकी जमविण्याची मुभा द्यावयास हवी होती असे मला म्हणावयाचे नाही; परंतु मला असे जरूर म्हणावयाचे आहे की त्याची जागा घेऊ शकेल असा दुसरा एखादा निरुपद्रवी खेळ त्यांच्यासाठी शोधून काढण्याचे परिश्रम मानसशास्त्रज्ञांनी घ्यावयास हवे होते. आजच्या सुसंस्कृत माणसाची परिस्थितीही काही अंशी सद्‌गुणाला बळी पडलेल्या पापुअन जमातीतल्या माणसासारखी आहे. आपल्यांत अशा अनेक वेगवेगळ्या आक्रमक आणि सर्जनशील प्रेरणा आहेत की ज्यांच्या बाबतीत आपल्या मनाप्रमाणे वागण्यास समाजाने बंदी घातलेली आहे. फुटबॉलचे सामने आणि फ्रीस्टाइल कुस्ती या खेळांवर त्या प्रेरणांची गरज भागवून घेण्यास समाज भाग पाडतो, पण त्यांनी या प्रेरणांचे पूर्ण समाधान होऊ शकत नाही. एक दिवस या जगातून युद्धे नाहीशी करता येतील अशी आशा जो कोणी बाळगीत असेल त्याने आपल्या अनेक पिढ्यांच्या रानटी अवस्थेतून वारशाने चालत झालेल्या प्रेरणांचे निरुपद्रवी रीतीने समाधान करण्याच्या प्रश्नाचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. माझ्या स्वतःच्या बाबतींत, गुप्तहेरांच्या रहस्यकथा वाचून माझ्या आक्रमक प्रेरणांचे पुरेसे समाधान होते. मी आलटूनपालटून कधी खुनी इसमाशी तादात्म्य पावतो, तर कधी

गुन्हा शोधून काढणाऱ्या गुप्तहेराशी समरस होतो. परंतु मला माहीत आहे की काहीजणांना डिटेक्टिव्ह कादंबऱ्यांमधून मिळणारे समाधान फारच मिळमिळीत वाटेल. अशा लोकांसाठी काहीतरी अधिक जालीम खाद्य पुरविले पाहिजे.

स्पर्धेशिवाय सर्वसामान्य माणसे सुखी होऊ शकतील असे मला वाटत नाही. कारण आदिमानवाच्या कालापासून सर्व महत्त्वाच्या व्यवहारांची स्पर्धा हीच मुख्य प्रेरक शक्ती राहिलेली आहे. म्हणून आपण मानवी जीवनातून स्पर्धा नाहीशी करण्याचा प्रयत्न करू नये; ती फार अपायकारक असणार नाही याची तेवढी खबरदारी घेतली पाहिजे. दुसऱ्याला आणि त्याच्या कुटुंबियांना ठार मारण्यात कोण आधी यशस्वी होतो याविषयीच प्रामुख्येकरून प्राचीन स्पर्धा चालत असत. आधुनिक काळातील युद्धे म्हणजे याच प्रकारच्या स्पर्धेचा दुसरा आविष्कार आहे. परंतु खेळांच्या सामन्यातील किंवा वाङ्मयाच्या क्षेत्रातील किंवा कलेच्या क्षेत्रातील स्पर्धा किंवा घटनात्मक राजकारणातील स्पर्धा बरीचशी निरुपद्रवी असते. आणि तरीही या स्पर्धेने माणसातील विजिगीषु लढाऊ वृत्तीस मात्र एक पुरेशी समाधनकारक वाट मिळते. अशा प्रकारची स्पर्धा हानिकारक आहे हा खरा यावरील आक्षेप होऊ शकत नाही, तर सर्वसाधारण स्त्री-पुरुषांच्या आयुष्यांत अशा प्रकारच्या स्पर्धेला क्वचितच अवसर मिळतो ही खरी अनिष्ट गोष्ट आहे.

युद्ध सोडले तर आधुनिक सुसंस्कृत समाजाने अधिकाधिक सुरक्षित जीवनाचे ध्येय समोर ठेवल्याचे दिसते. परंतु मानवी जीवनात धोका, संकट म्हणून काही उरले नाही म्हणजे मानवजात सुखी होईल अशी खात्री मला मुळीच वाटत नाही. या ठिकाणी मला सर आर्थर कीथ यांच्या 'न्यू थिअरी ऑफ ह्यूमन इव्होल्यूशन' या पुस्तकातील एक उतारा उद्धृत करावासा वाटतो.

“रानटी नीतीच्या राज्यात राहणाऱ्या आदिवासी जमातीत जाऊन राहून आलेले लोक, ते आदिवासी तशा परिस्थितीतही कितीतरी सुखी असल्याच्या हकीकती सांगत असतात. उदाहरणार्थ, श्रीमती फ्रेया स्टार्क यांनी दक्षिण अरेबियाविषयी खालीलप्रमाणे लिहिले आहे. ‘सुरक्षितता ही गोष्ट मुळात माहीत नसलेल्या दक्षिण अरेबियाच्या भागात मी प्रवास केला. तेथील लोक दरोडेखोरी आणि पैशासाठी धाकदपटशा यांनी ग्रस्त असलेल्या आपल्या रोजच्या आयुष्याबद्दल तक्रार करताना आढळले. आणि तरीही पृथ्वीच्या पाठीवरील अन्य कोठल्याही समाजापेक्षा त्यांचा जीवनाविषयीचा दुर्दम्य उत्साह व आनंद कमी नव्हता.’ डॉ. एच्. के. फ्राय यांनीही ऑस्ट्रेलियन आदिवासींविषयीचा याच आशयाचा आपला अनुभव नमूद केला आहे. ‘रानटी मनुष्याचे जीवन सदैव धोक्यात असते; त्याच्या आजूबाजूस नेहमी त्याच्या जिवावर उठलेल्या शक्ती असतात. परंतु तरीही तो समाधानी, निश्चिंत आणि आनंदी असतो. स्वतःच्या मुलांचे तो लाड करतो आणि वृद्ध मातापित्यांशी प्रेमळपणाने वागतो.’ माझे तिसरे उदाहरण मी अमेरिकेतील ‘क्रो इंडियन्स’ या जमातीतून घेतले आहे. डॉ. आर्. लौरी यांनी या जमातीचे आज पुष्कळ वर्षे निरीक्षण केले आहे. सध्या हे लोक एका सुरक्षित प्रदेशात सुरक्षित जीवन जगतात. डॉ. लौरी म्हणतात, ‘कुठल्याही क्रो इंडियनला विचारा की आताची सुरक्षितता आणि पूर्वीचे असुरक्षित, धोक्याचे जीवन यापैकी तो काय पसंत करील. तर तो असे म्हणेल की, पूर्वीचे धोकामय जीवनच हवेसे वाटते, कारण त्या जीवनात एक रोमांचकारी पुरुषार्थ होता.’ अर्थात या ठिकाणी मी असे धरून चाललो आहे की वर वर्णन केल्यासारख्याच रानटी परिस्थितीत मानवजातीच्या उत्क्रांतीतील प्रारंभिक अवस्थेतील सारा काळ मानव राहत होता. ज्या काळात

रक्ताचा बदला रक्ताने घेणे हीच सामान्य नीती होती, अशा रानटी परिस्थितीतच माणसाचे व्यक्तिमत्त्व आणि स्वभाव घडलेला आहे."

लोकांच्या काही प्रकारच्या प्रतिक्रियांचे मला पहिल्या महायुद्धाच्या वेळी जेव्हा प्रथम भान झाले तेव्हा मी तरी निदान चकित झालो होतो. पण वरील उताऱ्यातील आदिवासींच्या प्रतिक्रियांतून मानवी मनोव्यापारांचे जे दर्शन घडते त्यातून मला चकित करणाऱ्या त्या गोष्टींचा उलगडा होतो. युद्धाचा आघात त्यांच्या व्यक्तिगत जीवनांवर फारच प्रत्यक्ष व दारुण रीतीने पडलेला नसेल तर शांततेच्या काळापेक्षा युद्धकाळात पुष्कळ माणसे अधिक उत्साही असतात. संथ, निर्विघ्न आयुष्याची दुसरी बाजू फार कंटाळवाणी असू शकते. चार लक्ष वर्षांपूर्वी मानवाच्या ज्या प्रेरणांना अन्नाच्या शोधात, किंवा आपल्या शत्रूंची मुंडकी उडविण्यात, किंवा वाघापासून स्वतःचा बचाव करण्याच्या प्रयत्नात, भरपूर वाव मिळत असे, त्या प्रेरणा आजच्या धोपटमार्गी जीवन कंठणाऱ्या, माफक उत्पन्न मिळविणाऱ्या आधुनिक सज्जन नागरिकाच्या जीवनात तशाच उपाशी राहातात. परंतु जेव्हा युद्ध सुरू होते तेव्हा एखाद्या बँकेतील कारकुनाला स्वतःच्या कंटाळवाण्या जीवनातून स्वतःची सुटका करून घेता येते व युद्धात शौर्य गाजविण्याची संधी मिळते. आणि मग त्याला आपण आपल्या नैसर्गिक प्रेरणांशी प्रामाणिक असे जीवन प्रथमच जगत आहोत असा प्रत्यय येतो. परंतु आपल्यातील विध्वंसक प्रेरणांच्या समाधानासाठी विज्ञानाने आज आपल्या हाती उपलब्ध करून दिलेली साधने दुर्दैवाने फारच शक्तिशाली आहेत. यामुळे अशा प्रेरणांना पूर्ण मोकळीक देणे ही गोष्ट, माणूस लहानलहान टोळ्या करून रहात होता त्या काळात मानवसमाजाच्या विकासक्रमात उपयोगी ठरली असली, तरी आजच्या काळात तिला मुक्त वाव देण्याने उत्क्रांतीशी संबद्ध अशा

कोणत्याही हेतुपूर्तीस त्याचा उपयोग होण्याची सुतराम शक्यता नाही. आपल्या बेछूट प्रेरणांना लगाम घालण्याच्या प्रश्नाचा फारच थोडा अभ्यास केला गेलेला आहे. परंतु जसजशी वैज्ञानिक तंत्रविद्या प्रगत होत जात आहे, तसतसा हा प्रश्न अधिकाधिक निकडीचा होऊ लागला आहे. निवळ जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास विध्वंसक तंत्रविद्या सर्जनशील तंत्रविद्येपेक्षा इतक्या अधिक वेगाने वाढली आहे ही एक दुर्दैवी घटना होय. आज एका क्षणात एक माणूस पाच लाख लोकांना ठार करू शकतो. परंतु एक नव बालक जन्मास घालण्यासाठी प्राचीन काली जितका काल लागत असे तितकाच आजच्या युगातही लागतो. शत्रूच्या पाच लाख माणसांना अण्वस्त्राच्या साहाय्याने जितक्या जलद गतीने ठार करता येते, तितक्याच जलद गतीने पाच लाख बालके एका माणसाला निर्माण करता आली असती, तर क्लेशाच्या मापाने महाभयंकर किंमत द्यावी लागली असती तरी, मानवजातीचे जीवितसंरक्षण करण्याच्या जीवशास्त्रीय समस्येचे उत्तर आपण 'जगण्यासाठीचा संघर्ष व 'श्रेष्ठत्वाची सरशी' या प्रक्रियांवर सोपवू शकलो असतो. परंतु उत्क्रांतीसाठी आजच्या आधुनिक जगात आपल्याला 'सजातीयाचे मित्रत्व—परक्याचे शत्रुत्व' या जुन्याच प्रक्रियेवर अवलंबून राहता येणार नाही.

यामुळे केवळ सुरक्षितता निर्माण करण्याचे मार्ग शोधणे एवढाच समाजसुधारकांच्या पुढील प्रश्न नाही. कारण समजा, सुरक्षितता प्रस्थापित करण्याचे मार्ग सापडले पण त्या मार्गांनी जाऊन माणसांच्या सहजप्रवृत्तींचे गाढे समाधान झाले नाही तर मग साहस गाजविण्याच्या रोमांचासाठी ही सुरक्षितता माणसे दूर फेकतील. मानवजातीच्या जीवितरक्षणासाठी आवश्यक तेवढी सुरक्षितता निर्माण करीत असतानाच त्याबरोबर सुसंस्कृत जीवनाशी सुसंवादी अशा पद्धतीने साहस, झगडा

आणि स्पर्धा या प्रेरणांनाही वाव राहील, अशी रचना कशी करावयाची हा प्रश्न आपल्याला सोडवावयाचा आहे. हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना आपण सदैव हे लक्षात ठेवले पाहिजे की, आपली जीवनपद्धती, आपल्या सामाजिक संस्था आणि आपले ज्ञान यात काळाच्या ओघात जरी मूलभूत व आमूलाग्र बदल झालेले असले तरी आपल्या पूर्वजांच्या मेंदूचा आकार आजच्याएवढा झाल्यापासून आजपर्यंतच्या लाखो वर्षांच्या काळात मानवाच्या सुष्ट-दुष्ट दोन्ही सहज-प्रवृत्ती जशाच्या तशा राहिल्या आहेत. ह्या प्राचीन आदिप्रेरणा आणि आजचे सुसंस्कृत समाजजीवन यांचा मेळ घालणे सर्वस्वी अशक्य आहे असे मला वाटत नाही. वेगवेगळ्या परिस्थितीशी मिळते-जुळते घेऊन नाना प्रकारचे सांस्कृतिक रचनाबंध माणूस निर्माण करतो हे मानववंशशास्त्रज्ञांनी केलेल्या निरनिराळ्या जमातींच्या अभ्यासावरून दिसून येते. परंतु कोठल्याही मूलभूत प्रेरणेला संपूर्णतः दडपून टाकून सुसंवाद निर्माण करणे शक्य होईल असे मला वाटत नाही. ज्या जीवनात साहसाला वाव नाही ते जीवन असमाधानी राहण्याची शक्यता आहे, परंतु ज्या जीवनात कोणत्याही वेड्यावाकड्या साहसाला मुभा आहे ते जीवन अल्पायुषीच राहाणार यात शंका नाही.

पूर्वीचे ‘ रोमांचकारी पुरुषार्थी आयुष्य ’ आता अनुभवावयास मिळणार नाही याची खंत करणाऱ्या रेड इंडियनाचा मी थोड्या वेळापूर्वी उल्लेख केला. त्याने ह्या समस्येच्या मर्मावर अचूक बोट ठेवलेले आहे असे मला वाटते. जीवनात काहीतरी विशेष ‘ रोमांचकारी ’ असावे अशी हौस प्रत्येक उत्साही व्यक्तीला असते. सिने-तारका, सुप्रसिद्ध खेळाडू, सेनापती आणि कदाचित काही थोडे राजकारणी पुरुष यांना प्रकाशात ‘ तळपण्याची ’ संधी मिळू शकते. परंतु असे लोक फारच थोडे असतात. इतर सर्वांना मात्र दिवास्वप्नातच समाधान मानावे लागते.

कोणी स्वतःला लोकप्रिय देखण्या सिनेनटाच्या रूपात पाहील, कोणी आपणास दुष्टांचा कर्दनकाळ पिस्तुलबहाद्दर याच्या रूपात पाहील, कोणी स्वतःला सत्ताधीशाच्या रूपात पाहील. दिवास्वप्ने ही गोष्ट निखालसपणे अनिष्ट आहे असे मानणांऱ्यापैकी मी नाही. प्रतिभेच्या भरारीचा तो एक आवश्यक भाग आहे. परंतु उभ्या आयुष्यात जर दिवास्वप्नांचा वस्तुस्थितीशी दूरान्वयानेही कधीच मेळ बसू शकत नसेल तर तशी दिवास्वप्ने फार चटकन अनिष्ट व मानसिक आरोग्याला अहितकारक ठरू शकतात. परंतु आज केवळ स्वप्नसृष्टीच्या माळ्यावर चोरून वावरणाऱ्या या प्रेरणांना प्रत्यक्षात विधायक वाट करून देणे ही गोष्ट आजच्या आपल्या यंत्रसदृश जीवनरचनेतही, अद्यापही शक्य होऊ शकेल. व्यक्तींना आणि समाजाला स्थैर्य येण्यासाठी तरी हे शक्य होऊ शकेल अशी आशा केली पाहिजे. कारण जर हे शक्य झाले नाही तर विध्वंसक तत्त्वज्ञाने मधूनमधून माणसांच्या मनांचा ताबा घेतील. मानवाच्या उत्तमोत्तम निर्मितीचा पुन्हापुन्हा नाश करतील. हे जर टाळावयाचे असेल, तर आपल्या प्रत्येकातील रानटी अंशाला सुसंस्कृत सामाजिक जीवनाशी संवादी राहील अशा प्रकारची वाट काढून दिली पाहिजे, आणि तीही अशी की जी आपल्यासारखाच व एवढाच रानटी अंश स्वतःत वागविणाऱ्या आपल्या शेजाऱ्याच्या सुखात आडवी येणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... ८४०१२ वि: ... निबंध
क्रमांक ... १७२६ नों दि: ... १२।१२।१९६८

व्याख्यान दुसरे

# सामाजिक संघट्टन आणि शासन-यंत्रणा

सामाजिक संघट्टन निर्माण करणारी मूळ प्रक्रिया प्राचीनतम अदिवासी जमातीत अजूनही आढळून येते. कोणत्याही प्रकारच्या शासनाशिवाय व्यक्तीच्या मानसिक घडणीच्या आधारेच हे संघट्टन अस्तित्वात आलेले होते. सर्वांनाच बंधनकारक असलेल्या रीतीभाती त्या जमातीत अस्तित्वात होत्या यात शंका नाही, परंतु या चालीरीतींविरुद्ध वर्तन करण्याची प्रेरणा कधी होत नसेल, किंवा ह्या चालीरीतींप्रमाणे वागावे म्हणून लोकांवर दडपण आणण्यासाठी न्यायाधीशांची व पोलिसांची गरज भासत नसेल असे गृहीत धरावे लागते प्राचीन अश्मयुगात शासनाधिकाराच्या बाबतीत ज्याला आपण सामान्यपणे शासनहीन म्हणू अशा प्रकारची रचना अस्तित्वात असावी. परंतु आधुनिक समाजात शासनहीन या शब्दाने ज्या प्रकारची अराजकाची परिस्थिती सूचित होते, त्यापेक्षा ही परिस्थिती वेगळी होती. कारण त्या काळात सामाजिक प्रेरणांचे व्यक्तींच्या आचरणावर पुरेसे नियंत्रण असे. अर्वाचीन

अश्मयुगाच्या काळात समाजरचना बदलली होती. अर्वाचीन अश्मयुगीन समाजांमध्ये प्रस्थापित शासन होते, आज्ञापालन करावयास भाग पाडणारा शासकवर्ग होता आणि या शासनयंत्रणेने लादलेल्या सहकाराचे प्रमाण फार मोठे होते. हे सर्व त्यांनी बांधलेल्या वास्तूंवरून दिसून येते. छोट्या टोळीत आढळणाऱ्या व प्राथमिक स्वरूपाच्या सामाजिक संघट्टनातून पिरॅमिड्ससारख्या तर सोडाच, पण स्टोनहेंजसारख्याही वास्तू निर्माण होऊ शकल्या नसत्या. युद्धामुळे बहुधा सामाजिक गटांचा आकार वाढत गेला असावा. संपूर्ण निर्दालन करावयाच्या ईर्ष्येने दोन टोळ्यांत युद्ध होत असे तेव्हा विजयी टोळीच्या हाती अधिक मोठा प्रदेश ताब्यात आल्यामुळे ती स्वतःची लोकसंख्या वाढवू शकत असावी. तसेच लढाईच्या काळात दोन किंवा अधिक टोळ्यांनी हातमिळवणी केल्यास साहजिकच त्यांचे बळ वाढत असावे. अधिक टोळ्यांना अशा सहकारास उद्युक्त करणारा धोका जर दीर्घकाल टिकला तर त्या सहकाराचे रूपांतर टोळ्यांच्या एकीकरणात व्हावे, असे काही झाले असावे. अशा रीतीने टोळीची वाढ टोळीबांधवांची एकमेकांना ओळख पटेनाशी होण्याइतकी झाली कीं सर्वानुमते निर्णय घेण्यासाठी कोणतीतरी नवी यंत्रणा निर्माण करण्याची गरज उद्भवली असावी. आणि हीच यंत्रणा क्रमाक्रमाने, आधुनिक काळात ज्याला आपण शासन म्हणतो त्या स्वरूपाची होत गेली असेल. शासन अस्तित्वात आल्यावर होणारी पहिली गोष्ट ही की काही व्यक्तींच्या हातात इतर व्यक्तींपेक्षा जास्त सत्ता जाते, आणि त्यांच्या हातातील सत्तेचा कमिअधिकपणा त्यांच्या सत्तेचे क्षेत्र केवढे आहे त्यावर सामान्यतः अवलंबून राहातो आणि म्हणूनच सत्तेची लालसा अधिकाधिक क्षेत्र जिंकण्यास राज्यकर्त्यांना उद्युक्त करते. पराजित लोकांना मारून टाकण्याऐवजी त्यांना गुलाम बनविण्याची प्रथा सुरू

झाली, तेव्हा साहजिकच ह्या लालसेला आणखी जोर मिळाला. अशा रीतीने, मानवेतिहासाच्या प्रारंभीच्या अवस्थेतच असे समाज अस्तित्वात आले की, ज्या समाजांत सामाजिक सहकाराच्या दिशेने काम करणाऱ्या प्राचीन सहजप्रेरणा काम करीत होत्याच, पण सामाजिक संघट्टन वाढविण्याच्या कामात आज्ञापालन न करणाऱ्या लोकांविरुद्ध दंडयोजना करण्याच्या शासनाच्या सत्तेने या सहजप्रेरणांच्या कार्याला या समाजात फार मोठी बळकटी आली. प्राचीन ईजिप्शियन संस्कृती ही इतिहासाला ज्ञात असलेली सर्वात प्राचीन संस्कृती होय. या प्राचीन ईजिप्तमधील राजाच्या हातात एका फार मोठ्या भूभागावरील सर्वंकष सत्ता एकवटलेली होती असे आपल्याला आढळते. पुजाऱ्याच्या हातात असणाऱ्या सत्तेचेच काय ते त्यावर थोडेफार बंधन होते. या काळातील ईजिप्शियन जनता गुलामी मनोवृत्तीत जगताना आढळून येते. ह्या गुलामी प्रजेला राजा स्वतःच्या इच्छेनुरूप राज्यातल्या पिरॅमिडस्सारख्या कुठल्याही सरकारी कामाला जुंपू शकत असे. अशा प्रकारच्या समाजात समाजातातील अगदी वरिष्ठ पातळीवरील–राजा त्याचे सरदार, पुजारी इत्यादि–मूठभर लोकांचेच सामाजिक संघट्टन तेवढे मनोव्यापाराच्या प्राचीन प्रक्रियेने घडून यावे अशी काही गरज असे. बाकीचे सर्व लोक ही मुकाट्याने आज्ञापालन करणारी प्रजा होती. ईजिप्शियन समाजातील बहुसंख्य लोक दुःखी होते यात काही शंका नाही. बायबलच्या 'एक्झोडस' या विभागातील पहिल्या काही प्रकरणांत या लोकांच्या स्थितीचे चित्रण आपल्याला पहावयास मिळते. परंतु सर्वसाधारणपणे, बाहेरून हल्ला करणाऱ्या शत्रूपासून भीती नव्हती तोपर्यंत, सार्वत्रिक प्रमाणावर लोकांना भोगाव्या लागणाऱ्या क्लेशांचा राज्याच्या एकंदर भरभराटीस अडथळा होत नव्हता, किंवा सत्ताधीशांच्या सुखोपभोगात व्यत्यय येत नव्हता. आज आपण मध्य-

पूर्व या नावाने ओळखतो त्या सर्व प्रदेशात बऱ्याच दीर्घ काळपर्यंत अशाच तऱ्हेची परिस्थिती अस्तित्वात असावी असे निश्चित म्हणता येते. ही समाजस्थिती स्थैर्यासाठी धर्म आणि राजाचे देवपण या दोन पायांवर उभी होती. आज्ञाभंग हे पाप समजले जात असे आणि बंड पुकारणे म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर कोपास आमंत्रण देणे होय अशी समजूत होती. जोपर्यंत समाजातील वरच्या थरांतील लोकांचा यावर प्रामाणिक विश्वास होता, तोपर्यंत पाळीव प्राण्यांना आपण शिस्तीत ठेवतो तसे इतरेजनांना शिस्तीत ठेवण्याने भागत होते.

एक थोडी विचित्र वाटणारी गोष्ट अशी की, सैन्यबळाच्या जोरावर मिळविलेले विजय अनेकदा पराजित लोकांच्या मनात आपल्या जेत्यांविषयी एक खरीखुरी राजनिष्ठेची भावना निर्माण करीत असत. काही काळ लोटल्यानंतर जित लोकांच्या मनात जेत्यांबद्दल निष्ठा निर्माण व्हावी हा प्रकार रोमनांनी जिंकलेल्या बहुतेक सर्व प्रदेशांच्या बाबतीत घडला. उदाहरणार्थ, पाचव्या शतकात जेव्हा रोमन साम्राज्य जितांना एकनिष्ठ राहण्यास भाग पाडण्याइतके सामर्थ्यशाली उरले नव्हते, त्या काळातही गॉल (फ्रान्स) देश रोमन साम्राज्याशी पूर्णपणे एकनिष्ठ राहिला. प्राचीन काळातील सर्वच मोठी राज्ये सैन्यबळावर उभी होती. परंतु त्यांपैकी जी पुष्कळ काळपयत टिकाव धरू शकली त्यांतल्या बऱ्याच राज्यांना आपल्या अधिसत्तेखालील सर्व लोकांमध्ये (पादाक्रांत करून घेण्यात आले त्यावेळी त्यांनी कट्टर विरोध केला होता तरीही) ऐक्याची भावना निर्माण करण्यात यश आले. मध्ययुगात आधुनिक राज्यसत्ता निर्माण झाल्या त्यावेळीही याच इतिहासाची पुनरावृत्ती घडली. त्याकाळी इंग्लंड, फ्रान्स आणि स्पेन ही आजच्यासारखी एकात्म राष्ट्रे नव्हती. अनेक स्वतंत्र सुभेदारांच्या जहागिरी मिळून बनलेले ते प्रदेश होते. त्यांच्यापैकीच एकाने

इतरांवर मिळविलेल्या लष्करी विजयानंतर लादलेल्या शासनातून आजची इंग्लंड, फ्रान्स, स्पेन ही राष्ट्रे एकात्मता पावली.

प्राचीन काळी, एक ईजिप्तचा अपवाद सोडला तर, सर्व मोठ्या राज्यांची अवस्था डळमळीत असे. या अस्थिरतेची कारणे बरीचशी तंत्रज्ञानाच्या तत्कालीन अवस्थेशी निगडित होती. उदाहरणार्थ, ज्या काळी घोड्यापेक्षा अधिक वेगाने धावणारे वाहन नव्हते, त्या काळी मध्यवर्ती शासनाला लांबवरच्या सुभेदारांवर प्रभावी वर्चस्व ठेवणे अवघड जाई. हे सुभेदार बंड करून उठण्याची शक्यता बरीच असे. एखादा सुभेदार मूळचे सगळे साम्राज्य जिंकून घेई, तर कधी कधी त्यातील काही भागांवर स्वतंत्र, सार्वभौम राज्य स्थापन करीत असे. शिकंदर, ॲटिला, आणि चेंगीझखान यांची फार मोठी साम्राज्ये होती; परंतु त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या साम्राज्यांचे तुकडे पडले. या साम्राज्यांचे अखंडत्व केवळ अलौकिक विजेत्याच्या दबदब्यावर अवलंबून होते. या वेगवेगळ्या साम्राज्यांत भावनात्मक ऐक्य नव्हते, ते ऐक्य केवळ दंडसत्तेमुळे अस्तित्वात आलेले होते. रोमन साम्राज्य दीर्घकाळ टिकले, कारण ग्रीक-रोमन संस्कृती जपायला हवी असे साम्राज्यातील सुविद्य लोकांना वाटत होते, आणि साम्राज्याच्या सरहद्दींपलीकडील टोळ्यांच्या रानटीपणापुढे ग्रीक-रोमन संस्कृती आपल्या सुसंस्कृततेने तीव्रपणे वेगळी उमटून दिसत असे. दळणवळणाच्या आधुनिक तंत्रांचा शोध लागेपर्यंत एखादे मोठे साम्राज्य अभंग राखणे जवळजवळ अशक्य होते. त्या साम्राज्याच्या सर्व भागांतील वरिष्ठ वर्गांमध्ये त्यांना एकत्रित करू शकणाऱ्या एखाद्या समान भावनेचा अनुबंध असला तरच हे शक्य होत असे. आणि अशी समान भावनात्मक निष्ठा निर्माण करावयाच्या वेगवेगळ्या मार्गांविषयीही त्या काळी आताइतके ज्ञान नव्हते. त्यामुळे सामाजिक संघट्टनाच्या मानसशास्त्रीय

आधाराचे त्या काळीही विशेष महत्त्व होते; एवढेच की तो आधार शासनकर्त्या छोट्या वर्गांपुरताच आवश्यक असे. प्राचीन काळी राज्ये मोठी असण्याचा मुख्य फायदा असा की मोठमोठी सैन्ये सहज उभी करता येत असत. परंतु दुसऱ्या बाजूला साम्राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात सैन्य नेण्यास फार अवधी लागे आणि मुलकी शासनाला सैन्यातील बंडाळीला प्रतिबंध करण्याची तंत्रे माहीत नव्हती. काही प्रमाणात ही परिस्थिती अर्वाचीन कालापर्यंत टिकून होती. उदाहरणार्थ, इंग्लंड, स्पेन, आणि पोर्तुगाल या राष्ट्रांना आपल्या पश्चिम गोलार्धातील वसाहती, आपली सैन्ये तेथे सहजी नेता न आल्यामुळे गमावाव्या लागल्या. परंतु वाफेवर चालणाऱ्या आगगाड्या व जहाजे आणि तारायंत्रे यांचा शोध लागल्यापासून मोठमोठे प्रदेश काबूत ठेवणे बरेच सोपे झाले आहे. आणि शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सुरू झाल्यापासून विराट लोकसंख्येच्या मनात कृत्रिम राजनिष्ठेचा परिपोष करणे शक्य झाले आहे.

आधुनिक तंत्रांमुळे संघट्टनाचे मानसशास्त्र मोठमोठ्या गटांमध्ये प्रभावीपणे कार्यकारी करणे सुगम झालेले आहे असेच केवळ नव्हे, तर आधुनिक तंत्रामुळे माणसांचे मोठमोठे गट करून रहाणे अर्थशास्त्रीय व लष्करी दृष्ट्याही आवश्यक झाले आहे. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे हा एक परिचित विषय आहे आणि त्या विषयाचा विस्तार करावयाचा माझा विचार नाही. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळण्यासाठी पश्चिम युरोपमधील राष्ट्रांनी एक बृहत्तर राष्ट्र बनविणे आवश्यक आहे असे सांगितले जाते ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. संपूर्ण ईजिप्तवर एकाच शासनाची सत्ता प्रस्थापित होण्यात पूर्वापार कालापासून नाईल नदीचा वाटा मोठा राहिला आहे, कारण नाईलच्या उगमाकडील भाग ताब्यात असणारे सरकार नाईलच्या मुखाकडील

भागातील प्रदेशाचा सुपीकपण नष्ट करू शकत असे. ही घटना विकसित तंत्रविद्येशी संबंधित नसून नाईल नदीच्या विशिष्ट नैसर्गिक रचनेशी संबंधित होती. नदीचा प्रवाह व मार्ग सामाजिक संघट्टनाला प्रोत्साहक असतो या नैसर्गिक घटनेचे शास्त्रशुद्ध संघटन आणि विस्तार 'टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी' आणि संकल्पित 'सेंट लॉरेन्स वॉटरवे' या प्रकल्पांत दिसून येते. बऱ्याच मोठ्या प्रदेशाला वीजपुरवठा करणारी मध्यवर्ती विद्युत्केंद्रे अधिकाधिक महत्त्व पावत आहेत. आणि पुरवठ्याचा प्रदेश जितका मोठा तितकी ती अधिक किफायतशीर ठरतात. जर अणु-शक्ती मोठ्या प्रमाणात वापरता येणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य झाले (आणि हे काही अनपेक्षित नाही) तर एका केंद्रातून विजेचा पुरवठा करता येऊ शकेल अशा क्षेत्रात खूप विस्तार होईल. तंत्रविद्येच्या क्षेत्रातील ह्या सर्व आधुनिक प्रगतीमुळे अनेक लहानलहान संघटनांच्या तुलनेत काही थोड्या प्रचंड संघटना उत्पादनाच्या दृष्टीने अधिक वरचढ ठरल्या आहेत व अशा संघटनांमध्ये अधिकारावर असणाऱ्या लोकांची इतर व्यक्तींच्या जीवनावर चालणारी हुकमत त्यामुळे वाढलेली आहे. आकार वाढतो तशी संघटना अधिक 'उत्पादनक्षम' बनते या गोष्टीला, आर्थिक व राजकीय दोन्ही प्रकारच्या संघटनांच्या बाबतीत, पृथ्वीच्या विस्ताराचीच काय ती मर्यादा आहे असे दिसते.

शासन-संस्थेत घडून आलेल्या साधारणतः याच प्रकारच्या विकासाचे मी एका वेगळ्या दृष्टिकोनातून समीक्षण करणार आहे. समाजातील व्यक्तींच्या जीवनावरील सरकारचे नियंत्रण इतिहासात वेगवेगळ्या वेळी कमीजास्त असलेले आढळून येते. हा कमीजास्तपणा सरकारी सत्तेच्या क्षेत्रात आढळून येतो तसाच व्यक्तीच्या जीवनातील शासनाच्या हस्तक्षेपाच्या तीव्रतेतही आढळून येतो.

मानवेतिहासातील 'सुसंस्कृत' म्हणता येईल अशा समाजव्यवस्था प्रथम एका विशिष्ट साच्याच्या साम्राज्यात अस्तित्वात आल्या. ईजिप्त, बॅबीलोन, आणि निनेव्हे, ही या प्रकारच्या साम्राज्यांची प्रमुख उदाहरणे होत. ॲझटेक आणि इन्का साम्राज्येही याच प्रकारची होती. अशा प्रकारच्या साम्राज्यांत, प्रारंभीच्या काळात वरिष्ठ वर्गांच्या वैयक्तिक अभिक्रमशीलतेला फार मोठ्या प्रमाणात वाव असे, परंतु लढण्यात जिंकलेल्या, बहुसंख्य गुलाम लोकांना कुठलेच स्वातंत्र्य नसे. पुरोहितवर्ग दररोजच्या व्यवहारात फार मोठ्या प्रमाणावर ढवळाढवळ करू शकत असे. फक्त धर्माचे एक क्षेत्र सोडून इतर सर्व क्षेत्रांत राजाच्या हाती सर्वंकष सत्ता होती, आणि युद्धात लढण्यासाठी तो आपल्या प्रजेला भाग पाडू शकत असे. राजाच्या देवपणावरील श्रद्धा व पुरोहितवर्गाविषयी आदराची भावना यांमुळे समाजाला एक प्रकारचे स्थैर्य प्राप्त झाले. आपल्याला माहीत असलेल्या समाजांमध्ये ईजिप्शियन समाजात हे स्थैर्य सर्वात अधिक प्रमाणात आढळून येते. परंतु या स्थैर्यासाठी समाजव्यवस्था साचेबंद करून टाकण्याचे मूल्य द्यावे लागले. ही प्राचीन साम्राज्ये इतकी साचेबंद बनली की परकीयांच्या आक्रमणापासून स्वतःचे रक्षण करण्याची शक्तीही ती गमवून बसली. ईजिप्त, बाबिलोन व ही निनेव्हे साम्राज्ये पर्शियन साम्राज्याने गिळंकृत केली आणि पर्शियाचा शेवटी ग्रीसने पराभव केला.

फीनिशियन्सनी निर्माण केलेली एक नवीन प्रकारची समाजव्यवस्था ग्रीकांनी पूर्णावस्थेला नेली आणि ती म्हणजे व्यापार आणि सागरी बल यांवर अधिष्ठित असलेली नगरराज्यांची समाजव्यवस्था होय. वेगवेगळ्या ग्रीक नगर-राज्यांत नागरिकांना असलेल्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचे प्रमाण निरनिराळे होते. बऱ्याच राज्यांत स्वातंत्र्याचे

प्रमाण मोठे होते. परंतु स्पार्टा या नगरराज्यात अगदी किमान आवश्यक इतकेच व्यक्तिस्वातंत्र्य नागरिकाला होते. तथापि, बहुतेक नगरराज्यांत सत्ता हुकुमशहांच्या हाती जाण्याकडे कल राही, आणि मधूनमधून होणाऱ्या राज्यक्रांत्या व त्या नंतरच्या अल्पजीवी लोकप्रातिनिधिक राजवटी सोडल्या तर, एकंदर ही नगरराज्ये हुकूमशहांच्या अनियंत्रित राजवटींखालीच अधिक काळ होती. या नगर-राज्यांमध्ये क्रांती करणे फार सोपे असे. नगर-राज्यांचा विस्तार काही मैलांचाच असे. तेव्हा काही मैल दूर गेले की असंतुष्ट क्रांतिकारकांना 'पर'मुलुखात जाता येई. आणि त्यांना मदत करण्यासाठी तयार असलेली दुसरी शत्रू नगर-राज्ये सदैव असतच. ग्रीक सुवर्णयुगाच्या सर्व कालखंडात ज्या तीव्रतेची अराजकाची अवस्था अस्तित्वात होती तेवढे अराजक आधुनिक काळात आपल्याला असह्य वाटेल. परंतु ग्रीक नागरिकांमध्ये (यात तत्कालीन सरकारविरुद्ध बंड पुकारणाऱ्यांचाही समावेश होतो) आपल्या स्वतःच्या नगर-राज्याविषयी आढळणाऱ्या निष्ठेची भावनात्मक मानसशास्त्रीय जातकुळी टोळीनिष्ठेचीच होती. आपल्या नगरावरील त्यांचे प्रेम अनेकदा असमंजस, अविचारी परंतु नेहमीच उत्कट असे. वैयक्तिक कामगिरीच्या क्षेत्रातील ग्रीकांचे अलौकिकत्व आणि राजकीय क्षेत्रातील त्यांची नालायकी यांचा फार घनिष्ठ संबंध आहे असे मला वाटते. कारण वैयक्तिक कामगिरीच्या वेळी शक्तिस्रोत असलेली अत्यंत उत्कट आत्मनिष्ठा एकसंध ग्रीक-राज्य-निर्मितीच्या वेळी अपयशास कारणीभूत होणारी धोंड ठरली आणि त्यामुळे ग्रीस प्रथम मॅसिडोनियाच्या आणि नंतर रोमच्या अधिराज्याखाली गेला.

रोमन साम्राज्याच्या विस्ताराच्या काळात व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि घटक राज्यातील स्वायत्तता यांना फार मोठ्या प्रमाणात वाव

दिला गेला. परंतु सम्राट ऑगस्टसच्या कारकीर्दीनंतर केंद्रीय शासनाने हळूहळू अधिकाधिक सत्ता हातात घेतली. अखेरशेवटी, प्रामुख्याने करांचा बोजा फार डोइजड झाल्याने रोमन साम्राज्याला बऱ्याचशा भागांवरील सत्ता गमवावी लागली व रोमन साम्राज्याने निर्माण केलेल्या समाजव्यवस्थेला धक्का पोचला. तरीही, रोमन साम्राज्यातील इतर उरलेल्या भागांवरील केंद्रीय शासनाचे नियंत्रण कुठल्याही प्रकारे सैल करण्यात आले नाही. सम्राट जस्टिनियनने परत जिंकून घेतलेला इटाली आणि आफ्रिकन प्रदेश रोमन लोकांच्या हाती अल्पकाळच राहिला. याचे प्रमुख कारणही, इतक्या बारीक-सारीक गोष्टीत रोमची सत्ता चालावी याला लोकांचा असलेला विरोध हेच होते. ज्या लोकांनी सुरवातीला गॉथस् आणि व्हॅन्डल्स यांच्या-पासून आपलीच मुक्तता करावयास आलेल्या जस्टिनियनच्या सैन्याचे 'मुक्तिसेना' म्हणून स्वागत केले, त्या लोकांनीच नंतर, जेव्हा त्या सैन्यापाठोपाठ कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांचे सैन्य आलेले पाहिले तेव्हा आपले मत बदलले.

रोम खूपदूर व परके असल्यामुळे बहुधा साम्राज्यातील सुखवस्तू नागरिकांनाही त्या सत्तेखाली सहजस्फूर्त समाधान मिळू शकले नाही आणि म्हणूनच सर्व सुसंस्कृत जग एकत्र आणण्याचा रोमचा प्रयत्न विफल झाला. रोमन साम्राज्याच्या शेवटच्या शतकांमध्ये या साम्राज्यात सर्वत्र निराशावाद आणि निर्वीर्य वृत्ती दिसू लागली. पृथ्वीतलावरील जीवनात अर्थ नाही असे लोकांना वाटू लागले. आणि या भावनेचा उपयोग ख्रिश्चन धर्माला, परलोकाकडे लोकांचे लक्ष वळविण्यासाठी करता आला.

रोमच्या पाडावानंतर पाश्चिमात्य जगाचा चेहरामोहरा पार पालटून गेला. रोमन साम्राज्याचे वैभव मानले गेलेले रोमन राजमार्ग वापरा-

अभावी ओकेबोके झाले, आणि व्यापार अजिबात बंद पडल्यासारखा झाला, चतकोरनितकोराएवढ्या राज्यात एकेकाळच्या रोमन साम्राज्याची शकले झाली. हे लुटुपुटीचे राजे एकमेकांशी सारखे युद्ध करीत. एकीकडे दांडगट ट्यूटॉनिक सरदारांच्या पुंडाव्याचा मुकाबला करीत आणि दुसऱ्या बाजूला रोमन संस्कृतीत रुळलेल्या प्रजाजनांच्या घुम्या तिरस्काराला तोंड देत देत आपल्या सत्तेखालील छोट्याछोट्या प्रदेशांवर जितपत जमेल तितपत ते राज्य करीत. पाश्चिमात्य जगतातील ख्रिस्तधर्मीय प्रदेशात गुलामगिरीची प्रथा जवळजवळ नष्ट झाली, परंतु भूदासपद्धतीने त्याची जागा घेतली. रोमन साम्राज्याच्या काळात आफ्रिकेतून गलबतांचे प्रचंड ताफेच्याताफे भरभरून धान्य येत असे. त्याऐवजी लहान लहान जमाती आता, बाहेरील जगाशी फारच कमी आणि क्वचित संबंध असल्यामुळे, आपल्या प्रदेशात निर्माण होणाऱ्या अन्नधान्यावर जमेल तशी गुजराण करू लागल्या. एकंदरीत लोकांचे आयुष्य संकटप्रद आणि कष्टमय होते. परंतु रोमच्या अखेरच्या दिवसांतल्या चैतन्यशून्यतेपासून आणि वैफल्यापासून ते मुक्त होते. सबंध 'अंधार-युगात' (डार्क एजिस) आणि मध्ययुगात सर्वत्र बेबंदशाही माजलेली होती. आणि या कारणामुळे त्या काळी सर्व विचारी व्यक्तींना कायद्याचे राज्य परमपवित्र वाटत होते. कालांतराने, या रगेल बेबंदशाहीने पराक्रमास वाट मोकळी करून दिलेल्या व्यक्तींनी काही एक व्यवस्था निर्माण केली आणि याच रगेल काळाने एकामागून एक जन्म दिलेल्या महाकाय पुरुषांनी युरोपात एका नव्या संस्कृतीची उभारणी केली.

पंधराव्या शतकापासून तो आजतगायत शासन-संस्थेची व्यक्तीवर चालणारी सत्ता दिवसेदिवस वाढतच आहे. प्रथमतः प्रामुख्याने सुरुंगाच्या दारूच्या (गनपावडरच्या) शोधामुळे ही गोष्ट शक्य

झाली. पूर्वी आपल्या गढ्यांच्या आत सरदार निर्धास्त असत व मध्यवर्ती सत्तेचे त्यांच्यापुढे काही चालत नसे. सुरुंगाच्या दारूपुढे (तोफखान्यापुढे) गढीच्या तटबंदी कोसळू लागल्याने सरदारांच्या नाकाला वेसण घालणे मध्यवर्ती सत्तेला शक्य झाले. ज्याप्रमाणे त्या आधीच्या बेबंदशाहीच्या काळात विचारवंतांना कायदा आणि सुव्यवस्था यांचे मोल सगळ्यात अधिक वाटे, त्याप्रमाणे शासन-संस्था प्रबळ होत होत्या त्या काळात व्यक्तिस्वातंत्र्याची पूजा करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली होती. सुव्यवस्थेसाठी आवश्यक त्या प्रमाणात शासनसंस्थेच्या सत्तेत वाढ करीत असतानाच समाजातील अगदी खालचे वर्ग सोडल्यास इतरांचे स्वातंत्र्य फार मोठ्या प्रमाणात अबाधित राखण्यात अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांत लक्षणीय यश आले. आज व्यक्तिस्वातंत्र्याची प्रेरणा समाज-सुधारकांच्या ठिकाणी पुष्कळच क्षीण झाल्याचे दिसते आणि त्याऐवजी त्यांना समतेच्या कल्पनेविषयी अगत्य निर्माण झालेले दिसते. वंशपरंपरागत समाजधुरीणत्वाचा वारसा सांगू न शकणाऱ्या व नव्यानेच उदयास आलेल्या उपटसुंभ भांडवलदार वर्गांची समृद्धी आणि सत्ता पाहून या समतेच्या कल्पनेला खासकरून चालना मिळाली आहे. आणि सर्वंकष युद्धांच्या या जगात आपल्या वाड-वडिलांच्या काळात होती तितकी व्यक्तीला सैल सोडणारी समाजरचना कामाची नाही, अधिक आवळलेली, व्यक्तीवर कडक निर्बंध घालणारी समाजरचना आवश्यक आहे असे जवळजवळ प्रत्येकास वाटत आहे.

राजाला देवपदी बसविणाऱ्या प्राचीन ईजिप्शियन शासनसंस्थेहून फारशी वेगळी नाही अशी शासनसंस्था जगातल्या बऱ्याच मोठ्या भागावर आज प्रस्थापित झाली आहे. या सत्तेच्या मागे एक नवा पुरोहितवर्ग उभा आहे. कम्युनिस्ट राष्ट्रांमध्ये ही घटना ज्या थरापर्यंत

गेलेली दिसून येते तेवढ्या थराला पाश्चिमात्य जगात ही गोष्ट गेल्याचे दिसून येत नाही हे खरे असले, तरी इंग्लंड, अमेरिकेतील अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांतील लोकांना आश्चर्याचा धक्का बसला असता, एवढ्या थरापर्यंत ती निश्चितच गेली आहे. आज व्यक्तींच्या प्रेरणांचा, उपक्रमशीलतेचा एकतर शासनसंस्थेकडून किंवा अजस्त्र आकाराच्या शक्तिशाली औद्योगिक व्यापारी कंपन्यांकडून कोंडमारा होत आहे. आणि रोमन साम्राज्याच्या अखेरच्या दिवसांतल्या-प्रमाणे, या प्रेरणा मारल्या गेल्यामुळे एक प्रकारची चैतन्यशून्यता आणि दैववाद यांचा प्रादुर्भाव होऊन जीवनातील जोष नाहीसा होईल असा धोका निर्माण झाला आहे. मला नेहमी पुढील मतलबाची पत्रे येत असतात : "हे जग मोठ्या कठीण परिस्थितीत आहे असे मला वाटते. परंतु मी एकटा गरीब बिचारा काय करू शकणार आहे ? आमचे आयुष्य आणि आमचे वित्त दोन्हीही मूठभर व्यक्तींच्या हाती आहेत. त्याच व्यक्तींच्या हातांत शांतता की युद्ध यामधून निवड करावयाचा अधिकार आहे. शासनसंस्था किंवा मोठमोठ्या कंपन्या हाती असणाऱ्यांच्या हातांत मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल करण्याची सत्ता एकवटलेली आहे. ज्या ठिकाणी लोकशाही औपचारिक अर्थाने अस्तित्वात असते तिथेही, एका नागरिकाचा राज्याच्या धोरणविषयक बाबतीतला सहभाग वाळवंटातील वाळूच्या कणाएवढा असतो. अशा परिस्थितीत सामाजिक जबाबदारीकडे पाठ फिरवून शक्य तेवढी चैन करून घेणे हेच अधिक बरे नाही का ?" अशा पत्रांना उत्तर पाठविणे मला फार अवघड जाते. ज्या मनःस्थितीतून अशी पत्रे लिहिली जातात ती निरोगी समाजजीवनास विघातक आहे अशी माझी खात्री आहे. शासनसंस्थेचा आकारच आज इतका अजस्त्र आहे की शासनसंस्था प्रजेपासून

अधिकाधिक दुरावत जाते आणि लोकशाही राष्ट्रांत सुद्धा शासनसंस्थेचे स्वतःचे असे वेगळे हितसंबंध दृढ बनतात. व ती एक स्वतंत्र असे जीवन जगू लागते. सामाजिक जीवनात शिरलेल्या या कलीचे उच्चाटन कसे करावयाचे त्याचे पूर्ण समाधानकारक उत्तर मजजवळ नाही. पण त्याचे अस्तित्व आपण लक्षात घ्यावे आणि त्याचा प्रभाव कमी करण्याचे मार्ग शोधून काढावेत ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते.

ज्या टोळीतील सर्वजण एकमेकांना ओळखत असत त्या टोळीत जमातीविषयीची निष्ठा साहजिकच वास करीत असे. सामाजिक संघट्टन निर्माण करणारी ही सहजवृत्तीवर आधारित निष्ठा व आधुनिक कालात या निष्ठेची जागा घेतलेली मोठ्या राष्ट्रांविषयींची राष्ट्रनिष्ठा यांत महदंतर आहे. सर्वनाश करणाऱ्या युद्धाचा धोका आज जगापुढे आहे. या वर्तमानकालीन परिस्थितीत सर्वनाशाचा धोका टाळण्यासाठी ज्या प्रकारची जागतिक संघटना आवश्यक आहे त्या संघटनेत, जी काय प्राचीन जमातनिष्ठा उरलीसुरली असेल तिचा जवळजवळ मागमूसही राहाणार नाही अशी शक्यता आहे. ब्रिटनविषयी एखाद्या इंग्रज किंवा स्कॉच माणसाला सहजस्फूर्त निष्ठा वाटेल; ब्रिटनविषयी शेक्सपियरचे उद्‌गार त्याला ठाऊक असतील; ब्रिटन हे एक सर्वस्वी नैसर्गिक सीमा असलेले बेट आहे हे ज्याला ठाऊक असते; ब्रिटनच्या इतिहासाची–निदान त्यातील वैभवशाली भागांची तरी त्याला माहिती असते; आणि त्याला ब्रिटिश खाडीपलिकडील युरोपमधील लोक परकीय भाषा बोलतात हेही माहीत असते. परंतु ब्रिटनशी एकनिष्ठ राहाण्याऐवजी संयुक्त पश्चिम युरोपशी एकनिष्ठ राहण्याची जरुरी पडली तर, राष्ट्रीय सीमांना छेदून जाणारी एकात्मता पश्चिम युरोपीय संस्कृतीमध्ये असल्याची जाणीव निर्माण

होण्याची जरुरी भासेल. कारण याशिवाय आणखी एकाच प्रकारची मानसशास्त्रीय प्रेरणा अशी एकी निर्माण करू शकेल. परकीय आक्रमणाची भीती ही ती प्रेरणा होय. परंतु भीती ही एक नकारात्मक प्रेरणा आहे, आणि विजय मिळाल्याबरोबर ही प्रेरणा काम करेनाशी होते. या प्रकारच्या भयाची तुलना प्राचीन ग्रीक नागरिकाला स्वतःच्या शहर-राज्याविषयी वाटणाऱ्या प्रेमाशी केली तर उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या, तत्काल संकटाचे भय नसल्यास केवळ भयापोटी जन्मास येणाऱ्या निष्ठेची सामान्य माणसांच्या सहजप्रवृत्तींवरील वा उत्कट भावनांवरील पकड किती ढिली असते ही गोष्ट चटकन दिसून येते.

शासनसंस्था अस्तित्वात आली त्या काळापासून शासनसंस्थेची दोन मूलभूत कार्ये राहिली आहेत. त्यांपैकी एक कार्य क्रियात्मक आहे, तर दुसरे प्रतिबंधात्मक आहे. प्रजाजनांनी कायदा हातात घेण्यास प्रतिबंध करणे, जीवित-मालमत्तेचे रक्षण करणे, गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी दंडविधान करणे व त्याची अंमलबजावणी करणे ही शासनसंस्थेची प्रतिबंधात्मक कार्ये राहिली आहेत. परंतु या प्रतिबंधात्मक कार्याचाही विधायक हेतू असा की, ज्या गोष्टी बहुसंख्य जनतेला हव्याशा वाटतात असे मत असेल त्या ईप्सित गोष्टी साध्य करण्याचे त्यांचे मार्ग सुगम व्हावेत. अलीकडेअलीकडेपर्यंत शासनसंस्थेचे क्रियात्मक कार्य 'युद्ध करणे' एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले आहे. एखाद्या शत्रूला जिंकून त्याचा प्रदेश बळकाविता आल्यास विजयी राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचा थोड्याफार प्रमाणात तरी फायदा होत असे. परंतु सध्याच्या काळात शासनसंस्थेच्या क्रियात्मक कार्यांचा फार मोठ्या प्रमाणात विस्तार झालेला आहे. शिक्षण हे एक असे महत्त्वाचे कार्य आहे. केवळ विषयाभ्यासातील प्रावीण्य एवढाच शिक्षणाचा

आशय नसतो, तर काही विशिष्ट मूल्ये आणि निष्ठा यांची शिकवण ह्याही शिक्षणाचा भाग असतो. शासनसंस्थेला योग्य वाटणाऱ्या ह्या निष्ठा आणि ही मूल्ये असतात आणि कधीकधी, काही प्रमाणात ही मूल्ये कोणत्यातरी धर्मसंस्थेने पुरस्कारिलेली असतात. याखेरीज शासनसंस्थेच्या नियंत्रणाखाली प्रचंड उद्योगधंदे असतात. आर्थिक क्षेत्रात शासनसंस्थेचा कमीतकमी हस्तक्षेप असावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या अमेरिकेसारख्या देशांतही औद्योगिक कार्यक्षेत्रांत शासनसंस्था वाढत्या प्रमाणात सत्ता गाजवू लागली आहे. आणि उद्योगधंद्यांच्या बाबतीत मानसशास्त्रीय दृष्ट्या पाहिले तर सरकारी उद्योगधंदे व अवाढव्य खाजगी कंपन्यांनी चालविलेले उद्योगधंदे यांत फारसा फरक नाही. सरकारी काय किंवा खाजगी काय, दोन्ही प्रकारच्या उद्योगधंद्यांतील शासन ज्या लोकांच्यावर हुकुमत गाजविते, त्यांच्यापासून फार दूरस्थ असते. शासन स्वतःस बुद्धिपुरस्सर अलिप्त राखत असेल असे नाही, किंबहुना अलिप्त नसावे असे कदाचित शासनाचे धोरण असेल, तरी प्रत्यक्षात मात्र अलिप्तता हीच वस्तुस्थिती असते. शासनसंस्थेत काय किंवा एखाद्या मोठ्या कंपनीमध्ये काय, शासनकर्त्या काही लोकांच्या ठिकाणी केवळ व्यक्तिगत पुढाकाराची अनुभूती टिकून राहते. आपल्यासाठी श्रम करणारी माणसे ही माणसे नसून इतर यंत्रसामुग्रीप्रमाणेच आपली गरज भागविणारी साधने आहेत असे मानण्याची शासनाची अटळपणे प्रवृत्ती होऊ लागते. सुलभ, निर्विघ्न सहकार इष्ट असतो, त्याकरिता संघटनेचा आकार वाढविण्याकडे प्रवृत्ती होते. पण संघटनेच्या अशा वाढीनंतर स्वयंप्रेरणेने आपले काम करू शकणाऱ्या व्यक्तींची संख्या अधिकच कमी होत जाते. या दृष्टीने पाहता ब्रिटनमध्ये अनेक विविध कार्य-क्षेत्रांमध्ये आज अस्तित्वात असलेली व्यवस्था सर्वात वाईट होय.

ब्रिटिश शासनव्यवस्थेत औपचारिकदृष्ट्या मंत्रिमंडळाच्या हाती पुढाकार असतो. पण प्रशासनयंत्रणा सनदी नोकरांच्या हाती असते आणि, नव्याने कोणतेही काम सुरू करण्याची जबाबदारी या सनदी नोकरशाहीवर नसते. मात्र कोणत्याही कामास सुरुंग लावण्याचा व्हेटो अधिकार तिच्या हाती असतो. यामुळे नव्या घडू घातलेल्या गोष्टींना भूतकाळातील दाखले देऊन अडथळा करीत राहावा अशी नोकरशाहीची अकरणात्मक मनोवृत्ती बनत जाते. अशा व्यवस्थेत उत्साही व्यक्ती निराश होतात आणि अधिक आशादायक वातावरणात ज्यांचा उत्साह वाढला असता ते चैतन्यहीन व उडाणटप्पू वृत्तीचे बनतात. अशा परिस्थितीत शासनसंस्थेची क्रियात्मक कार्ये उत्साहाने व कार्यक्षमतेने पार पडू शकत नाहीत. उदाहरणार्थ, अर्थोत्पादक कृमिकीटक-शास्त्राचा व्यावहारिक उपयोग मोठ्या प्रमाणावर केल्यास समाजाचा आजच्या तुलनेत प्रचंड प्रमाणावर आर्थिक लाभ होऊ शकेल. परंतु त्यासाठी मोठ्या संख्येने कृमिकीटकशास्त्रज्ञांच्या नेमणुका कराव्या लागतील व त्यांना द्यावयाच्या पगाराची तरतूद करावी लागेल. कृमिकीटकशास्त्रज्ञांचा अर्थोत्पादनासाठी वापर करण्याच्या कमालीच्या साहसी धोरणाबाबतीत आजच्या परिस्थितीत जरा जपूनच त्या दिशेने वाटचाल केली पाहिजे असे सरकारला वाटते. असमंजस मातापित्यांप्रमाणें नेहमी ‘हे करू नको; ते करू नको’ असे म्हणावयाची सवय लागलेल्या लोकांचे हे मत आहे हे सांगावयास नको. परंतु असे म्हणताना क्षणभर थांबून तसे करण्याने काही हानी होणार आहे का याचा विचार ते करीत नाहीत. जिथे अधिकार फार दूरस्थ स्थानावरून गाजविला जात असतो अशा ठिकाणी या अनिष्ट प्रवृत्ती टाळणे फार अवघड आहे, आणि कोणत्याही अवाढव्य संघटनेत हुकुमत अशी दुरूनच गाजविली जाण्याची शक्यता अधिक.

मोठ्या प्रमाणावरील संघटनांपासून होणारा निःसंशय लाभ न सोडता, वरील अनिष्ट प्रवृत्तींचे निराकरण करण्यासाठी आपल्याला काय करता येईल याचा विचार मी नंतरच्या एका व्याख्यानात करीन. कदाचित असेही असेल की सध्याच्या सत्तेच्या केंद्रीकरणाच्या प्रवृत्ती इतक्या जोरदार आहेत की त्यांच्याशी मुकाबला करणे शक्य नाही; त्यातून होणारा सर्वनाश टळणार नाही; आणि रोमन साम्राज्याच्या बाबतीत पाचव्या शतकात घडल्याप्रमाणे, सर्व व्यवस्थाच कोलमडून पडेल आणि त्यातून मग अटळपणे अराजक आणि दैन्य निर्माण होईल. कोणी सांगावे, अशा सर्वनाशानंतरच ज्या कोटीच्या व्यक्तिस्वातंत्र्याशिवाय जीवनात स्वारस्य नाही त्या कोटीचे व्यक्तिस्वातंत्र्य मानवास परत हस्तगत व्हावयाचे असेल. ही पाळी येणार नाही अशी मी आशा करतो. परंतु जर सत्तेच्या वाढत्या केंद्रीकरणातला धोका वेळेवर ओळखला नाही, आणि त्याच्याशी सामना द्यावयास वेळीच जोरदार सिद्धता केली नाही तर मात्र सर्वनाश टळणार नाही हे निश्चित.

ऐतिहासिक काळात सामाजिक संघटनात झालेल्या फेरबदलांची जी स्थूल रूपरेषा वर दिली आहे तिच्यात आपल्याला एक दुहेरी परिवर्तन आढळून येते.

एका बाजूला आपल्याला कालक्रमानुसार होत गेलेले परावर्तन दिसते. थोड्याशा व्यक्तींच्या पुरत्या मर्यादित व जुजबी संघटनेतून हळूहळू अधिकाधिक सुव्यवस्थित शासन निर्माण झाले. ह्या शासनाचा अधिकार विशाल भूप्रदेशावर चालू लागला आणि व्यक्तिजीवनाच्या मोठ्या भागावर शासन हुकूमत गाजवू लागले. हे परिवर्तन घडत असताना एक अवस्था अशी येते, जेव्हा नुकतीच समाजाजवळच्या संपत्तीत आणि सुरक्षिततेत खूपच वाढ झालेली असते परंतु अधिक

खोल बेबंदशाही काळातील जोष आणि साहस कमी झालेली नसतात. या अवस्थेतील समाजांकडून संस्कृतीचा नवा उन्मेष घडवणारी अनेक मोठमोठी कामे होतात. परंतु ही नवीन संस्कृती जेव्हा पुढे साचेबंद होते, शासनाची सत्ता दृढमूल होते आणि रूढ परंपरा व कायदा, ज्याच्या जाचाने नवीन साहस करण्याच्या उमेदीची गळचेपी व्हावी असे वर्तणुकीचे तपशीलवार, बारीकसारीक गोष्टींपर्यंत जाऊन पोचणारे नियम ठरवून देतात, तेव्हा तो समाज जड, रुद्धगतिक बनतो. माणसे आपल्या पूर्वजांच्या पराक्रमांचे पोवाडे गातात. परंतु त्यांच्या तोडीचे कर्तृत्व गाजवू शकत नाहीत. सत्तेपुढे मान तुकविण्याच्या वृत्तीमुळे कला सांकेतिक बनते आणि विज्ञानाचा प्राण गुदमरून जातो.

अशा प्रकारचे संस्कृतीचे परिवर्तन आणि अशा रीतीने प्रगत झालेल्या संस्कृतीचे काष्ठवत, जड रूपांतर आपल्याला चीन आणि हिंदुस्थान, मेसोपोटेमिया आणि इजिप्त तसेच ग्रीक-रोमन संस्कृती यांतही पाहावयास मिळते. बहुधा परकीय आक्रमणाने अशा संस्कृतीचा अंत होतो. जुन्या शत्रूंबरोबर युद्ध करण्यास उपयोगी पडणारी जुनी शास्त्रे अशा समाजास अवगत असतात, परंतु जेव्हा नवीन प्रकारचे युद्ध करणारा नवीन शत्रू सामोरा येतो तेव्हा ज्या नवीन युद्धशास्त्रामुळेच फक्त बचाव होऊ शकेल ते नवीन शास्त्र ग्रहण करण्याइतकी मनाची लवचिकता या जीर्ण समाजाजवळ नसते. त्याचप्रमाणे, विजेते जर जित राष्ट्रांपेक्षा कमी सुसंस्कृत असतील—आणि असेच पुष्कळ वेळा घडते—तर त्यांच्यात मोठ्या साम्राज्याचे शासन चालविण्याचेही कौशल्य नसते, आणि विस्तृत प्रदेशावर व्यापारी दळण-वळण कायम राखण्याचेही कर्तृत्व नसते. परिणामतः लोकसंख्या कमी होत जाते; साम्राज्याचे तुकडे पडतात आणि प्रत्येक राज्याचा आकार लहान होतो; आणि शासनाचे नियंत्रण सैल बनते. अशा प्रकारे

निर्माण झालेल्या अराजकाच्या स्थितीत कालांतराने नवा जोष परत निर्माण होतो, आणि एक नवीन संस्कृति-चक्र सुरू होते.

परंतु या कालचक्रात्मक परिवर्तनाखेरीज दुसराही एक प्रवाह आढळून येतो. प्रत्येक चक्रागणिक शिखरावस्थेत राज्यसंस्थेच्या शासनाखाली असलेल्या प्रदेशाचा आकार वाढत जातो. आणि व्यक्तिजीवनावर असणारी शासनसंस्थेच्या अधिकाराची व्याप्ती ही पण अशा प्रत्येक चक्रागणिक वाढत जाते व तीव्रतर होते. उदाहरणार्थ, रोमन साम्राज्य त्याच्या आधी होऊन गेलेल्या बॅबिलोनियन किंवा इजिप्शियन साम्राज्यापेक्षा अधिक विस्तीर्ण होते आणि आजच्या कालातील साम्राज्ये ही रोमन साम्राज्यापेक्षाही अधिक विस्तीर्ण आहेत. आज सोव्हिएट रशियात, किंबहुना पाश्चिमात्य राष्ट्रांतही, शासनसंस्थेची आपल्या नागरिकांवर जितकी संपूर्ण हुकूमत आढळते तितकी हुकूमत इतिहासातील या पूर्वीच्या कोणत्याही शासनसंस्थेने गाजविलेली नाही.

पृथ्वीवरील भूप्रदेश सीमित आहे. त्यामुळे ही प्रवृत्ती अशीच काहीही प्रतिबंध न होता चालू राहिली तर त्याचा शेवट सर्व जगात एकच शासनसंस्था प्रस्थापित होण्यात होईल. परंतु अशा जागतिक शासनसंस्थेला परकीय आक्रमणाची भीती नसेल. यामुळे भयापोटी काही ऐक्याची भावना जागृत होऊ शकणार नाही. म्हणजे सामाजिक संघटनाचे जुने मानसशास्त्र निरुपयोगी ठरेल. जागतिक शासनसंस्थेच्या कारभारात देशभक्तीला काहीच वाव राहणार नाही. स्वहिताची ओढ आणि इतरांविषयीचा सद्भाव या जागतिक शासनसंस्थेच्या व्यवहारांमागील दोन प्रमुख प्रेरक शक्ती असाव्या लागतील. द्वेष आणि भीती या दोन प्रभावी प्रेरणांचा उपयोग करून घेता येणार नाही. असा समाज टिकून राहू शकेल काय? आणि जरी तो टिकू शकला तरी तो प्रगतिपर राहू शकेल

काय? हे फार अवघड प्रश्न आहेत. ह्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी ज्या काही गोष्टी आपल्याला विचारात घ्याव्या लागतील, त्यांचे दिग्दर्शन पुढील व्याख्यानातून मी करणार आहे.

आजवर इतिहासाची वाटचाल दुहेरी दिशांनी झाली असे मी म्हटले आहे. पण ऐतिहासिक विकासाचे जे काही असे नियम आपण शोधून काढतो त्या नियमांबाबत काही निश्चितता वा अपरिहार्यता असते असे मला वाटत नाही. नवीन ज्ञान-संपादनामुळे इतिहासाच्या प्रवाहाला अन्यथा लागले नसते असे वेगळेच वळण लागू शकते. उदाहरणार्थ, अमेरिकेचा शोध लागल्यामुळे नंतरच्या इतिहासक्रमात बदल झाला. नवीन समाजसंस्थांच्या निर्मितीमुळेही ज्यांची कल्पना आधी करता येणार नाही असे परिणाम इतिहासावर घडून येऊ शकतील. उदाहरणार्थ, ज्युलियस सीझरच्या काळातील कुठल्याही रोमन माणसाला कॅथॉलिक चर्चसंस्था अस्तित्वात येणार आहे असे भविष्य वर्तविता येऊ शकले असते असे मला दिसत नाही. त्याचप्रमाणे, एकोणिसाव्या शतकातील कुठलीही व्यक्ती, अगदी मार्क्स देखील, सोव्हिएट रशियाच्या उदयाची कल्पना करू शकला नाही. या कारणास्तव मानवाच्या भवितव्याविषयी वर्तविलेली सर्व भविष्ये ही फारतर आपण विचारात घेण्यासारख्या अभ्युपगमांच्या स्वरूपाचीच मानली पाहिजेत.

मला असे वाटते की, कुठलेही ठाम भविष्य वर्तविणे आततायीपणाचे असले तरी, भविष्यात इतिहासाला अनिष्ट वळण लागेल, काही अनिष्ट परिणाम घडून येतील, अशी शक्यता आहे आणि या संभाव्यता लक्षात घेणे शहाणपणाचे ठरेल. एक शक्यता अशी की फार काळ चाललेल्या आणि विनाशकारक युद्धामुळे जगातील सर्व सुसंस्कृत राज्यांतील उद्योगधंदे कदाचित मोडकळीस येतील आणि त्यामुळे रोमच्या पाडावानंतर पश्चिम युरोपमध्ये शतखंड राज्ये निर्माण

होऊन बेबंदशाही माजली तशी क्षुद्र बेबंदशाही माजेल. ह्याचा परिणाम फार मोठ्या प्रमाणात लोकसंख्या घटण्यात होईल, आणि आपण जी कार्ये सुसंस्कृत जीवनाची वैशिष्ट्ये मानतो त्यातली बरीच कार्ये निदान काही काळ तरी थंडावतील. परंतु ज्याप्रमाणे मध्य-युगामध्ये युरोपात किमान आवश्यक प्रमाणात सामाजिक संघट्टन हळूहळू प्रस्थापित झाले त्याचप्रमाणे या वेळीही घडेल व विस्कटलेली घडी परत सुव्यवस्थित बसेल अशी आशा केल्यास ती अनाठायी होणार नाही असे वाटते.

परंतु आणखी एक धोका आहे, आणि तो धोका खरा होण्याची शक्यता अधिक आहे. आधुनिक तंत्रामुळे शासनाच्या सत्तेची पकड अधिक घट्ट करणे शक्य होत आहे आणि सर्वंकष हुकूमशाही शासनसंस्थांनी ही तंत्रे राबवून नागरिकांवरील नियंत्रण जास्तीत जास्त परिपूर्ण केलेले आहे. असेही होऊ शकेल की युद्धाच्या भीतीमुळे किंवा युद्धाच्या ताणामुळे किंवा हुकुमशाहीच्या लष्करी विजयामुळे, जगाच्या ज्या भागात थोड्याफार प्रमाणात व्यक्तिस्वातंत्र्य अस्तित्वात आहे ते भाग कमी होतील आणि जे भाग हुकूमशाही राजवटीखाली जाण्यापासून वाचतील त्या भागांतील व्यक्तिस्वातंत्र्याचे प्रमाणही कमी कमी होत जाईल. यातून निर्माण होणारी, व्यक्तिस्वातंत्र्याचा अत्यंत संकोच करणारी शासनपद्धती टिकाऊ असणार नाही, असे म्हणण्यास सबळ कारण देता येणार नाही. परंतु ती निश्चितच जड व प्रगतिपराङ्मुख असेल. अशा व्यवस्थेत गुलामगिरी, धर्मांधता व असहिष्णुता या पुरातन अनिष्ट गोष्टी परत फोफावतील व बहुसंख्य मानवजातीवर अत्यंत हीनदीन अवस्था ओढवेल. माझ्या मते ही आपत्ती टाळण्यासाठी आपण सदैव दक्ष राहावे या गोष्टीला अतिशय महत्त्व आहे. याकरिताच मानवी विकासासाठी व्यक्तीचे मूल्य फार आहे यावर भर

देणे ही गोष्ट, पूर्वीच्या इतर कुठल्याही काळी नव्हती इतकी या काळी अधिक निकडीची आहे.

दुसरीही एक भ्रामक समजूत आपण टाळणे महत्त्वाचे आहे. मी प्रारंभी विवेचन केल्याप्रमाणे, मानवाचा अनुवंशिक प्रकृतिधर्म लक्षावधी वर्षांनंतरही फारसा बदललेला नाही हे सत्य आहे असे मला वाटते. परंतु अनुवंशिक प्रकृतिधर्म हा आधुनिककालीन मानवाच्या मनोरचनेचा फारच लहानसा भाग आहे. त्यावरून, जगात युद्धे झाली नाहीत तर माणसांच्या मनात एक सहजप्रवृत्तीच्या स्वरूपाची विफलतेची जाणीव घर करीत राहीलच असा निष्कर्ष कोणी काढू नये. १८१४ पासून, म्हणजे जवळजवळ चार पिढ्यांच्या काळात, स्वीडन देशाने कोणाशी युद्ध केलेले नाही, परंतु त्यामुळे स्वीडिश जनतेच्या सहजप्रवृत्ती अतृप्त राहिल्या आहेत आणि जीवनात काही न्यूनत्व राहिलेले आहे असे कोणी म्हणू शकेल असे मला वाटत नाही. युद्धाचा मार्ग कायमचा सोडून देण्यात मानवजातीला यश आले तर जिवावर उदार होऊन साहस व शौर्य गाजावण्याची संधी माणसाला देणारे पर्याय शोधून काढणे अवघड नाही. जुन्या मार्गांनी जीवनशास्त्रीय हेतूंची पूर्ती एकेकाळी होत होती, पण आज त्या हेतूंची पूर्तता त्या मार्गांनी होत नाही. आणि त्यासाठी नवीन मार्ग काढणे आवश्यक आहे. हिंस्र रानटीपणा आपण कायमचाच जीवनाचा एक भाग म्हणून स्वीकारला पाहिजे अशीच मूळ मानवप्रवृत्तीची घडण आहे असे नाही. आपल्या ह्या काहीशा हिंस्र वा तामसी प्रेरणांचे अस्तित्वच आपण नाकारू लागतो किंवा त्यांच्याविषयी भ्रामक समजुती करून घेतो, तेव्हाच त्या धोकेबाज ठरतात. ही चूक जर आपण केली नाही, तर त्या प्रेरणांना सत्त्वशील समाजव्यवस्थेत वाव देण्याचा प्रश्न आपण प्रतिभा आणि सद्भाव यांच्या साहाय्याने सोडवू शकू.

व्याख्यान तिसरे

# व्यक्तिमत्त्वाचे कार्य

काही अशा प्रेरणा व कामना आहेत की ज्या समाजातील काही व्यक्तींमध्येच आढळतात. समाजाच्या चांगल्या व वाइटाच्या —दोन्ही दृष्टींनी त्या प्रेरणांचे महत्त्व असल्यामुळे मी या प्रकरणात त्यांचा विचार करणार आहे. अत्यंत प्राचीन काळच्या टोळ्यांमध्ये अशा प्रेरणा व कामना यांचे कार्य अगदी अल्प असते. शिकार व युद्ध ही अशा प्रकारची कार्ये आहेत की त्यांत एका व्यक्तीपेक्षा दुसरी व्यक्ती अधिक यशस्वी होऊ शकेल. परंतु त्या कार्याचे उद्दिष्ट अशा समाजामध्ये सामुदायिक असते आणि एकाचे यश ते सर्वांचे यश असते. जोपर्यंत व्यक्तीची उत्स्फूर्त कार्ये त्याच्या जमातीतील इतरांना योग्य वाटतात आणि त्या कार्यात त्या व्यक्तींबरोबर जमातीतील इतर व्यक्तीही सहभागी असतात, तोपर्यंत त्या व्यक्तीच्या स्वयंप्रेरणेला जमातीकडून फारशा मर्यादा घातल्या जात नाहीत आणि त्याची सर्वांत अधिक उत्स्फूर्त कार्येसुद्धा वर्तणुकीच्या शिष्टसंमत साच्याला धरूनच असतात.

परंतु जसजसा मानव अधिकाधिक प्रगल्भ बनत जातो तसतशी एका व्यक्तीची कार्ये दुसऱ्या व्यक्तीच्या कार्यांपासून वेगळी होत जातात, अशा अवस्थेतील समाजालाही, त्याची जर भरभराट व्हावयाची असेल तर, शिष्टसंमत साच्यात न बसणाऱ्या व्यक्तीची, काही प्रमाणात, गरज असते. कला, नीती, विचार या सर्व क्षेत्रांतील प्रगती ही असे आगळे व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तींच्या कार्यावर आजवर अवलंबून राहिलेली आहे. रानटी अवस्थेतून समाजाला सुसंस्कृत बनविण्यात अशा व्यक्तींचे कार्य निर्णायक राहिले आहे. जर एखाद्या समाजाची प्रगती व्हावयाची असेल तर अशा आगळ्या, अलौकिक व्यक्तींची समाजाला फार जरुरी असते. या व्यक्तींकडून घडणाऱ्या कार्यांचे स्वरूप असे असते की, ती कार्यें उपयुक्त असली तरी, सर्वांनी ती कार्ये करणे अहिताचे असते. अतिशय सुसंघटित समाजात नेहमीच अशा व्यक्तींच्या कार्यात फाजील अडथळा आणण्याची प्रवृत्ती आढळते. या उलट समाजाने जर कोणतेच नियंत्रण ठेवले नाही तर ज्या वैयक्तिक स्वयंप्रेरणेतून एखादा मोठा संशोधक निर्माण होण्याची शक्यता असते त्याच प्रेरणेतून एखादा अट्टल गुन्हेगारही निर्माण होऊ शकतो. दोन विरोधी गोष्टींत समतोल राखणे, सुवर्णमध्य साधणे हीच आपली नेहमीची समस्या असते, तीच इथेही आहे. स्वातंत्र्याचा संकोच झाला की जडता निर्माण होते. आत्यंतिक स्वातंत्र्य अराजक निर्माण करते.

एखादी व्यक्ती आपल्या समूहातील इतर बहुतेक सर्व व्यक्तींपेक्षा पुष्कळ प्रकारांनी भिन्न असू शकते. कदाचित ती व्यक्ती अत्यंत उच्छृंखल किंवा गुन्हेगारवृत्तीची असेल; किंवा ती दुर्मिळ कलागुणांनी संपन्न असेल किंवा धर्म आणि नीती यांच्या क्षेत्रात नवदर्शन देण्याची दृष्टी तिच्यात असेल; किंवा ती अलौकिक बुद्धिमान असेल. एकंदरीत

प्राचीन काळापासून माणसांमध्ये काही प्रमाणात कार्यभिन्नता होती असे दिसते. पीरॅनीज पर्वतराजीमधील गुहांतून अतिप्राचीन पॅलिओलिथिक मानवांनी काढलेली चित्रे कलात्मक दृष्ट्या फार वरच्या दर्जाची आहेत. आणि त्या कालांतील सर्वच व्यक्ती तशी उत्कृष्ट चित्रे काढू शकत होत्या असे खासच म्हणता येणार नाही. जास्त शक्यता अशीच दिसते की ज्या व्यक्तींच्या अंगात ही कला होती त्या व्यक्तींना चित्रे काढण्यासाठी मागे राहावयाची परवानगी देऊन टोळीतील इतर व्यक्ती शिकार करीत. टोळीचा मुख्य व टोळीचा पुरोहित या दोन व्यक्तींची निवड फार प्राचीन काळापासूनच त्याच्या अंगच्या काही खर्‍याखुर्‍या किंवा काल्पनिक विशेष शक्तींसाठी केली जात असली पाहिजे. मांत्रिक अभिचार करू शकत आणि टोळीचे प्राणतत्त्व एका विशिष्ट अर्थाने टोळीप्रमुखांच्या शरीरात वास करीत असे. परंतु प्राचीन काळापासूनच अशा प्रकारच्या प्रत्येक कार्याला कायमचा संस्थात्मक साचा देण्याची प्रवृत्ती आढळून येते. टोळीप्रमुखत्व वंशपरंपरागत वारसाहक्काने प्राप्त होऊ लागले, मांत्रिक लोकांची एक वेगळी जातच बनली आणि त्यावेळचे गीतकार म्हणून मान्यता मिळालेले फिरस्ते गायक हे त्यावेळचे राष्ट्रकवीच होते. समाजाच्या प्रगतीस अलौकिक हातभार लावणाऱ्या व्यक्तींच्या स्वभावात काही विशिष्ट प्रकारचे गुण असावे लागतात. काहीशी बेदरकार वृत्ती, सामान्य जनांपासून वेगळेपणाची एकलकोंडी वृत्ती, आणि काही दुर्लभ उत्स्फूर्त प्रेरणांच्या पूर्ण आहारी जाण्याची वृत्ती हे ते गुण होत. या गुणांची उपयुक्तता सर्वांना सहजपणे आकलन होत नाही आणि त्यामुळे या बाबतीतली सर्वसामान्य समाजाची जाण नेहमीच फार कमी राहिली आहे.

अलौकिक व्यक्तीचा आणि समाजाचा संबंध आजवरच्या इतिहासात

काय राहिला आहे आणि आजच्या काळात कशा स्वरूपाचा आहे आणि कोणत्या परिस्थितीत त्या व्यक्तीच्या अलौकिक गुणांचा समाजाला सहजपणे लाभ मिळू शकतो, या विषयीचे माझे विचार मी या व्याख्यानात मांडणार आहे. मी प्रथम कलेच्या क्षेत्रात या प्रश्नाचे स्वरूप कसे असते याचे विवेचन करीन. नंतर आपण धर्म, व नीती आणि शेवटी विज्ञान या क्षेत्रांतील या प्रश्नाचे स्वरूप पाहू.

पूर्वी निरनिराळ्या काळी कलावंताने समाजजीवनात मौलिक कामगिरी बजावली होती. सध्याच्या काळी तो तितकी मौलिक कामगिरी बजावत नाही असे दिसून येते. हल्लीच्या काळात राष्ट्रकवींचा उपहास करण्याचीच प्रवृत्ती दिसून येते, कवी हा, सर्वसामान्य क्षुद्र पोटार्थी लोकांना ज्याची चव नाही असे काही खास वेगळे सांगणारा शिखरावरचा एकाकी प्राणी आहे, असा कवीकडे पाहण्याचा आज दृष्टिकोण आहे. पूर्वीच्या काळी यापेक्षा फार वेगळी परिस्थिती होती. होमर, व्हर्जिल आणि शेक्सपियर हे राजकवी होते, आणि आपल्या जमातीच्या भव्योदात्त परंपरा व वैभवशाली इतिहासकाल यांचे गुणगान त्यांनी केले. (शेक्सपियरच्या बाबतीत हे विधान पूर्णतः खरे नाही हे मला मान्य आहे, परंतु त्याच्या ऐतिहासिक नाटकांना हे विधान निश्चितपणे लागू पडते.) वेल्श गीतकारांनी आर्थरराजाच्या उज्ज्वल काळाची स्मृती जागृत ठेवली, आणि त्याच्यावर पुढे इंग्लिश व फ्रेंच साहित्यिकांनी महाभारते रचिली. त्यांना दुसऱ्या हेन्रीने साम्राज्यवादी कारणांसाठी प्रोत्साहन दिले. पार्थेनॉन व मध्ययुगीन धर्ममंदिरे यांचे सौंदर्य सार्वजनिक वास्तूशी निगडित होते. संगीतकलेचा उपयोग प्रणयाराधनासाठी होऊ शकत असला तरी, तिचे मुख्य कार्य युद्धाच्या वेळी सैनिकांच्या अंगात वीरश्री निर्माण करण्याचे होते आणि फक्त याच कामासाठी संगीताचा उपयोग कायद्याने

निर्बंधित करावा असे प्लेटोचे मत होते. गतेतिहासातील कलावंतांच्या या वैभवशाली सार्वजनिक भूमिकेचा मागमूस केवळ हायलंडर्स रेजिमेंटमधल्या पायपरमध्ये उरला आहे. अजूनही आपण कलावंताला मान देतो, परंतु आपण त्याला समाजापासून वेगळा काढतो. कला ही एक समाजजीवनापासून अलग गोष्ट आहे, असे आपण मानतो, ती समाजजीवनाचे एक अविभाज्य अंग आहे या दृष्टीने आपण तिच्याकडे पाहात नाही. कलावंतांपैकी फक्त एका वास्तुशिल्पज्ञालाच कलावंताचे प्राचीन प्रतिष्ठेचे स्थान काही प्रमाणात आजही दिले जाते. याचे कारण त्याची कला समाजाला अद्यापिही उपयुक्त असे कार्य करते.

पूर्वीइतके आज कलावंताचे सामाजिक कार्य महत्त्वाचे राहिलेले नाही, हे एकच कलेचा आजच्या काळात क्षय होण्याचे कारण नाही. तर उत्स्फूर्त आनंद उपभोगता येणे ही गोष्ट आज कोणालाही फारशी महत्त्वाची वाटत नाही, हेही त्याचे एक कारण आहे. सभ्यतेचे फाजील संस्कार न झालेल्या लोकांमध्ये आजही लोकनृत्ये आणि लोकसंगीत ही भरभराटीच्या अवस्थेत आहेत, आणि अशा लोकांपैकी बहुतेकांच्या हृदयांत कवी वास करीत असतो. परंतु मानवी जीवन औद्योगीकरणाने आखीव व साचेबंद झाले की बाल्यावस्थेतील सहज आनंदाला प्रौढ माणसे अंतरतात. कारण ‘पुढे काय’ या गोष्टीच्या चिंतेने ती कायम व्यग्र असल्याने वर्तमानातला क्षण ते स्वतःला पूर्णपणे विसरून उपभोगू शकत नाहीत. ‘पुढे काय’ या गोष्टीची सतत चिंता करण्याच्या संवयी-इतकी, सर्व प्रकारच्या उत्कृष्ट कलात्मक निर्मितीला दुसरी कुठलीही गोष्ट अधिक मारक नाही. खऱ्या मौलिक अर्थाने कला जिवंत राहावयाची असेल तर, सरकारी आश्रयाने अकादमी स्थापून ते कार्य साध्य होणार नाही, तर त्यासाठी जीवनातील आनंद आणि दुःख

उत्कटपणे अनुभवण्याची शक्ती पुन्हा मिळविली पाहिजे. भविष्याचा विचार आणि सावधवृत्ती यांमुळे आज ही शक्ती बहुशः नष्टच झाल्यासारखी आहे.

मानवजातीने थोर सुपुत्र म्हणून सर्वोच्च मान दिलेल्या व्यक्ती धर्म आणि नीती यांच्या क्षेत्रांत प्रवर्तन करणाऱ्या होत्या. नंतरची अनेक शतके लोकांनी त्यांची पूजा केली असली तरी, त्यांच्या काळी त्यांपैकी बहुतेकांना समाजाच्या कमीजास्त विरोधाला तोंड द्यावे लागले आहे. क्रूर चालीरीतींना केलेला विरोध आणि मानवी सहानुभावाच्या कक्षा वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न यांतूनच नैतिक विकास होत आलेला आहे. ग्रीक लोकांतील नरबळीची प्रथा ज्ञात लिखित इतिहासाच्या प्रारंभकाळी बंद पडली. 'आपल्याला केवळ स्वतंत्र ग्रीक लोकां-विषयीच सहानुभूती असून चालणार नाही, तर रानटी लोक किंवा गुलाम यांच्याविषयी, किंबहुना सर्व मानवमात्राविषयी आपल्याला सहानुभूती वाटली पाहिजे' अशी शिकवण स्टॉइकपंथीयांनी दिली. हेच तत्त्वज्ञान बौद्ध व ख्रिश्चन धर्मांनी फार दूरवर नेऊन पोहोचविले मुळात धर्म हे जमातीच्या संघट्टनाचे एक साधन होते. धर्माचा उपयोग जमातीमध्ये अंतर्गत एकीची भावना निर्माण करण्यासाठी होई तितकाच इतरधर्मीय, परक्या जमातींविषयी शत्रुत्वाची भावना निर्माण करण्यासाठी होत असे. हळूहळू धर्म अधिकाधिक विशाल होत गेला. आणि रानटी नीतिमत्तेच्या संकुचित मर्यादा ओलांडून बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागला. यामुळे धर्मप्रवर्तन करू पाहाणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या काळात समाजाने वाळीत टाकले असले, त्यांच्याकडे घृणेच्या दृष्टीने पाहिले असले, तर यात काहीच नवल नाही. कारण सूडाचे खुनशी समाधान व युद्धातला आनंद यांपासून लोकांना त्यांची शिकवण परावृत्त करू पाहात असे. रानटी, हिंस्र शौर्य हा एक मोठा

गुण समजला जात होता, तेच हिंस्र शौर्य धर्माच्या शिकवणुकीनुसार पाप आहे असे सांगितले जाऊ लागले. अशा रीतीने नीतिमत्ता आणि सहजप्रेरणेचे जीवन या दोहोत खोलवर जाऊन पोचणारे द्वैत निर्माण झाले. हीच गोष्ट वेगळ्या प्रकारे सांगावयाची तर, ज्या लोकांमधील मानवतेची भावना अधिक बलवान होती त्यांची नीतिमत्तेची शिकवण व ज्या लोकांची सहानुभूती आपल्या जमातीच्या पलीकडे जाऊ शकत नव्हती त्यांची पूर्वापार चालत आलेली नीतिमत्ता या दोन्हींमध्ये एक खोल दरी निर्माण झाली.

धर्म आणि नीती या क्षेत्रांमध्ये नवीन पथदिग्दर्शन करणाऱ्या व्यक्तींचा मानवाच्या जीवनावर प्रचंड परिणाम झालेला आहे. या ठिकाणी हे मान्य केले पाहिजे की, अनेकदा हा परिणाम त्यांना अपेक्षित अशा प्रकारचा झालेला नाही. तरी पण तो परिणाम सर्वसाधारणतः अत्यंत उपकारक ठरलेला आहे. ही गोष्ट खरी की, जगातील ज्या काही महत्त्वाच्या प्रदेशांत नैतिक मूल्ये दृढमूल झालेली आहेत असे आपण सामान्यपणे समजत होतो, त्या प्रदेशांचा नैतिक अधःपात झालेला या शतकात आपण अनुभवला आहे. नैतिक मूल्यांचा ऱ्हास ही तात्कालिक घटना ठरेल, आणि नैतिक मूल्ये पुनरपि दृढमूल होतील अशी आपण आशा करू या. गुलामगिरीच्या प्रथेची मान्यता नाहीशी झाली, युद्धकैद्यांविषयी आपले काही कर्तव्य आहे याची जाणीव निर्माण झाली, पुरुषांच्या स्त्रियांवरील अनियंत्रित सत्तेला मर्यादा पडली आणि विजेत्यांनी जित लोकांचे केवळ आपल्या स्वार्थासाठी शोषण केले तर ते उचित ठरणार नाही हे, अस्पष्टसे का होईना, परंतु मान्य केले गेले, या गोष्टींचे श्रेय 'नीतिकल्पना जमातीपुरत्या मर्यादित नसून त्या सार्वत्रिक, जागतिक असतात' हे ज्यांनी शिकविले त्यांच्याकडेच जाते. नीतिकल्पनांचा

हा विकास आज पुन्हा प्रादुर्भूत झालेल्या प्राचीन क्रूरवृत्तीमुळे धोक्यात आला आहे हे मान्य केले पाहिजे. परंतु क्रूरवृत्तीचा प्रादुर्भाव ही तात्कालिक विकृती ठरेल आणि नीतिमूल्यांत झालेल्या ह्या प्रगतीला मानवजात कायमची मुकणार नाही असे मला वाटते.

ज्या द्रष्ट्यांनी आणि साधुसंतांनी ह्या नैतिक प्रगतीचा पाया घातला, त्यांचा त्यांच्या काळात सन्मान जरी झाला नाही तरी त्यांना त्यांच्या कामात पद्धतशीर प्रतिबंध झाला नाही. या बाबतीत आधुनिक हुकुमशाही राष्ट्रांतील परिस्थिती सॉक्रेटीसकालीन परिस्थितीपेक्षा किंवा ख्रिस्तधर्माच्या उदयकालीन परिस्थितीपेक्षा वाईट आहे. आधुनिक हुकुमशाही राष्ट्रांत, ज्या सुधारकाच्या कल्पना शासनाला मान्य होत नाहीत त्या सुधारकाला केवळ यमसदनास पाठविले जाते एवढेच नाही, (तत्त्वासाठी शूर माणूस मरणही खुषीने पत्करील) परंतु त्याचे विचार प्रकाशात येऊ नयेत याचा हुकुमशाही पुरता बंदोबस्त करते आणि ही अधिक वाईट गोष्ट आहे. अशा समाजात नव्या कल्पना फक्त शासनाकडूनच प्रसृत केल्या जाऊ शकतात आणि पूर्वीच्या काळाप्रमाणेच आजही, आपल्या हितास विरोधी अशा सुधारणांना शासन मान्यता देईल अशी शक्यता फारच कमी. हुकुमशाही राष्ट्रांत बौद्ध धर्माचा किंवा ख्रिश्चन धर्माचा उदय यांसारखी घटना घडून येणे अशक्यप्राय आहे, आणि असामान्य शौर्याच्या नैतिक सुधारकाला देखील तशा देशांत आपला थोडादेखील प्रभाव पाडता येणार नाही. मानवाच्या इतिहासात ही एक नवीन घटना आहे. शासनाच्या आधुनिक कार्यपद्धतीमुळे शासनाची नागरिकांवरील पकड फार बळकट झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. ही एक अत्यंत गंभीर गोष्ट आहे, आणि हुकुमशाही शासन नैतिक प्रगतीला कसे प्राणघातक ठरते हे यामुळे दिसून येते.



२५८३८

कला किंवा धर्म आणि नीती या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या व मनःसामर्थ्याच्या व्यक्तीला आज पूर्वीच्या काळातील थोर पुरुषांच्या तोडीचे कार्य करता येणार नाही किंवा समाजावर स्वतःचा त्यांच्याइतका खोलवर प्रभाव पाडता येणार नाही. मात्र कर्तृत्व गाजविण्याचे आणि समाजावर प्रभाव पाडण्याचे चार मार्ग त्याला आजही उपलब्ध आहेत. तो लेनिनसारखा थोर राजकीय नेता होऊ शकतो. रॉकफेलरप्रमाणे औद्योगिक क्षेत्रात प्रचंड सत्ता हाती गोळा करू शकतो; अणुशास्त्रज्ञाप्रमाणे शास्त्रीय शोध लावून तो जगाची उलथापालथ करून टाकू शकतो; किंवा जर त्याच्यात एवढी कुवत नसेल वा या मार्गांनी जाण्याची संधी नसेल तर, त्याच्यातील उर्मी, इतर अवसर न मिळाल्यामुळे त्याला गुन्हेगार होण्याकडे प्रवृत्त करील. कायद्याच्या नजरेत गुन्हेगार ठरणाऱ्यांना जगाच्या इतिहासाच्या प्रवाहावर प्रभाव फार क्वचित टाकता येतो, आणि म्हणून अतिशय महत्त्वाकांक्षी माणूस, त्याला संधी मिळाली तर गुन्हेगार होण्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या व्यवसायाची निवड करील.

शासनसंस्थेत शास्त्रज्ञांना प्राप्त झालेले महत्त्वाचे स्थान ही आजच्या युगातील एक विशेष घटना आहे. इतर सर्व सुधारकांप्रमाणेच, स्वतःला मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनाही झगडावे लागले. काहींना हद्दपार करण्यात आले. काहींना जिवंत जाळण्यात आले; काहींना अंधार-कोठडीची सजा मिळाली; तर काहींची फक्त पुस्तके जाळण्यावरच सुटका झाली. पण कालांतराने शासनसंस्थेला शक्तिमान बनविण्याची विद्या शास्त्रज्ञांना अवगत असल्याचे भान होत गेले. फ्रेंच क्रांतिकारकांनी आधी लावासियेचा चुकून शिरच्छेद केला, परंतु नंतर त्याच्या इतर सहकाऱ्यांची स्फोटक युद्धसाहित्याच्या निर्मितीच्या कामी नेमणूक केली. मानवजातीच्या कल्याणार्थ आपल्या ज्ञानाचा उपयोग

करण्याचे सोडून एका शासनाच्या सेवेत आपली बुद्धी लावण्यास शास्त्रज्ञांना वश करता आले, आणि अशा प्रकारे शास्त्रज्ञांच्या स्वाभाविक मानवतानिष्ठेला वेसण घालता आली, तर आधुनिक युद्धात शास्त्रज्ञ नागरिक सर्वात अधिक मोलाचा असतो हे आज सर्वच प्रगत शासनांनी ओळखलेले आहे.

चांगल्या आणि वाईट दोन्ही दृष्टींनी आजच्या युगाचे पूर्वीच्या सर्व युगांहून असलेले सर्व प्रकारचे वेगळेपण हे विज्ञानामुळे निर्माण झालेले आहे. दररोजच्या जीवनात आपल्याला वापरावयास विजेचे दिवे आहेत, रेडिओ आहे, सिनेमा आहे. उद्योगांच्या क्षेत्रांत आपण मोठमोठ्या यंत्रांचा वापर करतो, आणि वीजेचा किंवा इतर शक्तींचा उपयोग करतो. या सर्व गोष्टी विज्ञानामुळेच शक्य झालेल्या आहेत. श्रमशक्ती अधिक उत्पादनक्षम झाल्यामुळे पूर्वीपेक्षा आपली बरीच मोठी शक्ती आपण युद्धाची तयारी करण्यात आणि युद्धे खेळण्यात घालवू शकतो. त्याचप्रमाणे पूर्वी मुलगा वयात आला की त्याला कामाला लावावा लागत होता. आता त्याला वयात आल्यावरही शाळांतून किंवा महाविद्यालयांतून अधिक काळ शिक्षण आपण देऊ शकतो. विज्ञानामुळेच आपण सत्य आणि असत्य, दोन्हीचा प्रसार वर्तमान-पत्रांतून आणि रेडिओवरून सर्वत्र करू शकतो. तसेच शासनाची ज्या व्यक्तींवर नाराजी होते त्या व्यक्तींना शासनाच्या तावडीतून निसटणे ही गोष्ट पूर्वीपेक्षा विज्ञानामुळेच फार कठीण कर्म होऊन बसली आहे. आजचे आपले सर्व दैनंदिन जीवन आणि आपली सामाजिक व्यवस्था ही विज्ञानाने घडविलेली आहे. आजच्या काळात विज्ञानातील या प्रचंड प्रगतीला शासनसंस्थेचा आश्रय चालू आहे. परंतु विज्ञानाची मूळ वाढ झाली तेव्हा शासनाच्या विरुद्ध विज्ञानाला झगडावे लागले. आज रशियासारख्या, जिथे शासनसंस्था परत पूर्वीच्या धर्तीवर

रचलेली आहे अशा, राष्ट्रांत विज्ञान आणि शासनसंस्था यांच्यातील जुना झगडा परत पुन्हा उद्भवला असता; परंतु पूर्वीच्या काळातील हुकुमशहा स्वप्नातसुद्धा जेवढ्या सत्तेची कल्पना करू शकले नसते, इतक्या मोठ्या प्रमाणात त्या राष्ट्रातील शासनसंस्था सर्वशक्तिमान आहेत, म्हणूनच असा संघर्ष उद्भवलेला नाही.

पूर्वी विज्ञानाला विरोध झाला यात काही नवल नाही. सृष्टीविषयी शास्त्रज्ञांनी सांगितलेल्या गोष्टी त्यावेळपर्यंत लोकांनी मानलेल्या गोष्टींच्या विरुद्ध होत्या. त्यांनी जुन्या-पुराण्या कल्पना उधळून लावल्या आणि त्यामुळे शास्त्रज्ञ कशाविषयीही पूज्यभाव बाळगीत नाहीत अशीच सर्वांची समजूत झाली. सूर्य ही तापल्यामुळे लालभडक झालेली एक शिला आहे आणि चंद्र हा मातीचा गोळा आहे असे अनाक्झागोरस याने सांगितले. परंतु ह्या त्याच्या उद्धतमूर्ख पाखंडी-मतासाठी त्याला अथेन्समधून हाकून लावण्यात आले. कारण सूर्य हा एक देव आहे व चंद्र ही एक देवता आहे ही गोष्ट सर्वांच्या माहितीची नव्हती काय? विज्ञानामुळे निसर्गातील शक्तींवर प्रभुत्व प्राप्त करण्यात माणसाला यश मिळते हे लक्षात आल्यामुळेच हळूहळू शास्त्रज्ञांना असलेला विरोध कमी झाला. ही क्रिया सुद्धा फार मंदगतीने झाली, कारण सुरुवातीच्या काळी त्यांचे निसर्गावरील प्रभुत्व हे चेटुकगिरीचे लक्षण समजण्यात येई.

अण्वस्त्रांचे मानवी जीवनावर होत असलेले घातुक परिणाम व त्यांपासून व जंतुयुद्धापासून मानवी जीविताला असलेला धोका पाहून एखादी जोरदार विज्ञान-विरोधी चळवळ आजच्या काळात सुरू झाली तर फारसे आश्चर्य वाटावयास नको. परंतु अशा प्रकारच्या भीषण परिणामांविषयी लोकांच्या भावना काहीही असल्या तरी, जोपर्यंत युद्ध होण्याची शक्यता आहे तोपर्यंत तरी शास्त्रज्ञांना विरोध

करण्याची शहामत त्यांना होणार नाही, कारण युद्धात जर एका बाजूकडे शास्त्रज्ञ असतील व दुसऱ्या बाजूकडे नसतील, तर युद्धात पहिली बाजू निश्चितच जिंकेल.

विज्ञानाचे दोन पैलू आहेत. एक ज्ञानात्मक आणि दुसरा तंत्रात्मक. ज्ञान या दृष्टीने विज्ञानाचे मोल निर्विवाद आहे, पण तंत्र या दृष्टीने विज्ञानाचा गौरव करावयाचा की निंदा हे त्या तंत्राचा जसा उपयोग करून घेतला जाईल त्यावर अवलंबून आहे. मूलतः विज्ञान तटस्थ आहे, ते चांगलेही नाही व वाईटही नाही आणि काय चांगले व काय वाईट या विषयीच्या आपल्या अंतिम कल्पना विज्ञान देऊ शकणार नाही. त्या आपल्याला इतरत्रच पारखून घ्याव्या लागतील.

आधुनिक जीवनावर शास्त्रज्ञांचा प्रभाव सर्वगामी असला तरी, काही बाबतीत राजकीय नेत्यांपेक्षा शास्त्रज्ञांची सत्ता कमी आहे. ऐतिहासिक कालातील इतर कुठल्याही कालखंडापेक्षा आज राजकारणी पुरुषांचा प्रभाव फारच अधिक आहे. ह्या राजकारणी लोकांचे आणि शास्त्रज्ञांचे संबंध 'अरेबियन नाइटस्'मधल्या जादूगाराच्या हातातल्या, सांगितलेले कुठलेही काम करणाऱ्या बाटलीतल्या राक्षसाप्रमाणे आहेत. हा राक्षस वाटेल त्या अद्भुत गोष्टी करू शकतो, आणि या गोष्टी त्याच्या मदतीशिवाय जादूगाराला करता येणार नाहीत अशा असतात, परंतु ही कामे तो सांगकाम्यासारखा जादूगारासाठी म्हणून करतो, स्वयंप्रेरणेने करीत नाही. आजच्या काळातील अणुशास्त्रज्ञांचेही असेच आहे. कुठलेतरी सरकार त्यांना त्यांच्या घरातून किंवा जहाजावरून अर्ध्या वाटेवरून पकडून नेते, आणि त्यांच्या दैवगतीप्रमाणे ते ज्या सरकाराच्या ताब्यात गेले असतील त्या सरकारसाठी त्यांना गुलामाप्रमाणे काम करावे लागते. यशस्वी राजकारणी पुरुषावर मात्र असा कोणताच दबाव नसतो. लेनिनचे जीवनचरित्र आपल्या काळातील सर्वात

अद्भुत होय. झारच्या सरकारने त्याच्या भावाला फाशी दिल्यानंतर, कितीतरी वर्षे लेनिनला दारिद्र्यात व निर्वासित अवस्थेत घालवावी लागली. परंतु नंतर काही महिन्यांच्या कालातच तो जगातील मोठ्यातील एका मोठ्या शासनसंस्थेचा सत्ताधीश बनला. आणि ही सत्ता झरझिस किंवा सीझर यांच्याप्रमाणे ऐषाराम भोगण्यासाठी वा स्तुतिस्तोत्रे ऐकण्यासाठी नव्हती; मात्र लेनिन झाला नसता तर कोणी तरी रशियात तशी सत्ता उपभोगीत राहिला असता. मनात आदर्श समाजरचनेची जी काही रूपरेषा होती त्याप्रमाणे एका विराट देशाचे शिल्प घडविण्याची सत्ता लेनिनची होती. प्रत्येक मध्यमवर्गीयाचे जीवन अमूलाग्र बदलून टाकणारी ती सत्ता होती. एक अगदी नवीन प्रकारची समाजघटना निर्माण करावयाची सत्ता लेनिनची होती. समाजसंघटनेचा हा प्रकार एका नव्या युगाचे प्रतीक बनला. काहींनी या जीवनपद्धतीचा गौरव केला, अनेकांनी तिची निर्भत्सना करून तिला वाळीत टाकले, परंतु तिची दखल सर्वांनाच घ्यावी लागली. कुठल्याही सत्तापिपासू माणसाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेने स्वप्नातदेखील इतकी पराकोटी गाठली नसती. नेपोलियन म्हणाला होता की, संगीनीच्या जोरावर काहीही करता येते, फक्त तिच्यावर बसता येत नाही; परंतु लेनिनने हा अपवादही खोडून काढला.

जगाच्या इतिहासातील जी असामान्य महाकाय माणसे ठळकपणे नजरेत भरतात, त्यांपैकी काही जगाची हितकर्ती होती. तर काहींनी याच्या अगदी उलट परिणाम साधला. थोर धार्मिक आणि नैतिक सुधारकांसारख्या काही व्यक्तींनी, लोकांची एकमेकांविषयीची वैरभावना कमी व्हावी आणि सहानुभूतीची भावना विशाल व्हावी, म्हणून आपापल्या कुवतीनुसार प्रयत्न केले. इतरांनी, उदाहरणार्थ शास्त्रज्ञांनी, निसर्गातील प्रक्रियांचे ज्ञान करून दिले.

ह्या ज्ञानाचा कितीही गैरवापर होत असला तरीही त्या ज्ञानाचे स्वयंभू मूल्य श्रेष्ठच म्हटले पाहिजे. थोर कवी, संगीतकार किंवा चित्रकार यांसारख्या काहींनी जगात सुंदर व भव्य कृतींची निर्मिती केली आहे. मानवाच्या नशिबी असलेला भोग सुसह्य करण्यात, निराशेच्या क्षणी मनाला दिलासा देण्यात, या कृतींचा वाटा फार मोठा आहे. परंतु दुसऱ्या काही तेवढ्याच कर्तृत्ववान व तेवढ्याच प्रभावी व्यक्तींची कृती याच्या अगदीच उलट घडली आहे. उदाहरणार्थ चेंगीजखान होऊन गेल्यामुळे मानवजातीला काहीही लाभ झालेला मला आढळत नाही. तसेच रॉब्सपियरने मानवजातीचे काही हित केले असले तर मला माहीत नाही. आणि व्यक्तिशः माझ्यापुरते तरी, लेनिनविषयीही कृतज्ञ राहण्यासारखे त्याने काही केले आहे असे मला वाटत नाही. परंतु या सर्वच, सुष्ट आणि दुष्ट व्यक्तींमध्ये चैतन्य, स्वयंप्रेरणा, मनःसामर्थ्य, स्वतंत्र प्रज्ञा आणि प्रतिभा, द्रष्टेपणा हे गुण होते. आणि हे गुण जगातून नाहीसे झालेले पाहण्याची माझी तरी इच्छा नाही. ज्या माणसात हे गुण वास करतात तो माणूस जगाचे फार भले करू शकतो किंवा फार वाईट करू शकतो. मानवी जीवन नीरस व्हावयास नको असेल तर अशा अलौकिक व्यक्तींच्या कार्यास वाव मिळाला पाहिजे. अर्थात जगाच्या कल्याणाकरिताच अशा लोकांचे गुण कामी पडावेत अशी व्यवस्था असती तर बरे झाले असते. एखाद्या मोठ्या गुन्हेगाराची मनोवृत्ती आणि एखाद्या थोर राजकारणी पुरुषाची मनोरचना यांमध्ये कदाचित आपल्याला वाटतो तितका फरक नसेलही. एखाद्या जादूगाराने कॅप्टन किड आणि जगज्जेता शिकंदर यांची त्यांच्या जन्माच्या वेळीच जर अदलाबदल केली असती तर दोघांनीही दुसऱ्याचे काम तितक्याच प्रभावीपणे केले असते अशी शक्यता आहे. काही कलावंतांविषयीही असेच म्हणता येईल.

वेनव्हेनुत्तो सेलिनी याच्या आत्मचरित्रावरून त्याच्याविषयी, कायद्याची बंधने काटेकोर पाळणाऱ्या सज्जन नागरिकाचे चित्र आपल्या डोळ्यांपुढे उभे राहत नाही. आधुनिक जगात—आणि अंदाजच बांधावयाचा झाला तर, नजिकच्या भविष्यकाळातील जगात तर अधिकच—एखाद्या प्रचंड संघटनेवर ताबा मिळविल्याशिवाय कुठल्याही व्यक्तीला महत्त्वपूर्ण कार्य करता येत नाही, येणार नाही. लेनिनप्रमाणे एखाद्या शासनसंस्थेचे नेतृत्व हाती घेतले, किंवा रॉकफेलरसारखी एखाद्या प्रचंड उद्योगसमूहाची मक्तेदारी हातात असली, किंवा थोरल्या पिअरपॉंट मॉर्गनप्रमाणे पैशाच्या नाड्या हातात असल्या तर माणसाला जगावर फार मोठा परिणाम करता येईल. त्याचप्रमाणे एखादी शास्त्रज्ञ व्यक्ती एखाद्या सरकारला आपले संशोधनकार्य युद्धात उपयुक्त आहे असे पटवून देऊ शकली तर जगावर परिणाम करू शकेल. परंतु पूर्वी एखादा हिब्रू प्रेषित, किंवा एखादा कवी, किंवा स्पिनोझासारखा एखादा एकाकी तत्त्ववेत्ता जगात ज्या प्रकारचे महत्त्व पावू शकत होता, तसे महत्त्व आताच्या काळी संघटनेची मदत घेतल्याशिवाय काम करणाऱ्या माणसाला मिळणे शक्य नाही. हा फरक इतर व्यक्तींप्रमाणे शास्त्रज्ञांनाही लागू आहे. पूर्वी शास्त्रज्ञांनी एकएकटे, स्वतंत्र रीतीने आपले संशोधन केले. परंतु आजच्या शास्त्रज्ञांना संशोधनासाठी अतिशय महाग साधनसामुग्री लागते, तसेच पुष्कळ मदतनीस असलेल्या प्रयोगशाळेचीही आवश्यकता भासते. या सर्व सोयी त्याला सरकारच्या कृपेनेच मिळू शकतात, किंवा अमेरिकेसारख्या संपन्न देशांत धनाढ्य लोकांच्या कृपेने मिळू शकतात. त्यामुळे तो स्वतंत्र स्वावलंबी कार्यकर्ता राहू शकत नाही. तो मूलतः एखाद्या मोठ्या संघटनेतील एक घटक बनतो. हा बदल अनिष्ट आहे. कारण ज्या गोष्टी केवळ सत्ताधाऱ्यांच्या आश्रयानेच करता येतात त्यांच्यापेक्षा

थोर व्यक्तीला एकटेपणाने करता येणाऱ्या गोष्टी समाजाच्या भल्यासाठी असण्याची शक्यता जास्त असते. मानवी जीवनावर परिणाम करावयाची इच्छा असलेल्या व्यक्तीला आज, अशा रीतीने, एकतर गुलाम बनल्याशिवाय किंवा हुकुमशहा झाल्याशिवाय आपल्या महत्त्वाकांक्षेत यशस्वी होणे कठीण आहे. राजकारणी बनून तो शासनसंस्थेची सूत्रे स्वतःकडे घेऊ शकतो, किंवा शास्त्रज्ञ होऊन स्वतःचे परिश्रम सरकारला विकू शकतो. परंतु असे केले असता त्याला शासनाने पुढे ठेवलेल्या उद्दिष्टांसाठी कार्य करावे लागते. स्वतंत्र वृत्तीने आपल्या ध्येयांसाठी काम करता येत नाही.

हे सर्व काही दुर्मिळ व अलौकिक थोरवी असणाऱ्या व्यक्तींनाच लागू आहे असे नव्हे, तर, विविध स्तरांतील बुद्धिमान व्यक्तींनाही हे विधान लागू आहे. ज्या ज्या काळात थोर कवी होऊन गेले त्या त्या काळात पुष्कळसे छोटे कवीही कविता करीत होते, आणि जेव्हा जेव्हा मोठमोठे चित्रकार होऊन गेले तेव्हा तेव्हा छोटे चित्रकारही चित्रे काढीत होते. संगीतविद्येची जर्मन समाजात फार कदर केली जात होती. या वातावरणात थोर जर्मन संगीतकार निर्माण झाले, आणि त्याच काळात लहान सहान संगीतकारांनाही आपल्याजवळील कलेचा उत्कर्ष करण्याची संधी मिळाली. त्या काळात काव्य, चित्रकला आणि संगीत या गोष्टी सर्वसामान्य व्यक्तींच्या दैनंदिन जीवनाचेही एक महत्त्वाचे अंग होत्या. सध्याच्या जीवनात खेळांनाच केवळ असे स्थान आहे. पूर्वी थोर प्रेषित होऊन गेले, त्यांच्याही भोवती अनेक छोट्या प्रेषितांचा समुदाय होता आणि त्यांच्यातूनच आपल्या अलौकिकत्वामुळे ते वेगळे उमटून दिसत होते. आज समाजाचे केंद्रीकरण आणि संघटन इतक्या कोटीला गेले आहे की वैयक्तिक स्वयंप्रेरणेला कमीत कमी वाव आहे आणि वरील दृष्टीने हल्लीचा काळ पूर्वीच्या काळाच्या तुलनेने

निकृष्ट दर्जाचा आहे हा या वैशिष्ट्याचा अटळ परिणाम आहे. पूर्वीच्या काळी जेव्हा जेव्हा कलेचा उत्कर्ष झाला तेव्हा तेव्हा तो सामान्यपणे छोट्या छोट्या जमातींत झाला. आणि त्या जमातींची त्यांच्या सारख्याच इतर नजिकच्या जमातींबरोबर स्पर्धा होती असे आढळते. ग्रीक नगरराज्ये, इटालीतील छोटी छोटी संस्थाने व अठराव्या शतकामधील जर्मनीतील छोटी छोटी राजघराणी यांची या बाबतीत उदाहरणे देता येतील. जर्मनीतील प्रत्येक संस्थानिकाच्या पदरी एक एक संगीतकार असावयाचाच, आणि त्यातलाच एखादा कधी काळी जॉन सेबॅस्टीअन बाख असावयाचा. परंतु इतर संगीतकार जरी तेवढे मोठे नसले तरीही स्वतःच्या कुवतीप्रमाणे अत्युच्च दर्जाचे संगीत निर्माण करण्यास ते स्वतंत्र असत. स्थानिक स्पर्धेत काही एक गुण असा आहे की जो या क्षेत्रांच्या उत्कर्षाला आवश्यक आहे. ठिकठिकाणी जी कथीड्रल्स बांधली गेली, त्यांच्या मुळाशी अशी स्पर्धा दिसून येते. प्रत्येक धर्मगुरूला आसपासच्या इतर धर्मगुरूंच्या कथीड्रलपेक्षा आपले कथीड्रल अधिक सुंदर, भव्य असावे अशी ईर्षा वाटत असे. जर प्रत्येक शहराला स्वतःच्या कलात्मक वारशाविषयी जाज्वल्य अभिमान व गर्व वाटू लागला, आणि त्यांच्यात जर त्यामुळे स्पर्धा चालू झाली, तर ती कलेच्या उत्कर्षाच्या दृष्टीने एक फार चांगली गोष्ट होईल आणि जर प्रत्येक शहरात एक स्वतःचे खास संगीताचे आणि चित्रकलेचे घराणे स्थापन झाले, (आणि त्या घराण्याला शेजारील घराण्याविषयी तुच्छता वाटेल हाही भाग त्यात आला) तर तीही कलेच्या उत्कर्षाला पोषक गोष्ट होईल. परंतु असा स्थानिक अभिमान सध्याच्या मोठमोठ्या साम्राज्यांच्या काळात आणि सोप्या व स्वैर दळणवळणाच्या काळात भरभराटणे सहजी शक्य होत नाही. अथीनियन माणसाच्या मनात

कोरिंथियन माणसाविषयी, किंवा फ्लॉरेन्सच्या नागरिकाच्या मनात व्हेनिसच्या नागरिकाविषयी, जी स्पर्धेची, तुच्छतेची, द्वेषाची भावना उत्कटपणे वास करीत असे, तशा प्रकारची भावना आज मँचेस्टरच्या नागरिकाच्या मनात शेफील्डच्या नागरिकाविषयी असत नाही. आजच्या काळात शहरांना, प्रदेशांना असे वेगळे व्यक्तिमत्त्व निर्माण होणे, व त्यांच्याविषयी लोकांच्या मनात प्रेमाची, गौरवाची, आपलेपणाची भावना व निष्ठा निर्माण होणे, या गोष्टी साध्य करण्याच्या मार्गात फार अडचणी असल्या तरी, मानवी जीवन दिवसेदिवस अधिकाधिक ठरीव साच्याचे व कंटाळवाणे व्हावयाचे नसेल तर, असा स्थानिक अभिमान व निष्ठा निर्माण करण्याचा प्रश्न समाधानकारकरीत्या सोडवावाच लागेल.

रानटी माणूस एका लहानशा टोळीचाच सभासद असे हे खरे; पण त्याच्या स्वयंप्रेरणेला त्याच्या समाजाकडून फारसा लगाम घातला जात नसे. शिकार आणि युद्ध या ज्या दोन गोष्टींत सामान्यपणे त्याला रस असे त्याच गोष्टी त्याच्या शेजाऱ्यांनाही कराव्याशा वाटत असत. आणि मांत्रिक होण्याकडे त्याचा कल असेल तर त्या व्यवसायात आधीच मान्यता पावलेल्या एखाद्या मांत्रिकाची मर्जी संपादन करून त्याची सेवा केली, म्हणजे कालांतराने त्याची अभिचाराची विद्या त्याला येई. तो अलौकिक बुद्धिमत्तेचा असला, तर तो एखाद्या शास्त्रात सुधारणा करी किंवा शिकार करण्याचे एखादे अधिक सुलभ तंत्र शोधून काढी. त्यामुळे जमातीकडून त्याला विरोध तर सहन करावा लागत नसेच, उलट त्याचे जमातीकडून स्वागतच होई. आधुनिक मानव फारच वेगळ्या प्रकारचे जीवन कंठीत आहे. तो जर रस्त्यात गाऊ लागला, तर लोक त्याला दारू पिऊन झिंगलेला समजतील. आणि तो जर रस्त्यात नाचू लागला, तर पोलीस त्याला

रहदारीला अडथळा आणल्याबद्दल अटक करतील! तो जर फारच भाग्यवान असेल तर गोष्ट वेगळी, एरवी त्याचा दिवस ठराविक एकाच प्रकारचे कंटाळवाणे काम करण्यात जातो. एक सुंदर कलाकृती म्हणून त्याच्या कामाचे चीज नसते; ते किती उपयोगाचे आहे त्यावर त्याचे मूल्य मोजले जाते. त्याचे काम संपल्यानंतर मिल्टनच्या धनगरासारखा तो "खोऱ्यातील हॉथॉर्न-वृक्षाच्या छायेत बसून जीवनाची कहाणी" सांगू शकत नाही, कारण बहुतेककरून तो राहतो त्याच्या जवळपास कुठेही निसर्गरम्य खोरे असत नाही, किंवा एखादे खोरे असेलच तर लोकांनी त्याचा उकिरडा केलेला असतो. शिवाय आपल्या चाकोरीमय जीवनात तो नेहमी उद्याच्या चिंतेने ग्रासलेला असतो. बायबलच्या साऱ्या शिकवणीपैकी ख्रिश्चन लोकांनी 'उद्याची चिंता करू नका' ह्या शिकवणुकीकडे सर्वात अधिक दुर्लक्ष केले आहे. जर तो माणूस व्यवहारी असेल तर उद्याचा विचार करून तो काहीतरी शिल्लक मागे टाकील, जर तो अव्यवहारी असेल तर आपण आपले कर्ज कसे फेडू शकू या चिंतेने तो बेचैन असेल. दोघेही त्या क्षणाचा आनंद चाखू शकत नाहीत. आज प्रत्येक गोष्ट ठरवून योजनापूर्वक केली जाते, उत्स्फूर्त अशी कुठलीच गोष्ट होत नाही. नाझी लोकांनी 'मौजेतून सामर्थ्य' अशी चळवळ उभारली, परंतु सरकारी शिक्कामोर्तबाने लुटावयाची मौज सहसा फारशी आनंददायी ठरत नाही. एरवी ज्यांची महत्त्वाकांक्षा अर्थपूर्ण झाली असती, त्यांना केंद्रीकरणामुळे वाजवीपेक्षा फार अधिक लोकांबरोबर स्पर्धेत उतरावे लागते. केंद्रीकरणामुळे अभिरुचीमध्येही फाजील एकसारखेपणा, साचेबंदपणा येतो. आज तुम्हाला चित्रकार व्हावयाचे असेल तर तुमच्या गावातील दुसऱ्या चित्रकाराशी स्पर्धा करूनच तुमचे समाधान होणार नाही. तुम्ही मोठ्या शहरांतील

चित्रकलेच्या विद्यालयात जाल. तिथे आपण अगदीच मामुली चित्रकार आहोत अशा निर्णयाला बहुधा तुम्ही याल आणि या निष्कर्षाप्रत आल्यावर कदाचित तुम्ही इतके निराश व्हाल की, आपले रंग आणि कुंचले फेकून देऊन पैसे मिळविण्याच्या मागे लागाल, नाहीतर दारूत तरी तुम्ही आपले दुःख बुडवू पाहाल. कारण, काही एका प्रमाणात आत्मविश्वास असल्याखेरीज यशस्वी निर्मिती होऊ शकत नाही. हेच रेनेसान्स इटालीत तुम्ही असता, तर तुम्ही सीना गावातले उत्तम चित्रकार होण्याची महत्त्वाकांक्षा तुम्ही बाळगली असतीत आणि ते स्थान तुम्हाला पुरेसे बहुमानाचे वाटले असते. पण आज एका लहानशा शहरात राहून मिळणाऱ्या शिक्षणावर तुम्हाला समाधान वाटणार नाही, केवळ स्थानिक शेजाऱ्याशी स्पर्धा करण्यात तुम्हांला रस वाटणार नाही. आज आपले डोके माहितीने ठासून भरलेले आहे आणि हृदय रिकामे आहे. निदान आदर्श जीवनाचा स्रोत असलेल्या सर्जनशील भावनांची आपली अनुभूती फार क्षीण आहे. जीवनात जे महत्त्वाचे त्याविषयी आपण उदासीन आहोत. क्षुद्र गोष्टींविषयी आपला उत्साह ओसंडून वाहत असतो. नीरस, चाकोरीमय कंटाळवाणे आयुष्य, आपत्ती कोसळली म्हणजे तेवढ्यापुरती जीवनात येणारी गती व चैतन्य, पुन्हा तेच कंटाळवाणे आयुष्य —असा आजचा मानवी जीवनपट बनला आहे. या परिस्थितीतून जीवनाची सोडवणूक करावयाची असेल. तर व्यक्तीच्या स्वयंप्रेरणेला पुन्हा वाव देण्याचे मार्ग शोधून काढले पाहिजेत, आणि व्यक्तीच्या स्वयंप्रेरणेला क्षुद्र, त्याचप्रमाणे महत्त्वाच्या गोष्टींतही तितकाच वाव मिळावयास पाहि.जे आधुनिक समाजसंघटनेच्या ज्या वैशिष्ट्यांमुळे मोठमोठ्या लोकसंख्येचे पोषण शक्य होत आहे, ते वैशिष्ट्यपूर्ण भाग नष्ट करावेत असे मला म्हणावयाचे नाही. परंतु संघटना ही अधिक

लवचिक असली पाहिजे, स्थानिक स्वायत्ततेतून तिच्या ठिकाणचे सत्तेचे केंद्रीकरण कमी झाले असले पाहिजे, आणि संघटनेच्या अमानुष प्रचंड आकाराने मानवी मनावर पडणारे मरणप्राय दडपण कमी झाले पाहिजे. संघटनांची वाढ फारच द्रुतगतीने झाल्याने आणि केंद्रीकरण पराकोटीला गेल्याने, आणि या परिवर्तनाच्या गतीशी आपले विचार आणि आपल्या भावना यांना आपली गती जुळवून घेता न आल्याने, आज त्यांच्या अमानुष ओझ्याखाली मानवी मन गुदमरून जात आहे.

व्याख्यान चवथे

# तांत्रिक ज्ञान व मानवी प्रकृतिधर्म यांतील संघर्ष

इतर प्राण्यांपेक्षा मानवी-प्राणी अनेक प्रकारे वेगळा आहे. त्यातील वेगळेपणाचा एक प्रकार असा की अप्रिय क्रियांनी, जर ईप्सित साध्य होणार असेल तर, त्याही माणूस करू शकतो. जीव-शास्त्रज्ञांच्या मते प्राण्यांची प्रत्येक कृती विशिष्ट कार्यसिद्धीसाठी चाललेली असते. उदाहरणार्थ पक्षी घरटी बांधतात, किंवा बीव्हर्स बांध बांधतात. परंतु ही कामे ते प्राणी सहजप्रवृत्तीनुसार करतात. त्या कृतींचा उपयोग लक्षात येऊन ते या कृती करीत नाहीत, तर निसर्गप्रेरणा त्यांना कार्यप्रवृत्त करीत असते. स्वतःचा मनोनिग्रह करण्याचे, किंवा सावधानता बाळगण्याचे, किंवा दूरदृष्टी ठेवण्याचे किंवा स्वतःच्या भावनांवर ताबा ठेवण्याचे आत्मबल त्यांना नसते. मानव मात्र आत्मबलाच्या जोरावर ह्या सर्व गोष्टी करू शकतो. पण तो जेव्हा आपल्या प्रकृतिधर्माच्या सहनशीलतेचा अंत पाहण्याच्या थरापर्यंत अशा गोष्टी करतो, त्यावेळी त्याच्यावर मानसिक ताण

पडल्याखेरीज राहात नाही. सुसंस्कृत समाजात काही प्रमाणात मानसिक ताण सहन करावा लागणे अटळ आहे. परंतु बराच ताण हा निष्कारण असून वेगळ्या प्रकारच्या सामाजिक संघटनेत तो सहन करावा लागणार नाही.

प्राचीन काळी माणसाचे उपजीविकेचे मार्ग आणि त्याच्या मानसिक सहज-प्रवृत्ती यांच्यामध्ये असा संघर्ष नव्हता. शिकार, लढाया आणि वंशवृद्धी या गोष्टी जीवितरक्षणासाठी आणि उत्क्रांतीसाठी आवश्यकच होत्या. परंतु ह्या गोष्टी माणूस जीवशास्त्रीयदृष्ट्या आवश्यक होत्या म्हणून करत नसे, तर त्या गोष्टींपासून मिळणाऱ्या सुखासाठी तो त्या करीत असे. काही कालावधीनंतर शिकार करणे हा एक ऐषारामी धनिकांचा षोक होऊन बसला. शिकारीचे जीवशास्त्रीय उपयुक्तता म्हणून असलेले महत्त्व नाहीसे झाले होते. परंतु मृगयेचा आनंद मात्र कायम राहिला. सहज-स्फूर्त, साधेसिधे द्वंद्व, सध्या फक्त शाळकरी मुलांनाच करू दिले जाते. परंतु युयुत्सुवृत्ती मात्र अजूनही कायम आहे, आणि त्या प्रवृत्तीला जर दुसरी चांगली वाट मिळाली नाही, तर तिचा सर्वात महत्त्वपूर्ण उद्रेक युद्धात होतो.

प्राचीन मानव केवळ त्याचे मन आकृष्ट करणाऱ्या गोष्टीच करीत होता असे नव्हे, तो काही गोष्टी त्यांच्या उपयुक्ततेसाठीही करीत होता. मानवी उत्क्रांतीच्या अगदी सुरुवातीलाच दगडांपासून हत्यारे तयार करण्यात येऊ लागली. आजच्या गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेच्या प्रदीर्घ उत्क्रांतीतले ते पहिले पाऊल होते. परंतु अश्मयुगाच्या सुरुवातीच्या काळात कलानिर्मितीचा आनंद आणि सामर्थ्यातील वाढीची शक्यता या दोन गोष्टींची सरमिसळ हत्यारनिर्मितीच्या कामाच्या सर्व अवस्थांत झालेली असेल अशी शक्यता आहे. साधनांपासून साध्यापर्यंत करावयाचा प्रवास जेव्हा फार लांब नसतो, आणि साध्य जेव्हा

फार हवेहवेसे वाटत असते, तेव्हा साधनांपासूनही मनुष्यास आनंद मिळतो. उदाहरणार्थ, बर्फावरून घसरगुंडी करतानाचे काही आनंदाचे क्षण मिळविण्यासाठी मुलगा बिनचाकी घसरगाडी घेऊन खुषीने टेकडीची चढण चढून जातो. ते चढण्याचे श्रम करण्यासाठी कोणीही त्याला उद्युक्त करण्याची जरुरी नसते. आणि वर चढताना त्याला कितीही दम लागला तरी तो खुशीत असतो. परंतु घसरगुंडीच्या सुखाऐवजी जर त्याला तुम्ही 'टेकडीवर चढून गेलास तर म्हातारपणी सत्तराव्या वर्षी पेन्शन देऊ' असें सांगितलेत, तर टेकडी चढून जाण्याचा त्याचा उत्साह फार लवकर कमी होईल.

प्रेरणा जर सर्जनशील असेल तर, बिनचाकी गाडी घेऊन टेकडी चढण्यास मुलगा जितका वेळ श्रम करतो त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक काळ श्रम करण्यास माणूस आनंदाने उद्युक्त होईल. आणि तरीही ते परिश्रम उस्फूर्त राहतील. बिनचाकी गाडी घेऊन खेळणाऱ्या मुलाप्रमाणेच स्वतःच्या प्रेरणांशी पूर्णपणे संवादी राहून एखादा माणूस आयुष्यांतील कितीतरी वर्षे, दारिद्र्य, कष्ट आणि संकटे यांना तोंड देऊन, एवरेस्ट जिंकण्यासाठी किंवा दक्षिण ध्रुवावर जाण्यासाठी किंवा एखादा शास्त्रीय शोध लावण्यासाठी प्रयत्न करीत राहील. मात्र त्याला अंतिम फलाची उत्कट इच्छा असली पाहिजे व ते मिळविण्यासाठी कुठल्याही अडचणींना सामोरे जाण्यात अभिमान वाटला पाहिजे. मागे आपल्याला भेटलेल्या रेड इंडियनच्या शब्दात "त्यांतच जीवनाचे दिव्यत्व आहे."

काम करण्यातला उद्देश आणि ते काम करणाऱ्याचे हेतू यांत, गुलामगिरीची पद्धत सुरू झाल्यापासून फारकत निर्माण झाली. ईजिप्शियन राजांची कीर्ती चिरंजीव करण्यासाठी म्हणून पिरॅमिड्स बांधण्यात आले, ते बांधण्यासाठी ज्या गुलामांना श्रम करावे लागले

त्या गुलामांना काही पिरॅमिड्समुळे दिव्यत्व लाभणार नव्हते, मुका-दमाच्या चाबकाचे वळ उठतील या भीतीनेच त्यांनी काम केले. तसेच ज्या वेळी शेती गुलामांकरवी किंवा भूदासांकरवी केली जात होती त्या वेळी प्रत्यक्ष काम करणारांना त्यापासून खरे समाधान मिळत नसे. आपण जिवंत आहोत आणि (नशिब असले तर) शारीरिक वेदनांपासून मुक्त आहोत हेच त्यांचे समाधान असे.

औद्योगिक क्रांतिपूर्व आधुनिक काळात भूदास पद्धतीचा ऱ्हास झाल्याने आणि हस्तव्यवसायांची वाढ झाल्याने स्वतंत्रपणे काम करणाऱ्या कारागिरांची संख्या वाढली. हे कारागीर स्वतःच मालक असल्याने त्यांना आपल्या निर्मितीबद्दल गर्व बाळगता येत असे. अशा प्रकारच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत जेफर्सनने आणि फ्रेंच राज्य-क्रांतीच्या नेत्यांनी पुरस्कार केलेल्या विशिष्ट प्रकारच्या लोकशाहीचा उदय झाला. स्वतंत्रपणे काम करणारे, स्वतःचे स्वतःच मालक असलेले असंख्य उत्पादक हे या प्रकारच्या लोकशाहीचे आधारभूत घटक होते. आधुनिक तंत्रांमुळे निर्माण झालेल्या प्रचंड आर्थिक संघटना जेफर्सनप्रणीत लोकशाहीत अभिप्रेत नव्हत्या.

समजा, मोटारी तयार करण्याचा एक मोठा कारखाना आहे. कार-खान्याचा उद्देश मोटारी तयार करण्याचा असतो, पण कामगारांचा उद्देश वेतन मिळविण्याचा असतो. दोघांच्या मनांतील उद्दिष्ट समान नसते. मालक आणि व्यवस्थापक यांच्यामध्येच काय ते त्या दोघांना एकत्र आणणारे समान ध्येय असते, पण कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना मालक-व्यवस्थापकांशी एकत्र आणणारे कोणतेच समान ध्येय नसेल अशी शक्यता आहे. त्यांच्यापैकी काही कामगारांना आपल्या कारखान्यात तयार होणाऱ्या मोटारींचा दर्जा उत्तम असतो याविषयी अभिमान वाटतही असेल, परंतु बहुतेकांचे

लक्ष मजूरसंघटनेच्या द्वारा मजुरी वाढवून घेणे इकडेच लागलेले असते.

ज्या ठिकाणी यांत्रिकीकरण व जोडीला उद्योगधंद्याचा प्रचंड आकार आहे, त्या ठिकाणी ही अनिष्ट गोष्ट पुष्कळ अंशी अटळ आहे. यांत्रिकीकरणामुळे कुठलाही एक माणूस मोटारीचा एकादा मोठा भाग तयार करीत नाही, तर फक्त एकाद्या भागातला छोटासा अंश फार तर तयार करतो. बहुतेक कामांसाठी विशेष कौशल्याची गरज नसते, आणि कामे पूर्णपणे ठरीव, पुनरावृत्तिपर असतात. कारखान्याच्या मोठ्या आकारामुळे, मोटार तयार करण्याचे काम कारखान्यांतील सर्व कामगार मिळून करीत असले तरी त्यांच्यात एकात्मता निर्माण होत नाही. त्याचप्रमाणे, मालक आणि मजूर यांच्यामध्येही ऐक्याची भ्रातृभावना निर्माण होत नाही. कामगारांत दृढ ऐक्य असू शकते आणि वेगळेपणाने व्यवस्थापकांत ऐक्य असू शकते. परंतु कामगारांच्या ऐक्याचा वस्तूच्या निर्मितीशी काहीही संबंध नसतो. ते ऐक्य फक्त मजुरीचे दर वाढवून घेण्यापुरते आणि कामाचे तास कमी करून घेण्यापुरते असते. व्यवस्थापकांना वस्तूच्या निर्मितीविषयी अभिमान वाटेल अशी शक्यता आहे; परंतु जेव्हा एकादा उद्योगधंदा केवळ व्यापारी वृत्तीने चालविला जातो, तेव्हा फक्त नफ्याचाच विचार करण्याकडे कल होतो आणि पुष्कळदा चांगल्या प्रकृतीच्या कारागिरीपेक्षा जाहिरातीच्या द्वारे नफा मिळवणे जास्त सोपे जाते.

कारागिरीच्या कसबाविषयीचा अभिमान दोन गोष्टींमुळे कमी झालेला आहे. प्रथम चलनाचा शोध लागल्यामुळे आणि आता नंतर अस्तित्वात आलेली गोष्ट म्हणजे कारखान्यातून मोठ्या प्रमाणावर करण्यात येणाऱ्या उत्पादनामुळे कसबाविषयीचा अभिमान कमी झाला. चलनामुळे प्रत्येक वस्तूचे मूल्य पैशाच्या मोजमापात ठरू लागले.

पैशातली किंमत ही वस्तूच्या अंगभूत असलेली गुणात्मक गोष्ट नाही. वस्तूहून सर्वस्वी वेगळे असे ते एक अमूर्त मोजमाप आहे आणि या मोजमापात सर्व वस्तू सहभागी असतात. ज्या वस्तूंचा विक्रय करावयाचा नसतो, अशा वस्तूंचे मूल्य त्यांच्या गुणांसाठी केले जाईल; त्या विकून त्यांच्या मोबदल्यात काय घेता येईल त्यावर त्यांचे मूल्य जोखले जाणार नाही. उदाहरणार्थ, घरासमोरील छोटीशी फुलबाग पुष्कळदा फार सुरेख असते, आणि ती करण्यासाठी खूप श्रमही घ्यावे लागलेले असतात. परंतु ती काही उत्पादनाच्या आशेने केलेली नसते. तसेच शेतकऱ्यांचे कलापूर्ण पोशाख (जे आता फक्त परदेशीय हौशी लोकांपुढेच घालण्यासाठी असतात) त्यांच्या त्यांच्या घरी तयार केलेले असत आणि त्यांचे पैशाच्या रूपात कधी मोल केले जात नसे. अथेन्सची ॲक्रोपॉलीस मंदिरे आणि मध्ययुगातील युरोपियन कथीड्रल्स पैशासाठी बांधलेली नव्हती, आणि ह्यांचा विक्रय करण्याची कल्पनाच होऊ शकली नसती. उत्पादकाच्या वापरासाठी वस्तू निर्माण करणाऱ्या अर्थव्यवस्थेची जागा हळूहळू विकून पैसा करण्यासाठी वस्तूची निर्मिती करणाऱ्या अर्थव्यवस्थेने घेतली. ह्या बदलामुळे वस्तूंपासून मिळणाऱ्या आनंदापेक्षा वस्तूंच्या उपयुक्ततेवर अधिक भर देण्यात येऊ लागला आहे.

कारखान्यांना मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागल्यामुळे ही प्रक्रिया अधिकच पराकोटीला गेली आहे. उदाहरणार्थ, समजा, तुम्ही बटने तयार करणारे एक कारखानदार आहात. तुम्ही कितीही सुंदर व उत्तम बटने करत असलात तरी तुमच्या स्वतःच्या वापरासाठी तुम्हाला फारच थोडी बटने लागतील. उरलेली सगळी तुम्ही अन्नवस्त्रनिवाऱ्याच्या, एखाद्या मोटारीच्या किंवा मुलांच्या शिक्षणाच्या आणि अशा इतर गोष्टींच्या मोबदल्यात विकू इच्छिता. ह्या सर्व

गोष्टींमध्ये आणि त्या बटनांमध्ये "पैशातली किंमत" ही एकच गोष्ट समान आहे. त्यातही तुमच्या दृष्टीने बटनांची किंमत किती याचे महत्त्व नाही. महत्त्व बटने विकून मिळणाऱ्या नफ्याला आहे. नफा हा बटनांची विक्रीची किंमत आणि त्यांचा उत्पादनखर्च यांच्यातील तफावतीवर अवलंबून असतो. कमी प्रतीची बटने तयार केल्यास उत्पादनखर्चात कपात करता येते, म्हणजेच तुम्ही तुमचा नफा वाढवू शकता. सामान्यपणे जुन्या हस्तकौशल्याद्वारा वस्तूंचे उत्पादन करण्याच्या पद्धतीच्या जागी नवीन मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक उत्पादनपद्धती वापरल्याने वस्तूच्या अंगभूत गुणवत्तेत कमतरता आल्याखेरीज राहात नाही.

आतापर्यंत सांगितलेल्या परिणामांखेरीज उत्पादकाचा आपण निर्माण केलेल्या वस्तूंमधील रस कमी करणारे आणखी दोन परिणाम आधुनिक मोठ्या संघटनांमुळे होतात. पहिला परिणाम हा की, कामापासून मिळणारा लाभ हा काम करणाऱ्याला सरळसरळ आणि तत्काळ मिळत नाही. दुसरा परिणाम म्हणजे, कामगार आणि व्यवस्थापक या दोन भूमिका अलग पडतात.

तत्काळ व सरळसरळ न मिळणाऱ्या लाभाच्या मुद्द्याविषयी आपण पहिल्या प्रथम विचार करू या. समजा, तुम्ही एखाद्या मोटारीच्या कारखान्यात एक लहानसा मामुली भाग तयार करण्याच्या कामावर आहात. मोटारींची निर्यात केली नाही तर आपल्याला अन्नधान्याची आयात करता यावयाची नाही, तेव्हा सर्वांनी मोटारींचे उत्पादन जास्तीत जास्त केले पाहिजे असे तुम्हास जोरजोराने पटविण्याचा प्रयत्न केला जातो. समजा, तुम्ही अधिक श्रम करून उत्पादन वाढविलेत व निर्यात वाढविण्यास मदत केलीत तर जे अधिक धान्य आयात केले जाईल ते काही व्यक्तिशः तुमच्या पदरात पडत नाही,

ते ब्रिटनमधील सुमारे चार कोटी लोकांत विभागले जाते. तुम्ही जर एखादा दिवस कामावर गैरहजर राहिलात तर देशाच्या अर्थकारणावर कोणताही दृश्य परिणाम होताना आढळून येत नाही. बुद्धीचा वापर करून तर्क लढविलात तरच आपल्या गैरहजेरीमुळे होणाऱ्या नुकसानीची जाणीव तुम्हाला होऊ शकते. आणि नोकरी टिकवून धरण्यासाठी जरूर असलेल्या कामापेक्षा अधिक काम केवळ नैतिक प्रेरणेतूनच तुम्ही करू शकाल. परंतु गरज जेव्हा सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ व तातडीची असते तेव्हा कृती आणि तिचा लाभ यांचा संबंध तत्काळ व सरळ असतो, आणि लक्षात येण्यासारखा असतो. त्यासाठी बुद्धीला कष्ट द्यावे लागत नाहीत की नैतिक भावनांना आवाहन करावे लागत नाही. बुडत असलेल्या जहाजावरील खलाशांना आज्ञापालन करण्याच्या आधी क्षणभरही स्वतःशी विचार करीत बसावा लागत नाही, कारण त्यांच्या सर्वांच्या डोळ्यांसमोर एकच महत्त्वाचे काम असते, त्या कामाची तातडी असते आणि ते इच्छित साधण्यासाठी काय करावे हेही समजणे फारसे अवघड नसते. परंतु समजा, त्या जहाजाच्या कप्तानाला, शासनसंस्थेप्रमाणे, आपण दिलेले हुकूम कसे योग्य आहेत हे सिद्ध करून दाखविण्यासाठी चलनव्यवहाराची मूलतत्त्वे विशद करावी लागली, तर त्याचे विवेचन संपण्याआधीच जहाज बुडून जाईल.

व्यवस्थापक आणि कामगार यांच्या भूमिकांत असलेल्या दुराव्याची दोन अंगे आहेत. भांडवलदार आणि कामगार यांच्यामधील झगडा हे याचे परिचित अंग आहे. या फारकतीतून जो दुसरा दोष निर्माण होतो तो साऱ्याच मोठ्या संघटनांमध्ये आढळून येतो. भांडवलदार आणि कामगार यांच्यांतील झगड्याविषयी मी काही सांगू इच्छीत नाही. परंतु शासनदूरत्व—मग ती राजकीय संघटना असो वा आर्थिक

संघटना असो, ते शासन भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील असो वा समाजवादी अर्थव्यवस्थेतील असो—ही एक अधिक महत्त्वाची बाब आहे आणि म्हणून तिचा विचार करणे अत्यंत जरुरीचे आहे.

समाज कशाही प्रकारे संघटित केलेला असला तरी, सर्वसाधारण जनतेचे हित आणि समाजातील एखाद्या जमातीचे वा गटाचे हित यांच्यात बऱ्याच गोष्टींमध्ये विरोध अटळ असते. उदाहरणार्थ, कोळशाच्या भावामध्ये झालेली वाढ ही कोळसा-उद्योगाच्या फायद्याची असली आणि त्यामुळे कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या लोकांच्या वेतनात वाढ करणे शक्य ठरत असले तरी समाजातील इतर सर्वांच्या दृष्टीने ती अनिष्टच असते. जेव्हा सरकारच वस्तूंच्या किंमती आणि वेतनाचे दर ठरवून देते तेव्हा प्रत्येक निर्णयामुळे कुणा ना कुणाची तरी निराशा ही होणारच. सरकार ज्या तत्त्वांच्या आधारे निर्णय घेत असते ती तत्त्वे सर्वसामान्य स्वरूपाची असतात. त्यांचा मजुरांच्या दैनंदिन जीवनाशी फारसा संबंध नसतो. आणि यामुळे ती तत्त्वे सयुक्तिक आहेत हे पटवून देणे अवघड असते. अशा ठिकाणी एकवटलेल्या स्वरूपातील लाभ हा विखुरलेल्या स्वरूपातील नुकसानी-पेक्षा लोकांना अधिक चटकन मान्य होतो. अशा प्रकारच्या कारणांमुळे सरकारला चलनवाढ थोपविणे कठिण जाते आणि जे सरकार चलनवाढीविरुद्ध उपाययोजना करते ते सरकार अप्रिय होण्याची शक्यता असते. सर्वसामान्य जनतेचे हितच केवळ डोळ्यापुढे ठेवून एखादे सरकार प्रामाणिकपणे प्रयत्न करते, तेव्हा समाजांतील प्रत्येक गटाला, ते मुद्दामच दुष्टपणाने आपल्या हिताकडे दुर्लक्ष करीत आहे असे वाटण्याचा धोका असतो. लोकशाहीमध्ये जसजशी सरकारी नियंत्रणाची कोटी वाढत जाते तसतशी ही अडचण वाढतच जाते.

आणि त्याउपर शासन, मग ते लोकशाही शासन असले तरी,

नेहमीच सर्वसाधारण जनतेचे जास्तीत जास्त हित करणारीच कृती करील असे समजणे म्हणजे गैरवाजवी आशा बाळगणे होईल. नोकरशाहीच्या काही अनिष्ट पैलूंविषयी मी आधी एके ठिकाणी ऊहापोह केला आहेच. इथे मी सरकारी अधिकारी आणि जनता यांच्यामधील संबंधाच्या काही अनिष्ट पैलूंविषयी बोलणार आहे. अतिशय सुसंघटित समाजात जे लोक सरकारी सत्ता राबवितात त्यांचे, म्हणजे थेट अगदी मंत्र्यांपासून ते स्थानिक कार्यालयातील कनिष्ठ नोकरवर्गापर्यंत प्रत्येकाचे स्वतःचे खाजगी हितसंबंध असतात. आणि हे हितसंबंध जनतेच्या हितसंबंधांशी मिळते-जुळते असतातच असे नाही. जनतेच्या हिताला विरोधी अशा हितसंबंधांपैकीं सत्तेची लालसा आणि कामाची जबाबदारी घेण्याचा तिटकारा हे दोन प्रमुख हितसंबंध होत. सरकारी अधिकारी जेव्हा एखाद्या नव्या कार्यक्रमाला नकार देतो तेव्हा तो एकाच वेळी अधिकार गाजविण्याचे सुखही उपभोगतो आणि कामाची जबाबदारी टाळण्याच्या वृत्तीचेही समाधान करतो. आणि अशा रीतीने ज्या जनतेची सेवा करावयास त्याला नेमलेले असते त्याच जनतेचा तो शत्रू आहे असे भासू लागते, किंबहुना थोड्याफार प्रमाणात तो शत्रू बनतोही.

हे स्पष्ट करण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊ या. समजा, देशात अन्नधान्यटंचाई आहे. अशा वेळी तुमच्या मालकीचा जमिनीचा एखादा तुकडा असला, आणि जर त्यातून पिकलेले धान्य तुम्हाला तुमच्या रेशनला पूरक म्हणून वापरण्याची मुभा असली तर अन्नधान्यटंचाईमुळे तुम्ही त्या जमिनीची अगदी कसून मशागत कराल. परंतु शेतीवर उपजीविका करणारे सोडून इतर बहुसंख्य लोकांना त्यांचे सर्व अन्नधान्य विकत घ्यावे लागते. देशात अनिर्बंध अर्थव्यवस्था असेल तर अन्नधान्यांचे भाव भडकतील आणि काही मूठभर श्रीमंत

लोक सोडून इतर सर्वांची उपासमार होईल. रेशनिंगमुळे लोकांची उपासमार होण्याचे थांबते हे खरे असले तरीही, रेशन-ऑफिसमध्ये काम करणाऱ्या नोकरवर्गाच्या सेवेविषयी आपणापैकी फारच थोड्यांना पुरेशी कृतज्ञता वाटते. आणि रेशनिंग ऑफिसमधील कर्मचारी दगदगीने आणि काळजीने इतके कंटाळलेले असतात की त्यांच्यापैकी तर फारच थोडेजण जनतेविषयी सहानुभाव कायम राखू शकतात. जनतेला रेशन ऑफिसमधील कर्मचारी निर्बुद्ध हुकूमशहा वाटतात, तर कर्मचाऱ्यांना जनता ही सदैव रेशनकार्डे हरविणारी, सतत पत्ते बदलणारी, जिवाला वैताग आणणारी, त्रागा करणारी व मूर्ख वाटत असते. अशा परिस्थितीत, सरकार आणि जनता यांच्यात हार्दिक सलोखा व संवाद कसा निर्माण करता येईल हे सांगणे सोपे नाही.

वैयक्तिक भावना आणि सर्वसाधारण जनतेचे हित यांत अंशतः सुसंवाद साधण्यासाठी आजपर्यंत जे मार्ग अनुसरले गेले आहेत त्यांच्या विरुद्ध बऱ्याच प्रकारचे आक्षेप घेतले गेले आहेत.

परकीय देशाशी युद्ध हे समाजातील विरोधी हितसंबंधात सोप्या रीतीने सुसंवाद निर्माण करणारे म्हणून सहज लक्षात येणारे एक साधन आहे. कठिण युद्धप्रसंगी, जेव्हा राष्ट्राचे अस्तित्वच धोक्यात असते, तेव्हा देशातील सर्वांना एकजुटीने व जिद्दीने कार्य करावयास लावणे सोपे असते. आणि अशा वेळी जनतेचा शासनाच्या कर्तृत्वावर विश्वास असला, तर सरकारच्या आज्ञा मनःपूर्वक पाळल्या जातात. जहाज बुडण्याच्या प्रसंगीच्या परिस्थितीसारखी ही परिस्थिती असते. परंतु म्हणून 'नाविक दलात शिस्त निर्माण करण्यासाठी जहाजे बुडण्याचे प्रसंग घडवून आणावेत' असे ज्याप्रमाणे कोणी म्हणणार नाही, त्याप्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीसाठी म्हणून युद्धे करावीत असेही आपण प्रतिपादन करू शकत नाही. युद्धाच्या नुसत्या भीतीनेही

राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली जाऊ शकते यात शंका नाही. परंतु जर हे तीव्र भय फार काळ अस्तित्वात राहिले तर त्या भीतीतूनच प्रत्यक्ष युद्धाचा भडका उडाल्याशिवाय राहाणार नाही. आणि युद्धाची भीती राष्ट्रीय एकात्मतेला चालना देते तशी युद्धाच्या भीतीने जनतेत चैतन्यहीन मरगळ आणि भयोन्माद या दोन्ही टोकाच्या प्रतिक्रियाही निर्माण होतात.

स्पर्धा ही कार्याला चालना देणारी प्रेरक शक्ती आहे. भांडवलशाही समाजातील अनेक अनिष्ट गोष्टींपैकी एक म्हणून साम्यवादी लोक स्पर्धेचा धिक्कार करतात. परंतु सोव्हिएट रशियाच्या सरकारनेही उद्योगधंद्यांच्या संघटनेत स्पर्धेला परत पूर्वीचे महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. स्टाखानोव्हाइट पद्धतीनुसार, विशेष कार्यकुशलता दाखविणाऱ्या मजुरांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येतात, तर कुठल्याही प्रकाराने प्रमाण पातळीहून कमी उत्पादन करणाऱ्या मजुरांना शिक्षा केली जाते. वस्तूच्या उत्पादनाच्या प्रमाणांत वेतन देण्याच्या पद्धतीचे हे एका प्रकारे पुनरुज्जीवन आहे. नेमक्या या पद्धतीविरुद्ध मजूरसंघटनांनी जोरदार आणि यशस्वी लढा दिलेला आहे. पूर्वी भांडवलदार या पद्धतीची ज्या गुणांसाठी भलावण करीत होते ते गुण आणि मजूर संघटना ज्या दोषांसाठी तिला विरोध करीत ते दोष, दोन्हीही रशियातील या स्टाखानोव्हाइट पद्धतीत असले पाहिजेत याविषयी माझ्या मनात शंका नाही. कामाविषयी श्रमिकाला आस्था कशी वाटेल हा मानसशास्त्रीय प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने या पद्धती अपुऱ्या आहेत.

परंतु स्पर्धेचे बरेचसे प्रकार अतिशय हानिकारक असले, तरीही जरूर ते परिश्रम करण्यास उद्युक्त करण्यात स्पर्धा एक महत्त्वपूर्ण व आवश्यक कार्य बजावते असे माझे मत आहे. आणि दुसरे म्हणजे, एरवी ज्या सहजप्रवृत्ती मनुष्याला युद्धाला प्रवृत्त करतील, त्यांच्या आविष्कारास

स्पर्धेमुळे तुलनात्मक दृष्ट्या निरुपद्रवी वाव मिळतो. उदाहरणार्थ, खेळातील स्पर्धा नाहीशा व्हाव्या असे कोणीही म्हणणार नाही. जर दोन विरोधी फुटबॉल संघांनी, बंधुभावाने, सहकार करून, आधी एका संघाला गोल करू द्यावयाचा आणि मग दुसऱ्या संघाला गोल करून द्यावयाचा असे ठरविले, तर कुणाचाच आनंद वृद्धिंगत होणार नाही. स्पर्धेतून निर्माण होणारा उत्साह फक्त खेळांपुरताच मर्यादित राखण्याचे कोणतेच कारण नाही. खेळांच्या संघांप्रमाणेच, प्रादेशिक किंवा इतर प्रकारच्या अनेक संघटनांत चुरस असणेही कामाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने उपयोगी होऊ शकेल. परंतु स्पर्धा ही निष्ठुर व अपायकारक ठरता कामा नये. त्यासाठी स्पर्धेत हरणाऱ्याचा युद्धातल्याप्रमाणे सर्वनाश होणार नाही अशी दक्षता घेतली पाहिजे. स्पर्धेत हरल्याने मान तेवढा हिरावला जावा. हरलेल्या संघाला ठार मारण्यात येत असते किंवा त्यांची उपासमार करण्यात येत असती तर फुटबॉल हा प्रोत्साहन द्यावे असा खेळ ठरला नसता.

अलिकडच्या काही वर्षांत ब्रिटनमध्ये कर्तव्यभावनेला आवाहन करण्याचा एक मोठा जोरदार प्रयत्न केला जात आहे. सध्याच्या काळात काटकसरीने राहणे आवश्यकच आहे. उत्पादन वाढविणे हाच यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग आहे, हे वादातीत आहे, आणि आणिबाणीच्या प्रसंगी अशा प्रकारचे आवाहन करणे आवश्यकच असते. परंतु कर्तव्याची भावना कधीकधी अत्यावश्यक व मोलाची असली तरी, नेहमीच तिच्यावर विसंबून राहता येणार नाही आणि फार काळ ताणल्यास ती उपयोगी पडणार नाही. मानवाच्या नैसर्गिक प्रेरणांच्या विरोधात कर्तव्याची भावना जागृत ठेवावी लागते आणि म्हणून मनावर तिचा एक कायम ताण असतो. असा ताण फार काळ राहिला, तर त्यामुळे माणसाला एक प्रकारचा थकवा येतो

आणि माणसातील नैसर्गिक जोम कमी होतो. तशात, परंपरेने स्वीकारलेल्या सोप्या नैतिक मूल्यांच्या आधारे कर्तव्यभावनेला आवाहन केले असेल तर काहीतरी बरे. या उलट जर गुंतागुंतीची आर्थिक वा राजकीय कारणे पुढे करून कर्तव्यभावनेला आवाहन केले असेल, तर थकव्यातून हळूहळू त्या कारणांच्या खरेपणाविषयी साशंकता निर्माण होईल, आणि बरेच लोक त्या हाकेकडे दुर्लक्ष करतील, किंवा अडचणीतून 'जवळचा रस्ता' सुचविणारी एखादी विचारप्रणाली स्वीकारण्याकडे त्यांची प्रवृत्ती होईल. आशेमुळे मनुष्यात उत्साह संचारतो, किंवा भयाने मनुष्य काहीही करावयास तयार होतो. परंतु ती आशा आणि ती भीती सुस्पष्ट आणि निकडीची असावी लागते. ती जर तशी असेल, तरच मनाला शीण न आणता मनुष्याला ती कार्यप्रवण करू शकते.

भयोन्मादाने केलेला प्रचार, किंवा निदान माणसातील भयोन्माद जागृत करणारा प्रचार आधुनिक काळात इतका सार्वत्रिक प्रभावी ठरतो याचे कारण काही अंशी वर उल्लेखिलेल्या परिस्थितीत आढळते. जगातील दूरदूरच्या भागांत होणाऱ्या घडामोडींचा आपल्या दैनंदिन जीवनावर आघात होत असतो याचे स्थूलमानाने लोकांना भान असते. पण हा आघात कसा घडतो हे समजण्याइतके त्यांना ज्ञान नसते. ते ज्ञान काही थोड्या तज्ज्ञांनाच असते. सध्या बाजारात तांदूळ का मिळत नाही? केळी इतकी दुर्मिळ का झाली? या गोष्टींचा दोष जर तुम्ही हिंदुस्थानच्या, किंवा सरकारी कारभारातील लाल फितीच्या किंवा भांडवलशाहीच्या किंवा साम्यवादी शासनसंस्थेच्या माथी मारलात, तर लोकांच्या मनात त्यांच्या साऱ्या दुःखांच्या कारणांचे आरोपण ज्यावर करता येते अशा दुष्ट सैतानाची एक भ्रमात्मक मूर्ती निर्माण करता येते आणि या मूर्तीचा प्राणपणाने द्वेष करणे सोपे असते.

कुठलीही दुर्घटना घडली, की दुर्घटनेचे टेपर ज्याच्यावर ठेवता येईल अशा शत्रूचा शोध घेणे ही स्वाभाविक प्रवृत्ती माणसांत आहे. उदाहरणार्थ, रानटी लोक सर्व प्रकारची रोगराई शत्रुत्वाच्या बुद्धीने केलेल्या अभिचारामुळे होते असे मानतात. आपल्यावर कोसळणाऱ्या आपत्तींची कारणे समजू शकत नाहीत त्या त्यावेळी असे 'रानटी' स्पष्टीकरण पुढे करण्याकडे आपली प्रवृत्ती होते. डॉलरची चणचण कशामुळे निर्माण झाली याची शास्त्रोक्त कारणे शोधण्यासाठी किचकट तपशिलात जाणाऱ्या वर्तमानपत्रापेक्षा द्वेषाचे लक्ष्य बनू शकेल अशा एका 'खलनायका'वर सारा दोष ढकलणारे वर्तमानपत्र लोकांच्या भावनांना अधिक प्रभावीपणे आवाहन करते. पहिल्या महायुद्धानंतर जर्मन जनतेची परिस्थिती जेव्हा फार खालावली, तेव्हा या सगळ्या परिस्थितीस ज्यू लोकच जबाबदार आहेत, हे नाझींचे सांगणे जर्मन लोकांना सहजपणे पटले.

आपल्या जीवनात जे जे दुःखकारक आहे ते सर्व केवळ आपल्या 'शत्रू'च्या कारवायांमुळे निर्माण झालेले आहे. हे आवाहन सामान्यतः सर्वनाश ओढवणारे व विध्वंसक ठरले आहे. अशा आवाहनाने सहजप्रवृत्तीतून पोषण घेणारी 'रानटी' शक्ती चेतवली जाते हे खरे, पण अशा प्रकारे जागृत केलेल्या शक्तीतून फक्त विध्वंसक परिणाम साधतो. द्वेषभावनेला केलेल्या आवाहनाचे प्रभावी सामर्थ्य कमी करण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत. अर्थात, ज्या दोषांमुळे 'शत्रू'चा शोध घेण्याची प्रवृत्ती आपणास होते ते दोष दूर करणे हा, जिथे हे शक्य असेल तिथे, सर्वात उत्तम मार्ग होय हे उघडच आहे. जेव्हा हे दोष दूर करणे शक्य होत नाही, म्हणजे जेव्हा आपत्ती अटळ ठरतात, तेव्हा काही वेळा त्या आपत्ती आपल्यावर ओढवण्याची खरी कारणे जनतेला नीट समजावून देणे शक्य होऊ शकेल. परंतु जनतेत

भयोन्माद निर्माण करून त्याच्यावर फोफावणारे राजकीय गट किंवा वृत्तपत्रे आहेत तोपर्यंत हा मार्ग अनुसरणे अवघड आहे.

ज्या प्रकारच्या भयोन्मादक द्वेषातून जर्मनीत नाझींचा उत्कर्ष झाला तसा द्वेष केवळ आपत्तींमुळे निर्माण होतो असे मला वाटत नाही. त्यासाठी आपत्तींबरोबरच एक वैफल्याची भावनाही अस्तित्वात असावी लागते. बेटावर एकाकी येऊन पडलेले स्विस रॉन्बिन्सन कुटुंब बेटावर असंख्य गोष्टी करण्यात गढून गेल्याने, हेवादावा करण्यात वेळ घालविणार नाही. परंतु अधिक गुंतागुंतीच्या परिस्थितीत ज्या गोष्टी करणे आवश्यक आहे त्या गोष्टींमध्ये लोकांना कार्यप्रवृत्त करण्याच्या दृष्टीने आकर्षून घेण्याचे गुण पुरेसे नसतील. उदाहरणार्थ, ब्रिटनमधील सध्याच्या अवघड आर्थिक पेचप्रसंगात कोणत्या कृतींची जरुरी आहे हे आपणा सर्वांना सामुदायिक रीत्या माहीत आहे. उत्पादन वाढवायला हवे आहे, आणि जास्तीत जास्त माल निर्यात करायला हवा आहे. परंतु ह्या व्यापक, सर्वसाधारण गोष्टी झाल्या. त्या गोष्टींचा विशिष्ट स्त्रीपुरुषांच्या कल्याणाशी स्पष्ट संबंध दाखविता येत नाही. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी अशा दूरान्वयाने संबंधित कारणांसाठी आवश्यक असणारी कार्ये खुशीने आणि आनंदाने लोकांनी करावीत असे वाटत असेल, तर देशाच्या अर्थकारणासाठी आवश्यक गोष्टी करण्याची काही जवळची व निकडीची कारणे निर्माण केली पाहिजेत. सत्तेचे नियंत्रित विकेंद्रीकरण केले, आणि व्यक्तींना आणि लहान गटांना जवळपास स्वतंत्रपणे इष्ट कृती करण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या तरच राष्ट्रीय दृष्ट्या आवश्यक कृतींसाठी लोकांना भिडणारी कारणेही देता येतील असे मला वाटते.

आधुनिक काळांतील मोठ्या शासनसंस्थांमध्ये आज ज्या प्रकारची लोकशाही अस्तित्वात आहे त्या लोकशाहीत काही मूठभर अल्प-

संख्यांच्याच स्वयंप्रेरणेला राजकीय क्षेत्रात पुरेसा वाव असतो. ग्रीक लोक जिला 'लोकशाही' म्हणून संबोधीत होते त्या लोकशाहीत स्त्रियांना व गुलामांना काहीच स्थान नव्हते, म्हणून ती खरीखुरी लोकशाही नव्हती, अशा प्रकारचे विधान करावयाची आपल्याला सवय आहे. परंतु शासनाखालील क्षेत्र जेथे विस्तीर्ण असते, तिथली लोकशाही काही महत्त्वाच्या बाबतींत ग्रीसमधील लोकशाहीइतकी लोकमतानुवर्ती कधीच असू शकणार नाही ही गोष्ट आपल्या लक्षात येत नाही. ग्रीसमध्ये प्रत्येक नागरिक प्रत्येक प्रश्नावर मतदान करू शकत असे, आपला अधिकार एखाद्या प्रतिनिधीच्या हाती त्याला सुपूर्द करावा लागत नव्हता. प्रशासक निवडण्याचाही त्याला हक्क होता, सेनापतींची निवड सुद्धा तो करू शकत असे आणि जर हे अधिकारी बहुसंख्य लोकांना अप्रिय झाले, तर तो त्यांना काढूनही टाकू शकत असे. राज्यातील नागरिकांची संख्या इतकी कमी होती की प्रत्येक नागरिकाला आपण कोणीतरी महत्त्वाचे आहोत असे वाटत असे आणि इतर नागरिकांशी चर्चा करून आपल्या मताचा प्रभाव पाडण्याची त्याला शक्यता वाटत होती. ही पद्धती सर्वस्वी चांगली होती असे मला सुचवावयाचे नाही. खरे तर त्या पद्धतीत अनेक गंभीर स्वरूपाचे दोष होते. परंतु व्यक्तीच्या स्वयंप्रेरणेला वाव देण्याच्या बाबतीत मात्र ती पद्धती कुठल्याही आधुनिक राज्यपद्धती-पेक्षा फार श्रेष्ठ होती.

हे लक्षात येण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊ. नौदलातील सेनानी आणि कर भरणारा एक सर्वसामान्य नागरिक यांच्या संबंधाचा आपण विचार करू. तात्त्विक दृष्ट्या, कर भरणाऱ्या सर्व व्यक्ती हे सामुदायिक रीत्या त्या नौदलातील सेनानीला नोकरीवर ठेवणारे मालक आहेत. या लोकांचे लोकसभेतील प्रतिनिधी त्या सेनानीच्या

पगाराला मंजुरी देतात; आणि त्या सेनानीची नेमणूक करणारी उच्चाधिकार-यंत्रणा निर्माण करणारे सरकारही हेच प्रतिनिधी निवडतात. परंतु जर एखाद्या कर भरणाऱ्या सर्वसामान्य नागरिकाने त्या सेनानीशी, मालकाने नोकराशी वागावे तसे अधिकाराने वागावयास सुरुवात केली तर त्याला थोड्याच वेळात त्याची पायरी दाखविली जाईल. नौदलांतील सेनानी हा एक मोठा अधिकारी असतो, आणि त्याला अधिकार गाजविण्याची संवय असते; कर भरणारा सर्वसामान्य नागरीक हा छोटा असतो, आणि अधिकार गाजविण्याची त्याला सवय नसते. थोड्याफार फरकाने सर्व सरकारी खात्यांत हीच परिस्थिती आढळते. तुम्ही पोस्ट ऑफीसामध्ये पत्र रजिस्टर करावयास गेलात तर तेथील कारकूनही त्या क्षणापुरता तरी सत्ताधीश असतो. किमानपक्षी तुमच्याकडे ताबडतोब लक्ष द्यावयाचे की नाही हे तरी तो ठरवू शकतो. तुमचे जर काही अधिक क्लिष्ट काम असेल, तर तुम्हाला खूपच त्रास देऊ शकतो. तुम्हाला तो दुसऱ्या एखाद्या कारकुनाकडे जा म्हणून सांगेल. आणि तो दुसरा कारकून तुम्हाला त्याच माणसाकडे परत टोलवील, आणि तरीही दोघेही जनतेचे 'सेवक' समजले जातात. सर्वसामान्य मतदार स्वतःमध्ये सैन्य, नौदल, पोलीस आणि सरकारी अधिकारी वर्ग यांच्या अधिकाराचे उगमस्थान अनुभवत तर नाहीच, तो स्वतःला त्या सर्वांचा लीन दास समजतो. चिनी लोक म्हणत त्याप्रमाणे "चळचळा कापणे आणि आज्ञापालन करणे" हेच आपले कर्तव्य मानतो. जोपर्यंत लोकशाही नियंत्रण दूरान्वयानेच ठेवले जाऊ शकते आणि ती एक दुर्मिळ गोष्ट आहे, शासनयंत्रणेचे केंद्रीकरण झालेले आहे आणि वरून खाली, केंद्रापासून वर्तुळाच्या परीघाकडे सत्ता 'दान' केली जाते, तोपर्यंत सत्ताधाऱ्यांपुढे सामान्य व्यक्तीला वाटणारी असाहाय्यतेची भावना टाळणे कठीण आहे. परंतु

लोकशाही केवळ राज्ययंत्रणेच्या रचनेपुरतीच मर्यादित न रहातां जर जनतेच्या रोमरोमांत रुजावयास हवी असेल, तर ही अगतिकतेची भावना दूर होणे आवश्यक आहे.

ह्या व्याख्यानात आपण ज्या दुष्ट प्रवृत्तींविषयी विचार करीत आहोत त्या काही नवीन नाहीत संस्कृतीच्या सुरुवातीच्या काळापासून सुसंस्कृत समाजांतील बहुसंख्य लोक अत्यंत दुःस्थितीत जीवन कंठीत आले आहेत. साहस, नेतृत्व, उपक्रमशीलता, कीर्ती ह्या गोष्टी विशेषाधिकार असलेल्या फारच थोड्या व्यक्तींच्या वाट्याला येत असत; बहुसंख्य लोकांना अतिशय कष्टमय आयुष्य कंठावे लागत असे आणि मधून मधून वरिष्ठ वर्गांच्या क्रौर्याला बळी पडावे लागत असे. परंतु सुरुवातीस पाश्चिमात्य राष्ट्रांनी आणि नंतर हळूहळू जगातील इतर सर्व देशांनी एक नवीन ध्येय आज पुढे ठेवले आहे. काही थोड्या माणसांनी सर्व प्रकारच्या सुखांत व ऐश्वर्यात लोळावे, व बहुसंख्य जनांनी दुःस्थितीत आयुष्य कंठावे याने आपले इतःपर समाधान होत नाही. औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात ज्या अनेक अनिष्ट गोष्टी निर्माण झाल्या, त्या पाहून अनेकांना घृणेने फार मोठा धक्का बसला. रोमन काळी अशा प्रकारांनी लोकांना अशा तऱ्हेचा धक्का बसणे असंभवनीय होते. फक्त दुसऱ्याच्या ऐश्वर्यात वाढ करण्याचे केवळ एक साधन म्हणून कुठल्याही मनुष्यप्राण्याचा उपयोग करणे पाप आहे या भावनेतून गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्यात आली. त्याचप्रमाणे, आज गोऱ्या लोकांनी कृष्णवर्णीयांचे शोषण करावे या गोष्टीचे, निदान तात्त्विक तरी, समर्थन करण्याचा प्रयत्न आपण करीत नाही. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील अंतर नाहीसे व्हावे या इच्छेतून समाजवादाचा जन्म झाला. अशा रीतीने सर्व बाजूनी अन्याय आणि विषमता यांच्याविरुद्ध बंड पुकारण्यात आले

आहे. आणि दुःख व दुरवस्था यांच्या पायावर संस्कृतीचे भव्य प्रासाद उभारण्याविषयी लोकांच्या मनात उबग निर्माण झाली आहे.

ही नवीन श्रद्धा आज इतकी रूढ झाली आहे की मानवाच्या आजवरच्या प्रदीर्घ इतिहासात ती किती क्रांतिकारक आहे हे सहसा आपल्या लक्षात येत नाही. ह्या दृष्टिकोनातून पाहाता गेल्या एकशेसाठ वर्षांचा इतिहास म्हणजे या ध्येयातून प्रेरणा घेऊन चाललेली एक अखंड क्रांती आहे असे दिसून येते. ज्या नवीन प्रभावी श्रद्धा निर्माण होतात, त्या नेहमीच माणसांना अस्वस्थ करणाऱ्या असतात, कारण त्या माणसाला आपल्या जीवन-व्यवहारात काही अवघड परंतु आवश्यक फेरबदल करावयास लावतात. समतेचे ध्येय हे एक असेच ध्येय आहे. इतर विचारप्रणालींप्रमाणे या विचारप्रणालीलाही एका गोष्टीपासून धोका आहे. साधनांनाच साध्य समजण्याचा व मूळ साध्य विसरून जाण्याचा धोका आहे. समता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नातला एक धोका असा की ज्या गोष्टी सारख्या प्रमाणात वाटून देता येत नाहीत त्या गोष्टी चांगल्याच नाहीत असे मानले जाते. अन्यायावर उभारलेल्या पूर्वीच्या समाजात काही थोड्या लोकांना काही प्रकारच्या संधी मिळत होत्या; आपण जर वेळीच काळजी घेतली नाही तर, आपण करू इच्छित असलेल्या समाजात त्या कुणालाच मिळणार नाहीत. चालू काळातील दुष्ट प्रवृत्तींविषयी जेव्हा मी बोलतो, तेव्हा पूर्वीपेक्षा त्यांची संख्या जास्त आहे असे मला सुचवायचे नाही. त्यामागची माझी इच्छा इतकीच की, पूर्वीच्या काळी जे चांगले होते ते, या संक्रमणाच्या काळात शक्यतो त्याला धक्का न पोचता, भविष्यकाळातही टिकून राहावे. परंतु हे जर साधावयाचे असेल तर आदर्श समाजाच्या आराखड्यात विस्मरणाने अंतर्भूत न होण्यासारख्या काही गोष्टींचे भान आपण ठेवले पाहिजे.

लोकशाही समतेच्या सरसकट प्रयत्नांत ज्या गोष्टींचा अकारण बळी जाण्याचा धोका असतो, त्यांपैकी व्यक्तीचा स्वाभिमान ही सर्वात महत्त्वाची: गोष्ट होय. अभिमानाचे जे चांगले अंग आहे ते मला स्वभिमानात अभिप्रेत आहे. अहंकार हे स्वाभिमानाचे अनिष्ट अंग होय. स्वाभिमान हा माणसाला तो शत्रूंच्या ताब्यात असतानाही लाचारीपासून वाचवील आणि सर्व जग जरी त्याच्या विरुद्ध गेले तरी आपल्या निर्णयावर अढळ राहण्यास त्याला प्रेरणा देईल. या गुणाच्या अभावी बहुसंख्य जनतेचे मत किंवा सरकारचे मत, हे निर्विवाद अचूकच मानण्याकडे त्याची प्रवृत्ती होईल. एकदा का बहुसंख्य जनांच्या मनाची अशी ठेवण झाली म्हणजे नैतिक व बौद्धिक—दोन्ही प्रकारची प्रगती अशक्य होते.

आजवर स्वाभिमान हा एक अल्पसंख्यांकांतच दिसून येणारा गुण राहिला आहे, आणि त्याला काही इलाजही नव्हता. जिथे सत्तेची वाटणी विषम असते, तिथे जे लोक दुसऱ्यांच्या ताबेदारीत असतात त्यांच्यात स्वाभिमान आढळणे फारसे शक्य नसते. जुलमी राजसत्तांचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या व्यक्तींवर जुल्म केला जातो, त्या व्यक्तींनाच जुल्म करणाऱ्यांची स्तुतिस्तोत्रे गायला या राज्यसत्ता लावीत असतात. रोमन ग्लॅडिएटर्स द्वंद्वांच्या प्रारंभी सम्राटांना लवून कुर्निसात करीत, आणि याच बादशहांच्या करमणुकीखातर त्यांच्यापैकी निम्मे तरी द्वंद्वांत मारले जात. रशियन झार निकोलसने डॉस्टॉव्हस्की आणि बाकूनिन या दोन रशियन लेखकांना तुरुंगात घातले तेव्हा, तोंडापुरती का होईना, त्यांनी निकोलसविषयी आदरबुद्धी दाखवली. तसेच सोव्हिएट रशियाचे सरकार ज्या लोकांचे शिरकाण करते ते लोक पुष्कळदा अत्यंत लाचारी पत्करून आपल्या पापांची कबूलायत करतात. आणि जे लोक या हत्याकांडातून सुटतात ते लोक ओंगळ वाटावे अशी आणि इतकी सरकारची स्तुती करतात आणि पुष्कळदा आपली कातडी

बचावण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांवर ठपका ठेवण्याचा उद्योगही करतात. लोकशाही राज्यकारभारात लोकांना इतक्या हीन प्रकारची लाचारी पत्करण्याची पाळी येण्याची शक्यता कमी असते. लोकशाही लोकांना स्वाभिमानाची जपणूक करण्याची पूर्ण संधी देऊ शकते. पण लोकशाही अशी संधी देणार नाही, ही गोष्ट अशक्य नाही.

पूर्वीच्या काळी विशेषाधिकारसंपन्न अल्पसंख्यांपुरताच प्रामुख्याने स्वाभिमान सीमित असल्याने प्रस्थापित गटशाहीच्या सत्तेला आव्हान देणाऱ्या लोकांना स्वाभिमानाचे मूल्य विशेष न वाटण्याची शक्यता आहे. जे लोक जनतेचा 'आवाज' हाच देवाचा 'आवाज' असे मानतात ते अशा निष्कर्षाला येण्याची शक्यता आहे की सामान्यांपेक्षा कुठलेही वेगळ्या प्रकारचे मत किंवा वेगळ्या प्रकारची आवड ही एक प्रकारची नास्तिकता, अश्रद्धा आहे, आणि समूहाच्या वैध अधिकाराविरुद्ध केलेले ते एक बंड आहे व त्याबद्दल या लोकांना शासन केले पाहिजे. हा परिणाम टाळावयाचा असेल तर समताधिष्ठित लोकशाहीइतकेच व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य मानले गेले पाहिजे. प्रत्येक व्यक्ती समुदायाची गुलाम आहे असा समाज, प्रत्येक व्यक्ती एका जुलुमी सत्ताधिशाची गुलाम आहे अशा समाजापेक्षा रतिभरच चांगला म्हणता येईल हे ओळखले पाहिजे. सर्वजण गुलाम असले तरी समता आहे, आणि सर्वजण स्वतंत्र आहेत तेथेहि समता आहे. केवळ समतेच्या अस्तित्वामुळे चांगला समाज निर्माण होतो असे नाही हे यावरून दिसून येते.

म्हणजे कामात रस कसा निर्माण होईल, म्हणजे केवळ पैसा मिळविण्याचे साधन एवढेच कामाचे स्वरूप न राहण्यासाठी काय करावे हा उद्योगप्रधान समाजातील सर्वांत महत्त्वाचा—व सर्वांत अवघड तर निश्चितच—प्रश्न आहे. ज्या कामात कोणत्याही प्रकारचे विशेष कसब

आवश्यक नसते, अशा कामांच्या बाबतीत हा प्रश्न विशेष अवघड असतो. दुर्घट काम ज्यांना करणे जमते त्यांना त्याचे आकर्षण वाटण्याची शक्यता असते. शब्दकोडी सोडविणे आणि बुद्धिबळे खेळणे या गोष्टींची तुलना काही प्रकारच्या कसबी कामांशी करता येण्यासारखी आहे आणि तरीही पुष्कळ लोक केवळ आनंदाखातर त्यांवर आपले पुष्कळ श्रम खर्च करतात. परंतु यांत्रिकीकरणाचे प्रमाण वाढते आहे तसे अतिशय सोपी आणि तीच तीच कंटाळवाणी क्रिया कराव्या लागणाऱ्या मजुरांचे प्रमाण सारखे वाढतच आहे. प्रा. अबरक्रॉंबी आपल्या 'ग्रेटर लंडन प्लॅन, १९४४' या पुस्तकात विवेचनाच्या ओघात सहज सांगतात की, अनेक आधुनिक उद्योगधंद्यांत विशेष प्रकारच्या कौशल्यांची वा आवडीनिवडींची गरज भासत नाही. आणि म्हणून पूर्वापार कसबी कारागीर असलेल्या प्रदेशात मुद्दामहून आधुनिक कारखाने स्थापन करण्याची जरुरी नाही. ॲबरक्रॉंबी म्हणतात, "विशिष्ट कौशल्ये बाळगणाऱ्या कामगारांच्या एका गटावर अवलंबून राहण्याची आधुनिक उद्योगधंद्यांना जरुरी नसते. कारण आधुनिक उत्पादनप्रक्रियांसाठी फारसे कसब लागत नाही; कामगारांत सातत्य आणि विश्वसनीयता असण्याची फार मोठी जरुरी असते. आणि हे दोन गुण आज कुठल्याही भागातील कामगारांच्यात आढळून येतात."

काम करण्यांतले सातत्य व विश्वसनीयता हे दोन अत्यंत उपयोगी गुण आहेत यात शंका नाही. परंतु माणसाने करावयाच्या कामाला फक्त याच दोन गुणांची जरूरी असेल, तर तो करीत असलेल्या कामात त्याचे मन विशेष रमणार नाही, आणि मग त्याला आपल्या जीवनातील समाधान आपल्या कामाच्या व्यतिरिक्त इतर वेळांत आणि इतर गोष्टींत शोधावे लागेल. असे असणे अगदी अटळच आहे असे मला वाटत नाही.

मुळातच त्याच्या कामाचे स्वरूप एकच गोष्ट पुन्हा पुन्हा करण्याचे, कंटाळवाणे आणि निरस असले तरी, काही प्रमाणात त्याच्या कामात त्याला रस उत्पन्न होईल अशी व्यवस्था करणे शक्य आहे.

यासाठी पहिली गोष्ट ही करावयास पाहिजे की, कारागीर जेव्हा स्वतः मालकही होतो त्यावेळी कारागिराची असलेली कामासंबंधीची भावना आजच्या मजुरांत काही प्रमाणात तरी पुन्हा जागृत करावयास पाहिजे. यंत्रसामुग्रीच्या बाबतीत, प्रत्येक कामगार यंत्राचा मालक होऊ शकत नाही; परंतु "हे मी केलेले काम" किंवा निदान "हे आम्ही केलेले काम आहे" असे सांगण्यात जी अभिमानाची भावना असते ती भावना निर्माण करता येणे शक्य आहे. अर्थात "आम्ही केलेले काम" असे म्हणताना 'आम्ही' हा गट छोटा, एकमेकांना ओळखणारा व एकोप्याची भावना असणारा पाहिजे. राष्ट्रीयीकरणामुळे हे साध्य होत नाही. कारण व्यवस्थापकवर्ग आणि अधिकारीवर्ग हे भांडवलशाही व्यवस्थेत कामगारांपासून जितके दूर होते, जवळपास तितकेच राष्ट्रीयीकरण केल्यानंतरही दूर रहातात. अंतर्गत व्यवहारात त्या त्या स्थानिक पातळीवर लोकशाही प्रस्थापित करणे हीच खरी गरज आहे. उदाहरणार्थ, मुकादम आणि व्यवस्थापक यांची नेमणूक करावयाचा अधिकार, ज्या कामगारांवर ते देखरेख करतात त्यांना असला पाहिजे.

औद्योगिक कारखान्याच्या शासनाचे अधिकार हाती असलेल्या व्यक्ती कामगारांपासून फार दूर राहिल्यास आणि कामगारांशी त्यांची वर्तणूक माणुसकीची नसल्यास सामान्य कामगाराला कारखान्याविषयी वा कामाविषयी मालकाची आत्मीयता वाटणे अशक्य आहे. मि. बर्नहॅम यांनी आपल्या 'मॅनेजरियल रेव्होल्यूशन' या पुस्तकात भविष्यकाळातील औद्योगिक समाजरचनेचे रेखाटलेले चित्र मन उत्साहित करणारे नाही.

बर्नहॅमने भविष्यवाणी केलेल्या रंगहीन, नीरस समाजरचनेतून आपली सोडवणूक करून घ्यावयाची असेल, तर औद्योगिक व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने संघटित करणे ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. त्या विषयाचे श्री. जेम्स जिलेस्पी यांनीं आपल्या 'फ्री एक्स्प्रेशन इन इंडस्ट्री' या ग्रंथात या मुद्द्याचे उत्तम विवेचन केलेले आहे. त्यांचे म्हणणे उद्धृत केल्यावाचून मला रहावत नाही. ते म्हणतात,

"जेव्हा एखाद्या व्यक्तीपुढे अथवा गटापुढे एकादा महत्त्वाचा प्रश्न उभा रहातो, तेव्हा तो प्रश्न घेऊन थेट वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत जाता न आल्यास ती व्यक्ती किंवा तो गट यांच्यात एक प्रकारची वैफल्याची भावना निर्माण होते. सरकारी नोकरशाहीप्रमाणेच औद्योगिक नोकरशाहीतली तशीच परिस्थिती असते—तोच वेळकाढूपणा, तीच 'अ' कडून 'ब'कडे होणारी टोलवाटोलवी, तीच नियमाकडे बोट दाखविण्याची पद्धत आणि मग तीच असाहाय्यतेची आणि वैफल्याची भावना तेथेही आढळते. 'मला मालकांकडे, मॅनेजराकडे जावयास मिळाले असते तर त्याला माझे म्हणणे कळले असते, त्याने माझे ऐकले असते' ही वरिष्ठांपर्यंत जाण्याची इच्छा फार खरी आणि फार महत्त्वाची आहे. कामगारांनी निवडून दिलेले त्यांचे पुढारी आणि व्यवस्थापक व वरिष्ठ अधिकारी यांच्या होणाऱ्या मासिक बैठकीचा उपयोग नाही असे नाही; परंतु मालक आणि कामगार यांच्यांतील प्रत्यक्ष संबंधाची गरज या बैठकीने प्रभावीपणे भरून निघत नाही. उदाहरणार्थ, शॉप-स्टयूअर्ड किंवा ऑपरेटर आपल्या फोरमनकडे एखादा प्रश्न घेऊन गेला, तर तो फोरमन, त्याच्या हातात काहीच अधिकार नसल्यामुळे, तो प्रश्न सुपरिटेंडंटकडे पाठविण्यापलिकडे काही करू शकत नाही. सुपरिंटेंडंट तो वर्क्स मॅनेजरकडे पाठवील. वर्क्स मॅनेजर तो प्रश्न पुढील बैठकीसमोर मांडण्यापलिकडे दुसरे काही करू शकणार नाही.

किंवा तो प्रश्न कर्मचारी-कल्याण खात्याकडे सोपविला जाईल. ते खातेही एका अवाढव्य कारखान्यातील तसेच अवाढव्य खाते असते आणि पर्सोनेल वा वेल्फेअर ऑफिसरचे काम सांभाळणारी व्यक्ती हा प्रश्न हाती घेईल. बरे, तो पर्सोनेल किंवा वेल्फेअर ऑफिसरही वस्तुतः मालक वा मॅनेजिंग डायरेक्टर यांच्या कामाचे एक उपांग सांभळण्यापुरता असतो. तेथील अधिकारी हा शक्य असल्यास तो सोडवितो किंवा व्यवस्थापक अथवा मालक यांच्यासाठी तो प्रश्न राखून ठेवतो.

"प्रचंड कारखान्यात काम करणाऱ्या सामान्य कामगारांत फक्त वैफल्याची भावना निर्माण होते असे नव्हे, तर सामान्य कामगाराला कारखान्यात चाललेल्या त्या क्रियांमध्ये विचित्र अर्थशून्यता वाटू लागते. तो करीत असलेल्या कामाचे कारखान्यांच्या दृष्टीने असलेले महत्त्व त्याला उमजत नसते. खरा मालक कोण आहे याची त्याला निश्चित कल्पना नसते. पुष्कळदा त्याला मुख्य व्यवस्थापक कोण आहे याचीही माहिती नसते. आणि पुष्कळदा वर्क्स मॅनेजरशी बोलण्याची वेळही त्याला सहसा कधी येत नाही. विक्रीखात्याचा प्रमुख, उत्पादनखात्याचा प्रमुख, उत्पादन-नियोजन-प्रमुख, कल्याण-विभाग प्रमुख आणि इतर बरेच अधिकारी त्याच्या दृष्टीने फक्त, कामाचे तास कमी असूनही अधिक पगार मिळविणारे लोक असतात. त्याला त्यांच्याशी काहीच कर्तव्य नसते. त्यांचा व त्याचा एक गट नसतो."

राजकीय क्षेत्रात काय किंवा उद्योगधंद्याच्या क्षेत्रात काय, जोपर्यंत सरकार किंवा व्यवस्थापक-वर्ग यांच्याविषयी, ती एक अस्मानी-सुल्तानी गाजविणारी संस्था आहे अशी सामान्य जनांत दूरत्वाची, परकेपणाची भावना आहे, आणि त्यांच्याविषयी मनांत द्वेषभावना बाळगणे स्वाभाविक वाटते, (ही द्वेषभावना जोपर्यंत बंडाच्या स्वरूपात उफाळून येत नाही तोपर्यंत निर्बल असते), तोपर्यंत लोकशाही

ही व्यक्तींचा मनोधर्म बनलेली आहे असे समजता येत नाही. श्री. जिलेस्पी यांनी दाखवून दिल्याप्रमाणे, उद्योगधंद्याच्या क्षेत्रात लोकशाही निर्माण होण्याच्या दिशेने आजवर काहीच प्रयत्न केला गेलेला नाही. उद्योगधंद्यातील व्यवस्थापनाचे स्वरूप क्वचित अपवाद वगळता, उघडउघड राजेशाही थाटाचे तरी आहे किंवा गटशाही पद्धतीचे तरी आहे. ही एक अशी अनिष्ट गोष्ट आहे की, तिला जर प्रतिबंध केला नाही, तर संघटनेच्या आकारातील वाढीबरोबर या अनिष्ट गोष्टीचे प्रमाणही वाढतच जाते.

ऐतिहासिक कालापासून बहुसंख्य मानवजात ही दारिद्र्य, दुःख आणि जुलूम यांच्या ओझ्याखाली दबून गेलेली आहे, जुलुमी, दूरस्थ सत्ताधीशांच्या पुढे स्वतःला असहाय्य समजत आलेली आहे. संवर्धन करण्यासाठी अशा बड्या, दूरस्थ सत्तांची किंवा बहुसंख्य जनतेने संस्कृतीचे संरक्षण वा दारिद्र्यात, दुःखात वा जुलुमात राहण्याची आता काहीच जरुरी उरलेली नाही. आधुनिक विज्ञान, आधुनिक तंत्र यांच्या मदतीने ह्या अनिष्ट गोष्टी आपण दूर करू शकू. परंतु यासाठी आधुनिक विज्ञान व आधुनिक तंत्र यांचा उपयोग करताना भूतदयेची दृष्टी बाळगली पाहिजे. त्याचबरोबर जीवनपोषक स्रोत कोणते आणि जीवनानंद कशात साठवलेला आहे त्यांचीही योग्य समज आधुनिक विज्ञान आणि आधुनिक तंत्र यांचा वापर करताना ठेवली पाहिजे. ती जर ठेवली नाही, तर आपण अजाणता दुसरा एकादा नवीन प्रकारचा तुरुंग तयार करू. हा तुरुंग कदाचित् न्यायावर आधारीत असेल, कारण त्या तुरुंगाबाहेर कोणीच नसेल, परंतु तो नक्कीच कंटाळवाणा, सुतकी आणि आत्मिकदृष्ट्या प्राणहीन असेल. हे भयंकर अरिष्ट आपण कसे टाळू शकू याचा विचार मी शेवटच्या दोन व्याख्यानांत करीन.

आधुनिक यांत्रिक तंत्रांच्या वापराने वस्तूची गुणवत्ता खालावण्याचे एक विचारप्रवर्तक आणि दु:खद उदाहरण स्कॉटिश ट्वीड कापडाच्या उत्पादनव्यवसायात आढळून येते. हातमागावरील ट्वीड कापड सर्व जगात अत्यंत उत्तम प्रतीचे मानले जाते. फार पूर्वीपासून स्कॉटिश हायलँडस्, हेब्रीडीज, ऑर्क्नी व शेट्लँड बेटे येथे ते तयार होते. परंतु यांत्रिक मागावर तयार होणाऱ्या ट्वीड कापडामुळे हातमागावर कापड तयार करणाऱ्या कारागिरांना फार मोठा तडाखा बसलेला आहे. पार्लमेंटमधल्या दोन्ही सभागृहांत झालेल्या चर्चांमधून असे दिसून आले की खरेदीकरामुळे ह्या कामगारांवर अखेरचा प्राणांतिक घाव बसलेला आहे. यामुळे ज्या कारागिरांना हा व्यवसाय चालवून उपजीविका करणे शक्य होत नाही त्या कारागिरांना आपापली जन्मस्थाने सोडून शहरांत किंवा अन्यत्र स्थलांतर करणे भाग पडले आहे.

ह्या विक्रीकरामुळे कररूपाने सरकारला दहा ते पंधरा लाख पौंड दर वर्षी मिळतात परंतु या तात्कालिक फायद्याच्या मोहाखातर जे दीर्घकालीन नुकसान आपण करून घेत आहोत, त्याची मोजदाद करणे कठीण आहे.

पहिले नुकसान असे की 'औद्योगिक क्रांती'च्या उत्कर्षाच्या काळात आपण आंधळेपणाने आणि लोभाने जे अनेक तोटे सोसले त्यांत भर म्हणून, स्थानिक व पूर्वापार चालत आलेले आणखी कसब नाश पावले. ह्या लोकांना पूर्वी आपल्या कामातून कुशल कारागिरीचा आनंद मिळत होता. तसेच त्यांचे जीवन खडतर होते तरी, त्यांत प्रतिष्ठेची आणि सार्थ गर्वाची भावना होती. आपल्या कष्टाने आणि हुशारीने आपण अडचणीच्या आणि अनिश्चित परिस्थितीतही उत्तम

कलाकृती निर्माण करू शकतो याचा आनंद त्यांना मिळत होता.

दुसरे नुकसान असे, निर्माण केलेल्या वस्तूचे अभिजात सौंदर्य आणि काही प्रमाणात तिची उपयुक्तता यांतही यांत्रिकीकरणामुळे घट झाली आहे.

तिसरे नुकसान असे की स्थानिक उद्योगधंद्यांचा अशा रीतीने नाश केल्यामुळे शहरांची अनिर्बंध वाढ होण्याची प्रवृत्ती अधिकच उग्र स्वरूप धारण करते. आणि अशा प्रकारची अनिर्बंध वाढ थांबविण्यासाठीच आपण राष्ट्रीय पातळीवर शहरांची योग्य आंखणी करण्याचा प्रयत्न करीत आहोत! स्वतंत्र, स्वावलंबी विणकर हे एका अजस्र, भयानक आणि रोगट मानवी वारुळांतील कामकरी मुंग्या बनतात. त्यांचे आर्थिक स्थैर्य आता त्यांच्या अंगातील कसबावर आणि निसर्गशक्तींवर अवलंबून राहिलेले नाही. ते स्थैर्य आतां प्रचंड औद्योगिक संघटनांच्या स्थैर्यात विलीन झालेले आहे. या रचनेंत एक संघटना कोलमडली की सर्व आर्थिक संघटनाच कोलमडते. आणि ह्या अपयशाची कारणमीमांसा मात्र कोणाला कळून येत नाही.

औद्योगिक क्रांतीची एक सूक्ष्म प्रतिमाच वरील प्रक्रियेत सांठवलेली आहे. ही प्रक्रिया आजच्या काळात घडत राहावी ही गोष्ट अक्षम्य आहे. त्याची दोन कारणे सांगता येतील. एक तर, जुन्या जमान्यातल्या सुरवातीच्या काळातील उद्योगपतींना स्वतःच्या कृतीचे काय परिणाम होतील याची नीट कल्पना नव्हती. आपल्याला त्या दुष्परिणामांची आता नीट कल्पना आहे. दुसरे असे की वस्तूंची निर्मिती वाढविण्यासाठी हे दुष्परिणाम सोसलेच पाहिजेत अशी सध्या परिस्थिती नाही. किंवा कामगारांचे जीवनमान वाढविण्यासाठी म्हणूनही हे दुष्परिणाम सोसावयाची जरुरी नाही. वीज-निर्मितीमुळे आणि मोटार-वहातुकी-मुळे उद्योगधंद्यांचे लहान लहान गट करणे हे आर्थिक दृष्ट्या केवळ

शक्यच नव्हे तर फायद्याचेही झालेले आहे. कारण त्यामुळे लांबवरून वहातूक करणे व मोठी अवजड यंत्रणा उभी करणे यांच्यासाठी अवाढव्य खर्च करण्याची गरज रहात नाही. जिथे जिथे म्हणून ग्रामीण उद्योगधंदे चालू आहेत, तिथे तिथे त्यांचे हळू-हळू यांत्रिकीकरण करण्यात आले पाहिजे. परंतु त्यांचे स्थलांतर करण्यात येऊ नये व त्यांचे प्रमाणही लहान ठेवले जावे.

जगातील ज्या भागांत औद्योगीकरण अजूनही बाल्यावस्थेत आहे, त्या भागात औद्योगीकरणाच्या प्रक्रियेचे आपण ब्रिटनमध्ये जे भयंकर दुष्परिणाम अनुभवले ते टाळण्याची अजून शक्यता आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थान अजूनही छोट्याछोट्या ग्रामीण समाजांचा देश आहे. या परंपरागत जीवन-क्रमांत जरी अनेक अनिष्ट गोष्टी असल्या तरी, त्या जीवनक्रमातून उठवून आकस्मिकपणे आणि जोरजबरदस्तीने मोठ्या औद्योगिक शहरांतील अधिक अनिष्ट असा जीवनक्रम या देशांतील लोकांवर जर लादला गेला तर ती एक दुर्दैवी घटना ठरेल. कारण हा आघात ज्या लोकांचे जीवनमान आधीच अगदी निकृष्ट आहे त्यांच्यावर येऊन कोसळणार आहे. हाच धोका लक्षात घेऊन गांधीजींनी हातमागाची देशव्यापी चळवळ सुरू करून या खंडप्राय देशांत आधुनिक कालाची गती रोखण्याचा प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे पन्नास टक्के योग्य होते. परंतु विज्ञानाने आपल्याला जो मदतीचा हात पुढे केलेला आहे त्याचा स्वीकार आपण केला नाही तर ते मूर्खपणाचे ठरेल. त्यापेक्षा हा लाभ उत्साहाने स्वीकारला पाहिजे व देशांतील भौतिक संपत्ती वाढविण्यासाठी त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. परंतु असे करीत असताना आपण मोकळी हवा, छोट्याश्या जमातीत व्यक्तीला मिळणारे महत्त्वाचे स्थान व प्रतिष्ठा, आपल्यावर जबाबदारी टाकली गेलेली आहे यामुळे निर्माण होणारा सार्थ अभिमान, काम उत्तम-

प्रकारे केल्यामुळे होणारा आनंद या गोष्टी कायम राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रचंड औद्योगिक शहरांत काम करणाऱ्या कामगारांना या साध्या हक्कांपासून वंचित रहावे लागते. ग्रामीण उद्योगधंद्यांचे हळूहळू यांत्रिकीकरण करणे व लोकांचे जीवनमान यासाठी आवश्यक असणारी सर्व वीज हिमालयांतून उगम पावलेल्या नद्या देऊ शकतील. यासाठी प्रचंड आर्थिक मंदीचे मोल देण्याचे कारण नाही. तसेच जुन्या परंपरा आकस्मिकपणें उखडून टाकल्यामुळे होणारा तेजोभंग व निर्माण होणारी चैतन्यहीनता सहन करावी लागणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम

व्याख्यान पाचवे

# नियंत्रण व उपक्रमशीलता यांची कार्यक्षेत्रे

सुदृढ आणि प्रगतिशील समाजाला प्रभावी केंद्रीय नियंत्रण व व्यक्तींची आणि गटांची उपक्रमशीलता या दोन्हींची जरुरी असते. नियंत्रण नसेल तर अराजक माजेल आणि उपक्रमशीलता नसेल तर समाजाची प्रगती खुंटेल. कुठल्या गोष्टींवर नियंत्रण असावे आणि कुठल्या गोष्टी वैयक्तिक किंवा सार्वजनिक उपक्रमशीलतेसाठी राखून ठेवाव्या याविषयी काही सर्वसामान्य तत्त्वे शोधण्याचा मी या व्याख्यानात प्रयत्न करीन. समाज ज्या गुणवैशिष्ट्यांनी संपन्न असावा असे आपणास वाटते त्यातील काही गुणवैशिष्ट्ये मूलतः स्थितिशील असतात, तर काही गुणवैशिष्ट्ये स्वभावतःच गतिशील असतात. सर्वसाधारणपणे आपण असे म्हणू शकतो की स्थितिशील गुणवैशिष्ट्ये शासनाच्या नियंत्रणाच्या कक्षेत येतात, तर गतिशील गुणवैशिष्ट्यांची जोपासना व्यक्ती व गट यांच्या उपक्रमशीलतेतून व्हावी हे इष्ट होय. परंतु उपक्रमशीलतेस असा वाव राहावयाचा असेल, आणि ती जर

समाजविघातक न ठरता समाजोपयोगी ठरावी अशी जर आपली इच्छा असेल, तर त्या उपक्रमशीलतेची जोपासना सुयोग्य संस्थांकरवी होण्याची जरुरी राहील आणि अशा संस्थांचे रक्षण करणे हे सरकारचे एक कर्तव्य मानावे लागेल. जिथे अराजक माजले आहे, तिथे विद्यापीठाचे कार्य, किंवा विज्ञानाचे संशोधन, किंवा ग्रंथनिर्मिती शक्य होणार नाही हे उघड आहे. किंबहुना अशा अराजकात साध्या सुट्टीचा उपभोग सुद्धा घेता येणार नाहीं. आजच्या गुंतागुंतीच्या व्यामिश्र जगात शासनाशिवाय उपक्रमशीलता परिणामकारकरीत्या कार्य करू शकत नाही. परंतु दुर्दैवाने, उपक्रमशीलतेचा अभाव असला तरी शासनाचे कार्य चालू राहू शकते.

माझ्या मते शासनाची पुढील तीन प्राथमिक उद्दिष्टे असली पाहिजेत. सुरक्षितता, न्याय व जपणूक या तीन गोष्टी मानवी सुखाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि ह्या गोष्टी फक्त एक शासन योग्य प्रकारे करू शकेल. परंतु त्याच वेळी हे लक्षात ठेवले पाहिजे की ह्या तिन्ही गोष्टींपैकी कोणतीही अगदी पराकोटीच्या महत्त्वाची नाही. वेळीप्रसंगी इतर हितकारक गोष्ट अधिक प्रमाणात साध्य करण्यासाठी यांपैकी कुठल्यातरी गोष्टीचा थोड्याफार प्रमाणात त्याग करावा लागला तर तो केला पाहिजे. ह्या प्रत्येक गोष्टीविषयी मी क्रमाने माझे विचार मांडतो.

देशांतील लोकांचे व मालमत्तेचे *संरक्षण* हे शासनसंस्थेच्या आद्य हेतूंपैकी एक आहे. ही गोष्ट नेहमीच मान्य केली गेलेली आहे. बऱ्याच देशांतील शासनसंस्था कायद्यानुसार वागणाऱ्या नागरिकांना इतर नागरिकांपासून संरक्षण देतात, परंतु नागरिकांना खुद्द शासन-संस्थेपासूनच संरक्षण देण्याची आवश्यकता मान्य करीत नाहीत. ज्या देशात शासनयंत्रणेच्या आदेशावरून व्यक्तीला अटक होऊ शकते

आणि न्यायालयात खटला न चालताच शिक्षा होऊ शकते तिथे सर्वसामान्य माणसाचे जीवित सुरक्षित असत नाही, मग त्या देशातील शासनसंस्था कितीही सुप्रतिष्ठित असो—आणि जिथे न्यायाधीश प्रशासनयंत्रणेचाच एक भाग असतील तिथे न्यायालयीन खटल्याचा आग्रह धरणे एवढेही पुरेसे ठरत नाही. या विचारांना सतराव्या आणि अठराव्या शतकांत अतिशय महत्त्व प्राप्त झाले. 'नागरिक स्वातंत्र्य', 'मूलभूत मानवी हक्क' या घोषवाक्यांमध्ये वरील विचार त्यावेळी ग्रथित झालेला होता. परंतु जे 'स्वातंत्र्य' आणि जे 'हक्क' मागितले जात ते लोकांना मिळवून देण्याचे सामर्थ्य फक्त शासनसंस्थेतच होते, आणि 'उदारमतवादी' शासनसंस्थेखालीच या गोष्टी मिळू शकत होत्या. फक्त पाश्चिमात्य राष्ट्रांतच हे स्वातंत्र्य आणि हे हक्क जनता मिळवू शकली आहे.

पाश्चिमात्य राष्ट्रांतील जनतेला आज शत्रुराष्ट्रांकडून होणाऱ्या आक्रमणापासून संरक्षण मिळाल्यास त्यात अधिक रस आहे. अशी सुरक्षितता आज नाही म्हणून तिच्याबद्दल रस वाटतो आणि जसजशी युद्धातील शस्त्रास्त्रांची संहारकता वाढत आहे, तसतसे अशा सुरक्षिततेचे महत्त्व अधिकाधिक वाढत आहे. संपूर्ण जगात ज्यावेळी एक शासनसंस्था प्रस्थापित होईल, व युद्धातील सर्व प्रभावी शस्त्रास्त्रांची मक्तेदारी ज्यावेळी अशा जागतिक शासनाच्या हाती येईल, त्यावेळी अशा प्रकारची सुरक्षितता शक्य होईल. ह्या विषयावर मी अधिक बोलू इच्छित नाही, कारण माझ्या विषयापासून हा विषय काहीसा दूर आहे. मी येथे फक्त एवढेच म्हणतो, आणि सगळा जोर देऊन सांगतो, की, जोपर्यंत मानवजात सर्व जगात एकच सार्वभौम शासनसंस्था आणि त्या शासनसंस्थेचे संरक्षण निर्माण करू शकत नाही, तोपर्यंत इतर सर्व मौल्यवान गोष्टी, मग त्या कोणत्याही क्षेत्रातील असोत वा कुठलयाही

प्रकारच्या असोत, त्यांचे अस्तित्व अनिश्चित, डळमळीत आहे. कारण त्या कोणत्याही क्षणी युद्धामुळे नष्ट होऊ शकतील.

आर्थिक सुरक्षितता हे अलिकडील ब्रिटिश कायद्यांचे एक अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट राहिलेले आहे. बेकारी, आजारपण, वृद्धावस्थेमुळे येणारे दारिद्र्य या गोष्टी दूर करण्यासाठी सरकारने विमायोजना सुरू केलेल्या आहेत. त्यामुळे मजूरवर्गाच्या जीवनातील भविष्यकाला-विषयीची क्लेशजनक अनिश्चितता पुष्कळच कमी झालेली आहे. वैद्यकीय मदतीच्या वेगवेगळ्या योजनांमुळे मनुष्याचे आयुर्मान वाढले आहे व आजाराचे प्रमाण कमी झाले आहे. जनतेला आरोग्यविषयक सुरक्षितता बऱ्याच प्रमाणात मिळू लागलेली आहे. एकंदरीत पहाता युद्धे वगळता पाश्चिमात्य राष्ट्रांतील सध्याचे जीवन अठराव्या शतकातील जीवनापेक्षा बरेच कमी धोक्याचे आहे. आणि हा बदल वेगवेगळ्या प्रकारच्या सरकारी नियंत्रणामुळेच घडून आलेला आहे.

सुरक्षितता ही एक फार चांगली गोष्ट आहे यांत शंका नाहीं. परंतु तिचा फारच पाठलाग केला, तर तिचे स्तोम माजून बसते. सुरक्षित जीवन जर सर्वस्वी चाकोरीत फिरणारे आणि कंटाळवाणे असेल, तर ते कळाहीन होईल. बरेच लोक, विशेषतः तरुण वयात, धोकादायक साहस करण्यासाठी उत्सुक असतात आणि म्हणूनच कंटाळवाण्या सुरक्षिततेपासून सुटका करून घेण्यासाठी युद्धदेखील त्यांना हवेसे वाटण्याची शक्यता असते. सुरक्षिततेची इच्छा ही भीतीतूनच निर्माण झालेली असते, आणि म्हणूनच अकरणात्मक असते. समाधानी जीवनासाठी आशेतून प्रेरणा मिळणारे काही क्रियात्मक ध्येय असावे लागते. आशेवर उभारलेल्या अशा साहसी उद्दिष्टांच्या मार्गात धोका असतो, आणि त्यामुळे भीतीही असते. परंतु जाणूनबुजून स्वीकारलेली भीती, बाहेरच्या परिस्थितीने लादलेल्या

भीतीसारखी अनिष्ट गोष्ट नसते. म्हणूनच केवळ सुरक्षितता लाभली म्हणजे सर्व अंतिम सुख लाभले असे आपण मानता कामा नये.

आणि आता न्यायाचा विचार करू या.

*न्याय*–विशेषतः आर्थिक न्याय हे सरकारने साध्य करावयाचे उद्दिष्ट होऊन बसले आहे. ही घटना अगदी अलिकडच्या काळातली आहे. समतेत न्यायही आलाच, अशी न्यायासंबंधी सर्वसाधारण समजूत झालेली आहे. याला अपवाद म्हणजे विशेष गुणवत्तेसाठी जादा–, पण फार अधिक नाही असा मोबदला देणे युक्त होईल असे काही बाबतीत मानले जाते. *राजकीय* न्याय, म्हणजेच लोकशाही, हे फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांत्यांच्या काळापासूनचे एक ध्येय आहे. परंतु **आर्थिक** न्याय हे एक नवीन ध्येय आहे आणि ते साध्य करावयाचे असेल तर पुष्कळ अधिक सरकारी नियंत्रणाची जरुरी भासते. समाजवाद्यांच्या मते आर्थिक न्याय साध्य करण्यासाठी सर्व मोक्याचे उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे होण्याची जरुरी आहे आणि परकीय राष्ट्रांबरोबर होणाऱ्या व्यापारावरही पुष्कळसे नियंत्रण असण्याची जरुरी आहे. त्यांचे हे म्हणणे बरोबर आहे असे मला वाटते. समाजवादाला विरोध करणारे असे म्हणू शकतात, की आर्थिक न्यायाची फार जबर किंमत द्यावी लागण्याची शक्यता आहे. परंतु आर्थिक न्याय मिळवावयाचा असेल, तर उद्योगधंद्यांवर आणि अर्थव्यवस्थेवर फार मोठ्या प्रमाणात सरकारी नियंत्रण असणे अत्यावश्यक आहे, ही गोष्ट कोणालाही नाकारता येणार नाही.

परंतु आर्थिक न्यायालाही काही मर्यादा आहेत. आणि आर्थिक न्यायाचे अत्यंत कडवे पाश्चिमात्य पुरस्कर्तेही, त्यांच्याविषयी मुग्धता स्वीकारून का होईना, त्या मर्यादा मान्य करतात. उदाहरणार्थ जगाच्या दरिद्री भागांतील लोकांची परिस्थिती सुधारून आर्थिक

समतेच्या दिशेने वाटचाल करण्याचे मार्ग शोधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या भागातील जनतेचे प्रचंड दुःख कमी व्हावे एवढ्यासाठीच केवळ अशा प्रयत्नांचें महत्त्व नाही, तर जगात जर एवढ्या ढळढळीत प्रमाणावर असमानता अस्तित्वात राहिली तर जगाला स्थैर्य लाभणार नाही व महायुद्धे टळणार नाहीत, यासाठीही अशा प्रयत्नांचे सर्वाधिक महत्त्व आहे. परंतु पाश्चिमात्य राष्ट्रे आणि आग्नेय आशिया खंड, यांच्यांत आर्थिक समता प्रस्थापित करावयाची असल्यास सावकाशीनेच वाटचाल केली पाहिजे. नाहीतर अधिक सुस्थितीतील राष्ट्रे, कमी सुस्थितीत असलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीला येऊन बसतील, आणि त्यात दरिद्री राष्ट्रांचाही फार फायदा होणार नाही.

सुरक्षिततेप्रमाणेच, पण तीहूनही अधिक प्रमाणात, न्याय या तत्त्वालाही मर्यादा आहेत. जेथे सर्व लोक सारखेच श्रीमंत तेथे आर्थिक न्याय अस्तित्वात असतो, त्याचप्रमाणे जेथे सर्व लोक सारखेच गरीब आहेत तेथेही आर्थिक न्याय अस्तित्वात असतो, परंतु गरीब श्रीमंत होणार नसतील तर श्रीमंतांना गरीब करणारी समता अर्थपूर्ण ठरेल असे वाटत नाही. समतेची स्थापना करण्याच्या प्रयत्नांत, जर गरीब पूर्वीपेक्षा अधिकच गरीब होणार असतील, तर मग आर्थिक न्याय-प्रस्थापनेची विरोधी बाजू अधिकच बळकट होते. आणि जर समतेची प्रस्थापना केल्यामुळे शिक्षणाचा कस कमी झाला, किंवा महत्त्वपूर्ण संशोधनाचे कार्य मागे पडले, तर वरीलसारखा परिणाम होण्याची शक्यता बरीच आहे. ईजिप्त आणि बॅबिलोनमध्ये आर्थिक विषमता नसती तर लेखनाच्या कलेचा शोध तिथे लागूच शकला नसता. तथापि, आधुनिक उत्पादनतंत्रांमुळे औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशात मानवसंस्कृतीच्या प्रगतीसाठी आर्थिक अन्याय व शोषण कायम चालू ठेवण्याची आवश्यकता आज उरलेली नाही. प्राचीन काळी, मानव-



१५८३६

संस्कृतीत प्रगती व्हावयाची असल्यास आर्थिक विषमतेखेरीज ती होणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य होते. आज मानवसंस्कृतीची प्रगती व आर्थिक न्याय यांच्यात असा विरोध नाही. आर्थिक न्याय हा काही परिस्थितीत प्रगतीच्या आड येतो हा धोका ध्यानात ठेवला म्हणजे झाले.

आणि आता जपणुकीकडे वळू या.

सुरक्षितता आणि न्याय या दोन्हीप्रमाणेच **जपणुकी**साठीही शासनसंस्थेने क्रिया करण्याची गरज भासते. प्राचीन अवशेषांचे, सौंदर्यस्थलांचे रक्षण व रस्ते आदी सार्वजनिक उपयोगाच्या बांधकामांची दुरुस्ती व डागडुजी एवढाच जपणुकीचा अर्थ मला अभिप्रेत नाही. युद्धकाळ वगळता या गोष्टी सध्याही केल्या जातातच. जगातील नैसर्गिक साधनसंपत्तीची जपणूक ही गोष्ट प्रामुख्याने माझ्या मनात आहे. ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे आणि त्याच्याकडे फारच दुर्लक्ष केले जात आहे. अलिकडच्या दीडशे वर्षांच्या काळात मानवाने उद्योगधंद्यासाठी व शेतीसाठी लागणाऱ्या खनिजे व माती या नैसर्गिक संपत्तीचा फार मोठा वापर केला आहे आणि अजूनही वाढत्या प्रमाणांतच नैसर्गिक संपत्तीची ही उधळपट्टी चालू आहे. खनिज तेलाचा वापर हे याचे सर्वात ढळढळीत उदाहरण आहे. मानवाला हस्तगत होण्यासारखा तेलाचा साठा जगात किती आहे याची काही कल्पना नाही, परंतु कितीही असला तरी, तो साठा कधीही न संपणारा असणे शक्यच नाही. सध्याच तेलाची जरुरी इतकी भासू लागली आहे की उपलब्ध तेलाच्या साठ्यांची मालकी हे इतर अनेक कारणांबरोबर तिसरे महायुद्ध ओढवून घेणारे एक कारण ठरण्याचा धोका आहे. ज्या वेळी तेल भरपूर प्रमाणात मिळेनासे होईल, त्यावेळी आपल्या जीवनपद्धतीत फार फरक करावा लागेल. तेलाऐवजी अणुशक्तीचा वापर करण्याचा जर प्रयत्न केला तर,

'युरेनियम' आणि 'थोरियम'चे साठेही एक दिवस संपून जातील एवढेच होईल. आजचे उद्योगधंदे मूलतः नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापरावर अवलंबून आहेत आणि आजच्यासारखीच उधळपट्टी करीत राहिलो तर ती संपत्ती आपल्याला फार काळ पुरणार नाही.

शेतीविषयीची परिस्थिती तर काही तज्ज्ञांच्या मते याहूनही भयानक आहे. श्री. व्हॉग्ट यांच्या 'रोड टू सर्व्हायव्हल' या पुस्तकात त्यांनी हे मोठ्या ठसठशीतपणे दाखवून दिलेले आहे. काही थोडे सुदैवी प्रदेश वगळले (पश्चिम युरोप एक तसा सुदैवी प्रदेश आहे.) तर इतरत्र शेती करण्याच्या चालू पद्धतींमुळे जमिनीचा कस फार लवकर जातो. जमीन धुपून जाण्याच्या क्रियेचे सर्वात प्रसिद्ध उदाहरण अमेरिकेतील वाढत्या 'डस्ट बाउल'चे आहे. आणि जगातील बहुतेक भागांतून जमिनीची अशी धूप चालू आहे. आणि दरम्यान जगातील लोकसंख्या वाढतच आहे. आणि जमिनीची धूप थांबविण्यासाठी काही परिणामकारक उपाययोजना तातडीने केली नाही तर, पुढील पन्नास वर्षांच्या काळात अन्नधान्याचा भयानक तुटवडा पडणे अटळ आहे. याविषयी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे हे शेतीशास्त्राच्या अभ्यासकांना माहीत आहे. परंतु ती उपाययोजना अमलात आणावयाची कुवत फक्त सरकारच्याचपाशी आहे, आणि तेही, सरकार जर जनतेची अप्रियता स्वीकारण्यास व सहन करण्यास तयार व समर्थ असेल तरच. आजपर्यंत हा एक फारच दुर्लक्षिलेला प्रश्न राहिलेला आहे. आपापसातील युद्धे थांबवून एक सुस्थिर जग निर्माण करावयाची ज्यांची उमेद आहे त्यांनी ह्या प्रश्नाला तोंड दिलेच पाहिजे. आणि अन्नधान्याच्या तुटवड्याचा प्रश्न युद्धाने सोडविता येईल एवढ्या प्रमाणात जर लोकसंख्या युद्धाने कमी व्हावयाची असेल, तर ती युद्धेदेखील अलिकडे झालेल्या महायुद्धांपेक्षा अधिक महाविनाशक असावी लागतील. कारण गेल्या

दोन्ही महायुद्धांच्या काळांत जगाची लोकसंख्या कमी होण्याऐवजी उलट वाढलेलीच आहे असे आढळून आले. युद्धांना प्रतिबंध करण्याचा प्रश्न सोडला तर, नजिकच्या भविष्यकाळात जगातील वेगवेगळ्या राष्ट्रांतील सरकारांना ज्या प्रश्नांना तोंड द्यावे लागेल त्यांमध्ये हा शेतीसुधारणेचा प्रश्न कदाचित सर्वात महत्त्वाचा म्हणावा लागेल.

सुरक्षितता, न्याय आणि जपणूक ही तीन शासनाची सर्वात मूलभूत आवश्यक कार्ये आहेत, असे मी विवेचन केले. याचे कारण ती कामे फक्त एक शासन करू शकेल. केवळ तेवढीच कामे फक्त सरकारने करावी असा मात्र याचा अर्थ नव्हे. परंतु, सामान्यतः इतर क्षेत्रांत सरकारचे कार्य वैयक्तिक व सार्वजनिक उपक्रमशीलतेला प्रोत्साहन देण्याचे व हितकारकरित्या कार्यशील अशाप्रकारे उपक्रमशीलतेला संधी उपलब्ध करून देण्याचे असावे. अराजक माजविणारी किंवा गुन्हेगार प्रवृत्तीचीही उपक्रमशीलता असू शकेल. अशी उपक्रमशीलता अर्थातच सुसंस्कृत समाजाला सहन करता येणार नाही. उपक्रमशीलतेचे दुसरे अनेक, उदाहरणार्थ, एखाद्या प्रथितयश संशोधकाच्या उपक्रमशीलतेसारखे, प्रकार आहेत आणि अशा प्रकारच्या उपक्रमशीलतेची उपयुक्तता समाजात सर्वमान्य आहे. एकीकडे समाजाचे उघडच अहित करणाऱ्या उपक्रमशील व्यक्ती आणि दुसरीकडे समाजोपयोगी कार्य करणाऱ्या उपक्रमशील व्यक्ती सोडल्या तर उपक्रमशील व्यक्तींचा एक मोठा वर्ग असतो की ज्यांची उपक्रमशीलता समाजाला हितकारक ठरेल की नाही याची आधी कल्पना करता येत नाही. या वर्गातील व्यक्तींच्या संदर्भातच प्रयोगाचे स्वातंत्र्य असणे इष्ट आहे या गोष्टीची इष्टता प्रतिपादणे विशेष आवश्यक आहे. कारण या वर्गातील व्यक्तींकडेच मानवी कर्तृत्वाच्या इतिहासातील उत्तमोत्तम कामगिरीचे श्रेय जाते.

सरकारी नियंत्रणाचा एक नैसर्गिक परिणाम म्हणजे अनेक बाबतीत एकसारखेपणा निर्माण होणे. काही बाबतीत असा एकसारखेपणा इष्ट असतो, तर काही बाबतीत तो अनिष्ट असतो. मुसोलिनी सत्तेवर येण्याच्या अगोदर इटालीतील फ्लॉरेन्स शहरामध्ये रहदारीचे एकप्रकारचे नियम होते व नेमके त्याच्याविरुद्ध प्रकारचे नियम आजूबाजूच्या प्रदेशांत होते. अशा प्रकारची विविधता त्रासदायक होती हे खरेच; परंतु मुसोलिनीच्या फॅसिस्ट राजवटीने ही अनिष्ट विविधता ज्याप्रमाणे नष्ट केली त्याप्रमाणे इतर अनेक प्रकारची इष्ट विविधताही दडपून टाकली. विचारांच्या क्षेत्रांत वेगवेगळ्या विचारप्रणाली व वेगवेगळे मतप्रवाह असणे, व त्यांच्यात जोमदार चर्चा होणे ही गोष्ट अत्यंत इष्ट असते. वैचारिक क्षेत्रात मतामतांचा झगडा होणे आणि त्यांच्यांत जे मत सर्वोत्तम असेल तेच टिकून रहाणे ही एक उत्तम गोष्ट होईल. परंतु अशा प्रकारे वैचारिक संघर्षाला वाव द्यावयाचा असेल, तर ह्या संघर्षाला कोणती साधने वापरावीत यावर काही बंधने असणे आवश्यक आहे. युद्धाने किंवा खुनाने हा संघर्ष सोडविला जाता कामा नये. तसेच ज्यांची मते काही विशिष्ट प्रकारची आहेत किंवा ज्यांची मते लोकप्रिय नाहीत त्यांना तुरुंगात डांबणे किंवा त्यांना नोकरीधंदा मिळविणे अशक्य करणे याही मार्गांचा वापर होता कामा नये. भांडवलशाही व्यवस्थेत किंवा जिथे एकाच प्रदेशात अनेक छोटी छोटी राज्ये असतात तिथे (उदाहरणार्थ, रेनेसान्स काळातील इटालीत वा अठराव्या शतकातील जर्मनीत) प्रतिस्पर्धी आश्रयदाते मिळण्याची शक्यता असल्यामुळे, भिन्नभिन्न विचारप्रणाली अस्तित्वात रहाणे शक्य होते. परंतु जेव्हा राज्ये खूप मोठी होतात (जसे सर्व युरोपभर झाले) आणि 'राजाश्रय' देण्याइतकी संपत्ती असलेल्या धनाढ्य व्यक्ती दुर्मिळ होतात, तेव्हा वैचारिक विभिन्नता टिकविण्याचे पूर्वापार चालत आलेले मार्ग काम

देईनासे होतात. अशावेळी एकच मार्ग उरतो तो म्हणजे, शासन-संस्थेने ह्या वैचारिक स्पर्धेचे नियम ठरवून देणे आणि ते नियम पाळले जात आहेत याची स्पर्धेचा पंच या नात्याने दक्षता घेणे हा होय.

आजच्या काळात कलावंत आणि लेखक हे दोनच वर्ग असे राहिले आहेत की, जे, थोडीशी दैवाची मदत असेल तर, व्यक्तिशः काही महत्त्वाची व शक्तिशाली उपक्रमशीलता दाखवू शकतात. या उपक्रमशीलतेसाठी त्यांना गटाचा आधार लागत नाही. मी जेव्हा अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात राहात होतो, तेव्हा त्या राज्यातील भटक्या मजुरांची परिस्थिती जगाला निवेदित करण्याचा दोन व्यक्ती प्रयत्न करीत होत्या. त्यांपैकी एकजण कादंबरीकार होता, त्यामुळे त्याने हा विषय आपल्या कादंबरीत हाताळला. दुसरा त्या राज्यातील एका विद्यापीठातील प्राध्यापक होता. त्याने ह्याच विषयावर एक अभ्यासपूर्ण प्रबंध लिहिला. कादंबरी लोकप्रिय ठरून कादंबरीकाराला अलोट पैसा मिळाला. प्राध्यापकाची मात्र त्याच्या जागेवरून हकालपट्टी झाली आणि अत्यंत हलाखीच्या परिस्थितीला तोंड देण्याची त्याला तयारी ठेवावी लागली.

लेखकांची उपक्रमशीलता अजूनही जरी मुक्त असली, तरी तीही बऱ्याच अंगांनी धोक्यात आलेली आहे. रशियातल्याप्रमाणे ग्रंथप्रकाशन जर सर्वस्वी सरकारच्या हातात असेल, तर आपल्या राष्ट्रात काय प्रकाशित केले जावे हे सरकार ठरवू शकते. आणि ही सत्ता एखाद्या अपक्षीय स्वायत्त अधिकारमंडळाकडे जर सरकारने सोपवली नसेल, तर राज्यातील सामर्थ्यशाली राजकारणी व्यक्तींच्या मर्जीस आलेल्या पुस्तकांखेरीज इतर कोणतीही पुस्तके प्रसिद्ध होण्याची शक्यता नाही. हीच गोष्ट वृत्तपत्रांच्या बाबतीतही खरी आहे. या क्षेत्रात एकसारखेपणा अत्यंत घातुक आहे. परंतु अनिर्बंध समाजसत्तावादा-

खाली बहुधा शेवटी अशा प्रकारचा एकसारखेपणा निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाही.

माझ्या तिसऱ्या व्याख्यानात मी स्पष्ट केल्याप्रमाणे अद्यापीही लेखक एकेकट्याने काम करू शकतात तसे पूर्वी शास्त्रज्ञ एकेकट्याने आपले संशोधन करू शकत होते. कॅव्हेन्डिश, फॅरेडे आणि मेंडेल आपल्या संशोधनकार्यांसाठी कुठल्याही संस्थेवर अवलंबून नव्हते आणि डार्विनही, सरकारने 'बीगल' या जहाजाच्या सफरीबरोबर प्रवास करण्याची परवानगी दिली, एवढ्यापुरताच काय तो संस्थात्मक आश्रयावर अवलंबून होता. परंतु ही आता जुन्या जमान्यातील गोष्ट झाली आहे. बऱ्याच संशोधनकार्यासाठी फार महाग उपकरणांची जरुरी भासते, काही संशोधनकार्यासाठी अत्यंत दुर्गम प्रदेशांमध्ये संशोधकांच्या तुकड्या पाठवाव्या लागतात. सरकारकडून किंवा विद्यापीठांकडून संशोधनकार्याकरिता मदत मिळू शकली नाही तर आधुनिक विज्ञानात भर घालण्याचे कार्य फारच थोड्या व्यक्तींना शक्य होईल. त्यामुळे ज्या अटींवर अशी संधी मिळावयाची त्या अटी फार महत्त्वाच्या ठरतात. प्रचलित वादग्रस्त प्रश्नांमध्ये 'सनातनी' भूमिका घेणाऱ्या व्यक्तीच संशोधनकार्यासाठी आश्रयास पात्र समजल्या जाऊ लागल्या तर विज्ञानातील प्रगती लवकरच संपुष्टात येईल आणि मग मध्ययुगीन कालात शब्दप्रामाण्याच्या वर्चस्वामुळे ज्याप्रमाणे वैज्ञानिक प्रगतीचा कोंडमारा झाला, त्याचीच पुनरावृत्ती आधुनिक कालातही होईल.

राजकारणात व्यक्तीची उपक्रमशीलता गटाशी संलग्न झालेली ठळकपणे आढळून येते आणि तशी ती संलग्न होणे आवश्यकही असते. बहुधा दोन गटांचा यात संबंध येतो. राजकीय पक्ष आणि मतदार संघ हे ते दोन गट होय. तुम्हाला जर एखादी सुधारणा

घडवून आणावयाची असेल, तर त्या सुधारणेला तुमच्या पक्षाचा पाठिंबा तुम्हाला आधी मिळवावा लागतो. आणि नंतर तुमच्या पक्षाला पाठिंबा देण्यासाठी मतदारांना प्रवृत्त करावे लागते. अर्थात प्रस्थापित सरकारमार्फत तुम्हाला सरळच परस्पर सुधारणा घडवून आणणे शक्य होईलही, पण ज्या प्रश्नांच्याविषयी जनतेच्या भावना तीव्र असतात, त्यांच्या बाबतीत असे करणे सहसा शक्य होत नाही. सरळ सरकार-वरच दडपण आणणे शक्य नसते. तेव्हा एकादी सुधारणा घडवून आणण्यासाठी इतकी शक्ती आणि वेळ खर्च करावा लागतो, आणि हे प्रयत्न विफल होण्याची शक्यता इतकी मोठी असते, की बरेच लोक आहे तीच स्थिती ठीक म्हणून गप्प राहणे अधिक पसंत करतात. दर पांच वर्षांनी, निवडणुकींच्या वेळी, सुधारणा घडवून आणण्याची आश्वासने देणाऱ्या एखाद्या उमेदवारास आपले मत देणे ही त्यांच्या उपक्रमशीलतेची मर्यादा बनून जाते.

अतिशय सुसंघटित जगामध्ये, अगदी छोटे गट वजा करता, इतर गटांमध्ये व्यक्तिगत उपक्रमशीलता काही थोड्या व्यक्तींपुरतीच मर्यादित ठेवणे क्रमप्राप्त ठरते. उदाहरणार्थ, तुम्ही जर एखाद्या लहानशा समितीचे सभासद असाल तर तुम्हाला त्या समितीच्या निर्णयावर स्वतःचा प्रभाव टाकण्याची आशा बाळगता येते. राष्ट्राच्या राजकारणात तुम्ही दोन कोटी मतदारांतील एक असता, म्हणून तेथे, जर तुम्ही असामान्य व्यक्ती नसला किंवा अत्यंत महत्त्वपूर्ण जागेवर नसला तर, तुमचा प्रभाव नगण्य असतो. एक दोन कोट्यांश एवढ्या प्रमाणात तुम्ही इतरांवर राज्य करीत असता हे खरे, परंतु तुमच्या स्वतःवरदेखील तुमचा अधिकार एक दोन कोटयंशइतक्या अल्प प्रमाणातच चालत असल्यामुळे आपल्यावरच हुकमत गाजविली जात आहे ही भावना आपण इतरांवर राज्य करीत आहोत या भावनेपेक्षा

तुमच्या मनात अधिक जागृत असते. तुमच्या मनात सरकार म्हणजे कोणीतरी दूरस्थ व दुष्ट प्रवृत्तीचे 'परके' लोक असतात; 'तुमच्याचसारखीं मते असलेल्या इतर अनेक मतदारांसमवेत तुम्हीच निवडून दिलेले आणि तुमच्याच इच्छा प्रत्यक्षात आणणारे लोक' अशी त्यांच्याविषयी तुमची भावना राहात नाही. अशा परिस्थितीत तुमची राजकारणाविषयीची भावना लोकशाहीत ज्या प्रकारची असावयास हवी तशी असत नाही, तर हुकुमशाहीत ती जशी असेल तशा प्रकारची बहुतांश असते.

आपण एका साहसात भाग घेत आहोत आणि महत्त्वपूर्ण अशी कामगिरी बजावण्याची शक्ती आपल्या अंगी आहे अशी भावना व्यक्तीच्या ठिकाणी परत निर्माण व्हावयाची असेल, तर केवळ संख्येचे दडपण व्यक्तीला चिरडणार नाही इतक्या लहान गटांच्या हाती सत्तेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. बऱ्याच प्रमाणांत केंद्रीय सत्तेचे नियंत्रण असणे आवश्यकच आहे आणि त्याची कारणे ह्या व्याख्यानाच्या सुरवातीसच आपण पाहिलेली आहेत. परंतु अशी केंद्रीय सत्ता जरी आवश्यक असली तरी, तिच्याशी सुसंगत अशा पद्धतीने त्यांच्या कार्यानुसार भौगोलिक, औद्योगिक, सांस्कृतिक अशा विविध प्रकारच्या संस्थांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात स्वायत्तता देणे महत्त्वाचे आहे. ह्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील संस्थांतून कामे करावयास लोकांना आवडेल आणि उत्साही कर्तृत्ववान व्यक्तींना त्या संस्थांवर आपला प्रभाव प्रभाव पाडण्यात समाधान लाभेल इतका अधिकार त्या संस्थांपाशी असला पाहिजे. ज्या उद्दिष्टांसाठी या संस्था निर्माण केलेल्या असतात त्या उद्दिष्टांची पूर्तता योग्य प्रकारे व्हावयाची असेल, तर त्यांना पुरेसे स्वतंत्र आर्थिक पाठबळही बऱ्याच प्रमाणात लागेल. एकादी विचारपूर्वक तयार केलेली योजना, त्या योजनेची जवळपास काहीच

घडवून आणावयाची असेल, तर त्या सुधारणेला तुमच्या पक्षाचा पाठिंबा तुम्हाला आधी मिळवावा लागतो. आणि नंतर तुमच्या पक्षाला पाठिंबा देण्यासाठी मतदारांना प्रवृत्त करावे लागते. अर्थात प्रस्थापित सरकारमार्फत तुम्हाला सरळच परस्पर सुधारणा घडवून आणणे शक्य होईलही, पण ज्या प्रश्नांच्याविषयी जनतेच्या भावना तीव्र असतात, त्यांच्या बाबतीत असे करणे सहसा शक्य होत नाही. सरळ सरकार-वरच दडपण आणणे शक्य नसते. तेव्हा एखादी सुधारणा घडवून आणण्यासाठी इतकी शक्ती आणि वेळ खर्च करावा लागतो, आणि हे प्रयत्न विफल होण्याची शक्यता इतकी मोठी असते, की बरेच लोक आहे तीच स्थिती ठीक म्हणून गप्प राहणे अधिक पसंत करतात. दर पांच वर्षांनी, निवडणुकींच्या वेळी, सुधारणा घडवून आणण्याची आश्वासने देणाऱ्या एखाद्या उमेदवारास आपले मत देणे ही त्यांच्या उपक्रमशीलतेची मर्यादा बनून जाते.

अतिशय सुसंघटित जगामध्ये, अगदी छोटे गट वजा करता, इतर गटांमध्ये व्यक्तिगत उपक्रमशीलता काही थोड्या व्यक्तींपुरतीच मर्यादित ठेवणे क्रमप्राप्त ठरते. उदाहरणार्थ, तुम्ही जर एखाद्या लहानशा समितीचे सभासद असाल तर तुम्हाला त्या समितीच्या निर्णयावर स्वतःचा प्रभाव टाकण्याची आशा बाळगता येते. राष्ट्राच्या राजकारणात तुम्ही दोन कोटी मतदारांतील एक असता, म्हणून तेथे, जर तुम्ही असामान्य व्यक्ती नसला किंवा अत्यंत महत्त्वपूर्ण जागेवर नसला तर, तुमचा प्रभाव नगण्य असतो. एक दोन कोट्यांश एवढ्या प्रमाणात तुम्ही इतरांवर राज्य करीत असता हे खरे, परंतु तुमच्या स्वतःवरदेखील तुमचा अधिकार एक दोन कोटयंशइतक्या अल्प प्रमाणातच चालत असल्यामुळे आपल्यावरच हुकमत गाजविली जात आहे ही भावना आपण इतरांवर राज्य करीत आहोत या भावनेपेक्षा

तुमच्या मनात अधिक जागृत असते. तुमच्या मनात सरकार म्हणजे कोणीतरी दूरस्थ व दुष्ट प्रवृत्तीचे 'परके' लोक असतात; 'तुमच्याचसारखीं मते असलेल्या इतर अनेक मतदारांसमवेत तुम्हीच निवडून दिलेले आणि तुमच्याच इच्छा प्रत्यक्षात आणणारे लोक' अशी त्यांच्याविषयी तुमची भावना राहात नाही. अशा परिस्थितीत तुमची राजकारणाविषयीची भावना लोकशाहीत ज्या प्रकारची असावयास हवी तशी असत नाही, तर हुकुमशाहीत ती जशी असेल तशा प्रकारची बहुतांश असते.

आपण एका साहसात भाग घेत आहोत आणि महत्त्वपूर्ण अशी कामगिरी बजावण्याची शक्ती आपल्या अंगी आहे अशी भावना व्यक्तीच्या ठिकाणी परत निर्माण व्हावयाची असेल, तर केवळ संख्येचे दडपण व्यक्तीला चिरडणार नाही इतक्या लहान गटांच्या हाती सत्तेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. बऱ्याच प्रमाणांत केंद्रीय सत्तेचे नियंत्रण असणे आवश्यकच आहे आणि त्याची कारणे ह्या व्याख्यानाच्या सुरवातीसच आपण पाहिलेली आहेत. परंतु अशी केंद्रीय सत्ता जरी आवश्यक असली तरी, तिच्याशी सुसंगत अशा पद्धतीने त्यांच्या कार्यानुसार भौगोलिक, औद्योगिक, सांस्कृतिक अशा विविध प्रकारच्या संस्थांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात स्वायत्तता देणे महत्त्वाचे आहे. ह्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील संस्थांतून कामे करावयास लोकांना आवडेल आणि उत्साही कर्तृत्ववान व्यक्तींना त्या संस्थांवर आपला प्रभाव प्रभाव पाडण्यात समाधान लाभेल इतका अधिकार त्या संस्थांपाशी असला पाहिजे. ज्या उद्दिष्टांसाठी या संस्था निर्माण केलेल्या असतात त्या उद्दिष्टांची पूर्तता योग्य प्रकारे व्हावयाची असेल, तर त्यांना पुरेसे स्वतंत्र आर्थिक पाठबळही बऱ्याच प्रमाणात लागेल. एकादी विचारपूर्वक तयार केलेली योजना, त्या योजनेची जवळपास काहीच

माहिती नसलेल्या व त्या योजनेच्या उद्दिष्टांविषयी जिव्हाळा नसलेल्या केंद्रीय सत्तेकडून झिडकारली जाणे इतकी या उत्साहात बिब्बा घालणारी व उपक्रमशीलतेला मारून टाकणारी गोष्ट दुसरी कोणती नाही. असे असूनही केंद्रीय नियंत्रणाच्या आपल्या पद्धतीत ब्रिटनमध्ये ही घटना नित्य घडत असते. आपल्यातील कुशाग्र बुद्धीच्या लोकांच्या बुद्धीला गंज चढू द्यावयाचा नसेल, तर अधिक लवचिक व कमी साचेबंद व्यवस्था अस्तित्वात येणे अत्यंत जरुरीचे आहे. ज्या त्या कामाशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या हाती त्या कामाबाबतची अधिकात अधिक शक्य आहे तेवढी सत्ता असावी हे कोणत्याही चौरस, परिपूर्ण शासन-व्यवस्थेचे गाभ्याचे वैशिष्ट्य असले पाहिजे.

वेगवेगळ्या संस्थांच्या हातांतील सत्तेची व्याप्ती निश्चित करण्याच्या कामात अर्थात अनेक अडचणी आहेत. वरिष्ठ पातळीवरील संस्थांना त्यांची उद्दिष्टे पूर्ण करण्यात ज्यामुळे प्रतिबंध होणार नाही अशी सर्व कार्ये व ती कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार खालच्या पातळीवरील लहान संस्थांना द्यावेत हे एक सामान्य तत्त्व म्हणून सांगता येईल. उदाहरणार्थ, आपण जर प्रादेशिक तत्त्वावर संघटित संस्थांचा विचार केला, तर जागतिक मध्यवर्ती सरकारपासून ते तहत ग्रामपंचायतींपर्यंत संस्थांची एक श्रेणी असावी. जागतिक शासनसंस्थेचे कार्य युद्धास प्रतिबंध करणे हे आहे म्हणून त्या कामासाठी आवश्यक तेवढीच मर्यादित सत्ता तिच्या हाती असली पाहिजे. सैन्य बाळगण्याचे सर्वाधिकार, राष्ट्राराष्ट्रांतील तहांना संमती देण्याचा व त्यांत सुधारणा करण्याचा अधिकार, व राष्ट्रांराष्ट्रांतील भांडणांचा निवाडा करण्याचा अधिकार यांचा जागतिक शासनसंस्थेच्या हातच्या सत्तेत समावेश होईल. परंतु जागतिक शासनसंस्थेने राष्ट्रांतील अंतर्गत प्रश्नांत ढवळा-ढवळ करू नये. फक्त प्रत्येक राष्ट्र आपण केलेल्या तहांचे व्यवस्थित

पालन करीत आहे किंवा नाही हे पाहाण्याइतकाच हस्तक्षेपाचा अधिकार मर्यादित असावा. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सरकारने शक्य तितकी कार्ये राज्यसरकारकडे सोपवावी. आणि त्यांनी त्याच क्रमाने जिल्हा-परिषदा, तालुका-पंचायती व ग्रामपंचायती यांजकडे जास्तीत जास्त कार्ये सोपवावीत. अशा विकेंद्रीकरणामुळे काही काळ काही कामांची कार्यक्षमता कमी होईल अशी शक्यता आहे. परंतु जर खालच्या पातळीवरील संस्थांच्यावर पुरेशी महत्त्वाची कार्ये सोपविली तर त्या संस्थांत कामे करण्यास कर्तृत्ववान व्यक्तींना रस वाटेल, समाधान मिळेल व काही काळ जी कार्यक्षमतेची हानी सहन करावी लागली तिची लवकरच सवाईने भरपाई होईल.

सध्याच्या काळात स्थानिक स्वराज्यसंस्था म्हणजे फक्त सुखवस्तु आणि निवृत्त झालेल्या लोकांनी एक छंद म्हणून काम करावयाच्या जागा आहेत असे मानले जाते. कारण सामान्यपणे या लोकांनाच फक्त या संस्थांतून काम करावयास वेळ सापडतो. स्थानिक स्वराज्य-संस्थांमध्ये काम करणे शक्य नसल्याने आज आपल्या स्थानिक समाजाच्या व्यवहारांमध्ये फारच थोडे कर्तृत्ववान तरुण आणि तरुणी लक्ष घालतात. ह्यात जर सुधारणा हवी असेल, तर स्थानिक स्वराज्य-संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना पगार मिळाला पाहिजे. आमदार-खासदारांना पगार देण्यामागे जी कारणे आहेत तीच कारणे येथेही लागू होतात.

प्रादेशिक, सांस्कृतिक किंवा तत्त्वप्रणालीवर आधारित अशी कुठल्याही प्रकारची संघटना असू दे, त्या संघटनेला दोन प्रकारचे संबंध राखावे लागतात. एक त्या संघटनेतील सभासदांशी आणि दुसरे बाह्य जगाशी. एखाद्या संस्थेचे त्या संस्थेतील सभासदांशी कशा प्रकारचे संबंध असावेत ही गोष्ट सभासदांच्या आपखुषीने केलेल्या निर्णयावर सोपवावी. त्यात कायद्याचे उल्लंघन होत नसले म्हणजे झाले. अर्थात

एखाद्या संस्थेचे सभासदांशी संबंध कसे असावेत हे जरी सभासदांनी ठरवावयाचे असले तरीही, जर खरीखुरी लोकशाही अस्तित्वात यावयाची असेल तर, सभासदांनी काही तत्त्वे लक्षात ठेवली पाहिजेत. हे विशद करण्यासाठी आपण एक मोठ्या उद्योगधंद्याचे उदाहरण घेऊ. समाजवादी जेव्हा भांडवलशाहीवर टीका करतात, तेव्हा त्यांची टीका बहुतांशी उत्पन्नाच्या वाटपाच्या प्रश्नाशी निगडित असते. सत्तेच्या वाटपाचा प्रश्न ते बहुधा विचारातच घेत नाहीत. जेव्हा एखाद्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण होते, तेव्हा, पूर्वी खाजगी भांडवलशाहीत जेवढ्या प्रमाणात सत्तेची विषम वाटणी होती त्याच प्रमाणात सत्तेची विषम वाटणी चालूच राहील अशी शक्यता असते. फरक फक्त एवढाच की पूर्वी खाजगी भांडवलदार सत्ताधीश होते. आता सरकारी अधिकारी सत्ताधीश असतात. कुठल्याही मोठ्या उद्योगधंद्यात सर्वसाधारण मजुरापेक्षा अधिक सत्ता हाती असणारे प्रशासक असणे आवश्यकच असते, परंतु सत्तेतील ही विषमता अगदी अत्यावश्यक तेवढीच असावी आणि सभासदांना आपली उपक्रमशीलता जास्तीत जास्त दाखविण्याची संधी मिळावी, या गोष्टी फार इष्ट आहेत. ह्या बाबतीत श्री. जॉन स्पेडन ल्युईस यांचे 'पार्टनरशिप फॉर ऑल—ए थर्टिफोर इयर ओल्ड एक्सपेरिमेंट इन इंडस्ट्रियल डेमॉक्रसी' हे पुस्तक लक्ष वेधून घेणारे आहे. सार्वजनिक हितावरील निष्ठा व धाडसी प्रयोगशीलता यांची सांगड ज्याच्या ठिकाणी झालेली आहे अशा एका व्यक्तीने केलेल्या एका सुदीर्घ व व्यापक प्रयोगावर हे पुस्तक आधारलेले असल्यामुळे ते विशेष महत्त्वाचे आहे. आर्थिक बाजूकडे या गृहस्थांनी आपल्या उद्योगधंद्यातील सर्व कामगारांना आपले भागीदार करून घेतले असून नफ्यात ते सर्व वाटेकरी आहेत. याच्या जोडीला ह्या धंद्यातील सर्वप्रकारचे व्यवस्थापन

आपण सर्व मिळून करतो ही भावना सर्व कामगारांच्या मनांत रुजेल अशी प्रयत्नपूर्वक योजना केली आहे. अर्थात औद्योगिक क्षेत्रात ज्या प्रमाणात लोकशाही प्रत्यक्षात यावयास हवी आहे तितकी आपण त्यांच्या पद्धतीने मूर्त करू शकू की नाही याविषयी मी साशंक आहे. त्या त्या कामाची सर्वांत अधिक कुवत असणाऱ्या लोकांना महत्त्वाच्या जागा देण्याचे त्यांनी आपले स्वतःचे असे एक तंत्रही बसवलेले आहे. परंतु सर्वांना सारखाच पगार देण्याच्या विरुद्ध त्यांचे मत आहे. आणि त्यांनी दिलेली कारणे लक्षात घेण्यासारखी आहेत. अधिक अवघड कामासाठी अधिक पगार देणे योग्यच आहे. हे कारण ते देतातच, पण अधिक चांगला पगार दिला म्हणजे माणसे अधिक चांगले काम करतात, या कारणासाठीही अधिक चांगला पगार देणे इष्ट आहे असे ते म्हणतात. ते लिहितात, "काम करण्याची कुवत व काम करण्याची इच्छा या गोष्टी गणितातील 'स्थिरांका'प्रमाणे 'स्थिर' स्वरूपाच्या असतात, आणि फरक केवळ या स्थिर गुणांच्या मोबदल्यात मिळणाऱ्या वेतनात होत असतो, ही समजूत चुकीची आहे. आपल्या कुवतीनुसार अगदी उत्तम प्रकारे काम करण्याची तुमची संकल्पशक्तीच केवळ नव्हे, तर तसे प्रत्यक्षात करण्याची तुमची कुवतही, तुम्हाला काय पगार मिळतो यावर पुष्कळशी अवलंबून असते. कुवत जास्त म्हणून पगार जास्त याबरोबरच पगार जास्त म्हणून कुवत जास्त ही गोष्टही तेवढीच खरी आहे."

वरील तत्त्व श्री० ल्युईस ज्या प्रमाणात लागू करतात, त्यापेक्षाही अधिक मोठ्या प्रमाणात लागू होण्यासारखे आहे. ते फक्त पगाराच्या बाबतीतच लागू नाही तर प्रतिष्ठा व दर्जा या बाबतीतही लागू पडते. माझ्या मते, वस्तुतः पगारवाढीचे महत्त्व मुख्यतः अशासाठी की त्या बरोबरच समाजातला दर्जाही वाढतो. दुसऱ्या एखाद्या क्षेत्रात

पगारवाढीने माणसाला काम करायला जादा उत्साह वाटेल तर वैज्ञानिक संशोधकाला त्याचे संशोधन महत्त्वपूर्ण आहे अशी सार्वत्रिक मान्यता मिळाल्यास तेवढ्याने त्याचा उत्साह द्विगुणित होईल. पगारवाढीमुळे एखाद्या माणसाला काम करण्यास जसा हुरूप येतो, तशा प्रकारचा हुरूप या संशोधकास त्याला मिळणाऱ्या मानामुळे येतो. आशेला नेहमीच पालवी फुटलेली असावी आणि उत्साह ओसंडून वहात असावा ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. दोन महायुद्धांच्या तडाख्यामुळे युरोपमध्ये नेमक्या या गोष्टी आज दुर्मिळ झाल्या आहेत. पूर्वींच्या अनिर्बंध अर्थव्यवस्थेतील स्वैर स्वातंत्र्याची आज कुणी तरफदारी करणार नाही, परंतु तरीही उपक्रमशीलतेचे स्वातंत्र्य कायम राखणे व कर्तृत्ववान माणसाच्या कर्तृत्वाला वाव मिळणे हे अत्यंत महत्त्वाचे आणि फार जरुरीचे आहे.

मोठ्या संघटनांतून ज्या गोष्टी असणे इष्ट आहे त्यांपैकी ही फक्त एक झाली. दुसरी महत्त्वाची बाजू अशी की संघटनेवर नियंत्रण असलेल्या लोकांची इतरांवर सर्वंकष सत्ता असता कामा नये. आधी कित्येक शतके राजेलोकांच्या सत्तेविरुद्ध सुधारक झगडले आणि त्यानंतर भांडवलदारांच्या सत्तेविरुद्ध त्यांनी झगडा केला. पण उद्या भांडवलदारांची सत्ता नाहीशी होऊन त्या जागी जर सरकारी अधिकाऱ्यांची सत्ता स्थापन झाली तर सुधारकांनी ह्या दुसऱ्या झगड्यात मिळवलेली जयश्री विफल ठरेल. अर्थातच यात काही व्यवहारिक अडचणी आहेत हे मला मान्य आहे. कारण लोकशाहीच्या कासवाच्या गतीने होणाऱ्या निर्णयाकरता वाट न पाहाता अधिकाऱ्यांना अनेकदा काही तात्काळ निर्णय घ्यावे लागतात. परंतु दोन गोष्टी सांभाळल्या पाहिजेत. एक म्हणजे, सर्वसाधारण धोरणे व तत्त्वे लोकशाही पद्धतीने ठरवली पाहिजेत, आणि दुसरे म्हणजे शिक्षेची भीती न

बाळगता निर्भयपणे अधिकाऱ्यांच्या वर्तनावर टीका करण्याची शक्यता असली पाहिजे. कर्तृत्ववान व्यक्तींना सत्ता हवीशी वाटणे ही एक स्वाभाविक गोष्ट असल्यामुळे बऱ्याच अधिकाऱ्यांना सत्तेची वाजवीपेक्षा जास्त अभिलाषा असेल असे धरून चालावयास हरकत नाही; यामुळे राजकीय क्षेत्रातल्याप्रमाणेच प्रत्येक मोठ्या संघटनेत लोकशाहीच्या रक्षणासाठी तीच अखंड जागरूकता बाळगणे जरुरीचे आहे.

एखाद्या संघटनेचे बाहेरील जगाशी संबंध कसे असावेत हा प्रश्न वेगळ्या स्वरूपाचा आहे. ते संबंध फक्त सत्तेच्या जोरावर ठरवले जाता कामा नयेत—म्हणजेच ती संघटना इतर संघटनांपेक्षा किती प्रमाणात बलशाली आहे यावर ठरवले जाता कामा नयेत. उभयतांच्या संमतीने जिथे हे संबंध निश्चित करण्यात अपयश येईल तिथे ते तिसऱ्याच एखाद्या तटस्थ अधिकारमंडळाकडे निर्णयासाठी सोपविले गेले:पाहिजेत. ह्या तत्त्वाला अखिल जागतिक संघटनेच्या पातळीपर्यंत कुठल्याही संघटनेचा अपवाद केला जाता कामा नये. अखिल जगाच्या बाबतीत सध्या तरी बाह्य संबंधाचा प्रश्न येत नाही. एच० जी० वेल्सनी रंगविलेल्या कल्पनाचित्राप्रमाणे ग्रहाग्रहात जर युद्ध सुरू झाले तर मात्र आपल्याला एखाद्या आंतर-ग्रह मंडळाची गरज भासेल.

जोपर्यंत राष्ट्राराष्ट्रातील निराळेपणा शत्रुत्वास कारणीभूत होत नाही तोपर्यंत त्यांचे खंडन करण्याचे कारण नाही. परक्या देशात काही काळ राहण्याचा प्रसंग आला म्हणजे आपल्या देशाचे दोष आपल्या लक्षात येऊ लागतात, आणि ही गोष्ट सर्व देशांच्या बाबतीत खरी आहे. एकाच देशातील वेगवेगळ्या भागातील निराळेपणाच्या बाबतीतही हे खरे ठरते, त्याचप्रमाणे निरनिराळ्या धंद्यांत काम करणाऱ्या माणसांत जी वेगळी वैशिष्ट्ये जाणवतात, त्यांच्याहीविषयी ही गोष्ट खरी आहे. सर्व माणसांचे व्यक्तिमत्त्व एका छापाचे असावे

आणि सर्व संस्कृती एकाच छापाच्या असाव्यात या गोष्टी स्वागतार्ह नाहीत. जीवशास्त्रीय उत्क्रांती व्यक्तीव्यक्तीतील व टोळीटोळीतील जन्मजात वेगळेपणाच्या आधारानेच होत आलेली आहे आणि सांस्कृतिक उत्क्रांतीही वेगवेगळ्या समाजांनी आपल्या अंगी बाणवलेल्या वेगळेपणावर अवलंबून आहे. असा वेगळेपणा जर नाहीसा झाला, तर निवडीला वावच राहणार नाही. आधुनिक जगात भिन्नभिन्न प्रदेशातील संस्कृतींचे वेगळेपण नाहीसे होऊन सर्वत्र सरसकट एकसारखी संस्कृती निर्माण होण्याचा मोठा धोका उत्पन्न झाला आहे. विभिन्न गटांना अधिक स्वायत्तता देणे हा वरील धोका कमी करण्याचा सर्वात उत्तम मार्ग होय.

माझे येथवरचे विवेचन बरोबर असेल तर अनुशासन आणि स्वयंनिर्णयात्मक उपक्रमशीलता यांच्या कार्यक्षेत्रांची विभागणी कोणत्या सर्वसामान्य तत्त्वावर व्हावी ते, मनुष्यस्वभाव ज्या वेगवेगळ्या प्रेरणांचा बनलेला आहे त्या प्रेरणांच्या अनुषंगाने, स्थूलमानाने सांगता येईल. एका बाजूला आपल्या मालकीचे जे काही आहे ते सांभाळावे आणि (पुष्कळदा) दुसऱ्यांचे जे काही असेल, तेही आपण मिळवावे अशा प्रेरणा आपल्या ठिकाणी असतात. दुसरीकडे आपल्यात काही सर्जनशील प्रेरणा असतात. जे आपण दुसऱ्या कोणाकडूनही घेतलेले नाही असे आपले स्वतःचे काहीतरी जगाला द्यावे असे आपल्याला वाटत असते. ही प्रेरणा अगदी साध्या साध्या स्वरूपातही प्रगट होऊ शकते. घराभोवती केलेली सुंदर बाग ही एक अशी गोष्ट आहे. किंवा हीच प्रेरणा मानवी कर्तृत्वाचा कळसही गाठील. शेक्सपिअरची नाटके व न्यूटनचे शोध ही अशी उदाहरणे आहेत. सर्वसाधारणतः स्वामित्वाच्या प्रेरणेचे नियमन व कायदेकानूंद्वारा तिचे नियंत्रण ही दोन कार्ये शासनसंस्थेच्या **मूलभूत आवश्यक** कार्यांत मोडतात. याउलट सर्जनशील

प्रेरणांना सरकारने जरी प्रोत्साहन दिले, तरी त्यांचे मुख्य सामर्थ्य व्यक्ती किंवा गट यांना दिलेल्या स्वायत्ततेतून निर्माण व्हावे.

भौतिक धनावर मालकीहक्क सांगता येतो, परंतु वैचारिक धनावर तसा हक्क सांगता येणे कठीण असते. एखादी खाद्यवस्तू खाणारा माणूस इतर सर्वांना त्या वस्तूपासून वंचित करीत असतो, पण एखादी कविता लिहिणारा किंवा तिचे रसग्रहण करणारा माणूस तितकीच चांगली किंवा त्याहूनही चांगली कविता लिहिण्यापासून किंवा तिचे रसग्रहण करण्यापासून दुसऱ्याला वंचित करीत नाही. म्हणूनच भौतिक धनाबाबत न्यायाची आवश्यकता असते, परंतु वैचारिक धनाबाबत योग्य संधी असणे आणि नवनिर्मितीला अनुकूल अशी परिस्थिती अस्तित्वात असणे या गोष्टींची आवश्यकता असते. सर्जनशील व्यक्तींना कलाकृतीच्या निर्मितीसाठी भौतिक धनाच्या प्राप्तीच्या अपेक्षेतून प्रेरणा मिळत नसते. कवी किंवा शास्त्रज्ञ मोठे धनवान झाले आहेत असे सहसा आढळत नाही, किंवा धनवान होण्याची त्यांची इच्छा होती असेही दिसत नाही. सॉक्रेटिसाला शासनसंस्थेने देहांताची शिक्षा दिली, परंतु तो अखेरच्या क्षणापर्यंत संपूर्णपणे शांतचित्त राहू शकला, कारण आपले कार्य आपण केले याचे समाधान त्याला होते. त्याच्यावर जर सन्मानाचा वर्षाव केला असता, परंतु त्याचे कार्य त्याला करू दिले नसते, तर त्याला मृत्यूपेक्षाही ती शिक्षा अधिक कठोर वाटली असती. एकतंत्री शासनसंस्थेत शासनाच्या हातात विचारप्रचाराची सर्व साधने एकवटलेली असतात. तिथे प्रतिभाशाली माणसालाही मृत्यूहून कठोर शिक्षा भोगावयास लागेल अशी फार मोठी शक्यता आहे. त्याला कायद्याने शिक्षा होईल वा न होईल, परंतु स्वतःच्या कल्पना प्रसृत करणे मात्र त्याला अशक्य होते. एखाद्या समाजात जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होते,

तेव्हा मानवजातीच्या सामूहिक विकासात तो समाज काहीही मौल्यवान सहभाग देऊ शकत नाही.

लोभी आणि सर्वभक्षक प्रेरणांवर नियंत्रण असणे अत्यंत जरुरीचे आहे. या कारणास्तव राष्ट्रीय शासनसंस्था, किंबहुना सर्व जगाची एक शासनसंस्था, मानवजात जिवंत राहण्यासाठी आवश्यक आहे. परंतु मृत्यूपेक्षा जीवन बरे एवढ्यावरच आपण समाधान मानू शकत नाही. आपल्याला सुखी, पुरुषार्थी आणि सर्जनशील जीवन हवे आहे. अशा प्रकारच्या जीवनासाठी आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिती काही प्रमाणात शासनसंस्था निर्माण करू शकेल. परंतु यासाठी सुरक्षितता साध्य करण्याच्या प्रयत्नांत आपण जीवनात रस ओतणाऱ्या आणि त्याचे मूल्य वाढविणाऱ्या काही मुक्त प्रेरणा दडपून टाकीत नाही याची दक्षता शासनसंस्थेने घेतली पाहिजे. व्यक्तिगत खाजगी जीवनाला त्याची योग्य ती जागा दिली पाहिजे आणि अतिप्रचंड संघटनांच्या नियंत्रणाखाली ते संपूर्णपणे दडपून जाता कामा नये. आधुनिक उत्पादनतंत्रांमुळे निर्माण झालेल्या नव्या जगात ह्या धोक्यापासून व्यक्तिगत जीवनाचे संरक्षण करणे फार जरुरीचे आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ४४०१२ दि: ...
... १८२६ ... नोंद दि: ...

व्याख्यान सहावे

# व्यक्तिगत व सामाजिक नीतिमत्ता

ह्या शेवटच्या व्याख्यानात मी दोन गोष्टी करणार आहे. आधीच्या सर्व व्याख्यानांतील निष्कर्षाचा थोडक्यात सारांश घेणे ही पहिली गोष्ट. व्यक्तिगत जीवनातील नीतिमूल्यांचा राजकीय व आर्थिक तत्त्वांशी योग्य संबंध दिग्दर्शित करणे ही दुसरी गोष्ट मी करणार आहे. तसेच सामाजिक जीवनातील ज्या अनिष्ट गोष्टी व संभाव्य धोके यांचा आपण आतापर्यंत विचार केला त्या लक्षात घेऊनही नजिकच्या भविष्यकाळात मानवजातीला अधिक चांगल्या जीवनाची आशा करावयास आतापर्यंत आपण घेतलेल्या आढाव्यावरून पुष्कळ जागा आहे हे मी दाखवून देईन. आणि शांत चित्ताने शक्याशक्यतेचा विचार केल्यानंतर ही आशा सार्थ आहे असे निदान मला तरी वाटते.

प्रथम आपण मागे केलेल्या विचारांची उजळणी करू. सर्वसाधारणतः सामाजिक व्यवहारांच्या पाठीमागे दोन महत्त्वाचे हेतू असतात. एका बाजूला सुरक्षितता आणि न्याय या हेतूंसाठी मध्यवर्ती

शासकीय नियंत्रणाची गरज असते. हे नियंत्रण जर परिणामकारक व्हावयाचे असेल, तर त्याचे अंतिम टोक अखिल जगाची एक शासनसंस्था निर्माण करण्यापर्यंत जाऊन पोहोचते. याउलट मानव-जातीची प्रगती व्हावयास पाहिजे असेल, तर सुव्यवस्थेच्या आड न येता जास्तीत जास्त शक्य तितका वाव वैयक्तिक उपक्रमशीलतेला द्यावा लागतो.

ही दोन्ही ध्येये अधिकाधिक प्रमाणात प्रत्यक्षात उतरविण्याचा विकेंद्रीकरण हा मार्ग आहे. युद्धांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक तेवढीच सत्ता फक्त जागतिक सरकारच्या हातात असली पाहिजे. बाकी राष्ट्रीय शासनसंस्थांच्या व्यवहारात जागतिक सरकारने हस्तक्षेप करता कामा नये. त्याचप्रमाणे राष्ट्रीय शासनसंस्थांनी स्थनिक स्वराज्य संस्थांना जास्तीत जास्त वाव दिला पाहिजे. औद्योगिक क्षेत्रात राष्ट्रीयीकरण झाले म्हणजे सर्व प्रश्न सोडविले गेले असे समजले जाता कामा नये. रेल्वेसारख्या प्रचंड उद्योगधंद्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्वायत्तता दिली पाहिजे. पूर्वीच्या खासगी उद्योगधंद्यातील मजूर-मालक संबंधांचीच पुनरावृत्ती राष्ट्रीयीकरण झालेल्या उद्योगधंद्यांत मजूर व सरकार यांच्यातील संबंधांच्या बाबतीत होता कामा नये. व्यक्तीची मते बनविणाऱ्या सर्व गोष्टीत—वृत्तपत्रे, पुस्तके, राजकीय प्रचार, वगैरेमध्ये खरीखुरी मोकळी स्पर्धा असली पाहिजे. त्यांच्यावर सरकारी नियंत्रण असता कामा नये. तसेच त्यांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची कुणाचीही मक्तेदारी असता कामा नये. परंतु सर्व स्पर्धा सांस्कृतिक व बौद्धिक पातळीवर चालली पाहिजे. प्रतिपक्षावर मात करण्यासाठी आर्थिक नाकेबंदीचा वापर निषिद्ध असावा आणि लढाई किंवा गुन्हेगारी या मार्गांचा वापर तर नसावाच नसावा.

सांस्कृतिक बाबतीत विविधता प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. विद्यापीठे, विद्वत्सभा अशांसारख्या, शासनसंस्थेपासून बऱ्याच प्रमाणात स्वतंत्र असलेल्या संस्थांना या संदर्भात फार महत्त्वाचे स्थान आहे. आजच्या रशियात या दृष्टीने मोठी दुःखद परिस्थिती आहे. तेथे शास्त्रीय ज्ञानाची ज्यांना तोंडओळखही नाही अशा राजकारणी पुरुषांपुढे, केवळ त्यांच्या हातात आर्थिक व लष्करी सत्ता आहे म्हणून, त्यांच्या मूर्खपणाच्या निर्णयांपुढे मोठमोठ्या शास्त्रज्ञांना मान तुकवावी लागते. राजकारणी लोकांचे कार्यक्षेत्र, ज्या क्षेत्रात त्यांची पात्रता मान्य करता येईल त्या क्षेत्रापुरतेच मर्यादित ठेवूनच या करुणास्पद प्रकारांना आळा घालता येईल. उत्तम संगीत कुठले, खरे जीवशास्त्र कुठले, आदर्श तत्त्वज्ञान कुठले, याचा निर्णय देण्याचे धार्ष्ट्य त्यांनी करू नये. या देशात अशा गोष्टीत कोणत्याही पंतप्रधानाने आपल्या व्यक्तिगत आवडीनिवडीप्रमाणे निर्णय द्यावा ही गोष्ट मला कबूल नाही. मग हा पंतप्रधान कोणत्याही काळातील असो, किंवा व्यक्तिशः त्याची अभिरुची सुदैवाने कितीही अचूक असो.

सामाजिक व राजकीय संस्थांचा विचार बाजूला ठेवून मी व्यक्तिगत नीती या प्रश्नाकडे आता वळतो. कुठलाही माणूस पूर्णपणे स्वतंत्र नसतो आणि कुठलाही माणूस संपूर्णतया गुलाम नसतो. माणसाला जेवढे स्वातंत्र्य असते त्या स्वातंत्र्याच्या कक्षेतील त्याच्या वर्तणुकीचे नियमन करण्यासाठी वैयक्तिक नीतिप्रणालीची त्याला आवश्यकता असते. काही जणांच्या मते माणसाने आपल्या समाजाचे शिष्टमान्य नीतिनियम पाळले म्हणजे झाले, परंतु मानववंशशास्त्राच्या कुठल्याही विद्यार्थ्याचे या विचारसरणीने समाधान होईल असे मला वाटत नाही. नरभक्षण, नरबळी व माणसाची शिकार यांसारख्या चालीरीती शेवटी नष्ट झाल्या, त्या पूर्वापार चालत आलेल्या पारंपरिक

नीतिविचारांना नैतिक पातळीवरून सतत विरोध केला गेल्यामुळेच. एखाद्या माणसाला जर आपल्या शक्तिबुद्धीनुसार श्रेष्ठतम जीवन जगावयाची मनापासून इच्छा असेल तर त्याच्या जमातीच्या चालीरीती व श्रद्धा स्वतःपुरत्या पारखून घ्यावयास शिकले पाहिजे.

समाजाला जी गोष्ट योग्य वाटते ती गोष्ट आपल्या सदसद्विवेकबुद्धीला पटत नाही म्हणून एखादी व्यक्ती झुगारून देते. अशा बाबतीत रीतिरिवाजाचा प्रामाण्याधिकार व कायद्याचा प्रामाण्याधिकार यांच्यांत आपणास भेद करावा लागतो. ज्या कारणांसाठी पारंपरिक नीतिनियमांच्या उल्लंघनाचे समर्थन होऊ शकते त्यापेक्षा कितीतरी अधिक जोरदार व सबळ कारणांची जरुरी कायद्याचे बंधन झुगारून देण्यासाठी असते. याचे कारण असे की अगदी किमान सामाजिक सुव्यवस्था नांदण्यासाठी देखील कायद्याचा योग्य आदर राखणे अत्यावश्यक आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला एखादा कायदा चुकीचा आहे असे वाटते, तेव्हा तो बदलून घेण्याचा प्रयत्न करणे हा त्याचा अधिकार आहे आणि प्रसंगी ते त्याचे कर्तव्य ठरेल. परंतु काही क्वचित दुर्मिळ प्रसंगीच कायद्याचा भंग करणे उचित ठरते. मी हे नाकबूल करीत नाही की काही प्रसंगी कायदेभंग करणे हेच माणसाचे कर्तव्य होऊन बसते. एखाद्या कायद्याचे पालन करणे पाप होईल, असे जेव्हा एखाद्याला मनापासून वाटते, तेव्हा तो कायदा मोडणे हे त्याचे कर्तव्यच ठरते. युद्धाला नैतिक भूमिकेवरून विरोध करणाऱ्या व्यक्तीची गोष्ट अशीच असते. त्या व्यक्तीचे म्हणणे चूक आहे अशी तुमची खात्री असली, तरी त्याची सदसद्विवेकबुद्धी त्याला सांगते त्याप्रमाणे त्याने वागू नये असे तुम्हाला म्हणता येणार नाही. कायदे करणारे लोक शहाणे असले म्हणजे 'कायद्याच्या दृष्टीने गुन्हा करावयाचा की स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला जे पाप वाटते ते पाप करावयाचे' अशी निवड

निष्ठावंत माणसाला करण्याची पाळी येऊ नये, अशी काळजी कायदे करताना ते लोक घेतील.

ज्या प्रसंगी क्रांती करणे हेच समर्थनीय ठरेल, अशीही परिस्थिती असू शकते, ही गोष्ट मान्य केली पाहिजे असे मला वाटते. काही काही वेळा कायद्याने प्रस्थापित झालेले सरकार इतके वाईट असते की अराजकाचा धोका पत्करूनही त्या सरकारला उलथून टाकण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरते. अराजकाचा धोका मात्र अगदी खरा आहे. इंग्लंडमधील १६८८ ची राज्यक्रांती आणि अमेरिकेतील १७७६ चे स्वातंत्र्ययुद्ध या दोन सर्वांत यशस्वी राज्यक्रांत्या, कायद्यावर नितांत श्रद्धा असलेल्या व्यक्तींनीच पुढाकार घेऊन घडवून आणल्या ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ज्या ठिकाणी क्रांतिकारकांच्या ठिकाणी कायद्याविषयी असा आदर नसतो, तिथे क्रांतीनंतर अराजक तरी माजते, नाहीतर हुकुमशाही तरी अवतरते. म्हणूनच कायद्याचे पालन हे जरी निरपवाद तत्त्व होऊ शकले नाही, तरी कायद्याच्या पालनास फार महत्त्व दिले पाहिजे. काही विशेष प्रसंगी पूर्ण विचारांतीच फक्त या तत्त्वास अपवाद करता येईल.

अशा प्रकारच्या प्रश्नांमुळे नीतिशास्त्रातील मूलभूत द्वंद्वाकडे आपले लक्ष जाते. हे द्वंद्व मनाला बुचकळ्यात टाकणारे असले, तरी त्याचा विचार टाळता येणार नाही.

आजपर्यंतच्या ज्ञात इतिहासात, नीतिकल्पनांची दोन उगमस्थाने सापडतात. एक उगमस्थान राजकीय आहे, तर दुसरे उगमस्थान प्रत्येक व्यक्तींच्या धार्मिक आणि नैतिक निष्ठेत सापडते. बायबलच्या जुन्या करारामध्ये या दोन्ही निरनिराळ्या उगमस्थानांपासून निघालेल्या नीतिकल्पना स्पष्टपणे वेगवेगळ्या मांडलेल्या आढळतात. 'लॉ' या शीर्षकाखाली एक ग्रथित केलेल्या आहेत तर 'प्रॉफेट्स' या

शीर्षकाखाली दुसऱ्या ग्रथित केलेल्या आहेत. मध्ययुगीन कालातही चर्चच्या धर्मगुरूंनी घालून दिलेली अधिकृत 'नीती' आणि मोठमोठ्या साधकांच्या वागणुकीतली आणि शिकवणुकीतली व्यक्तिगत नीती ह्या दोन्ही अशाच वेगळ्या होत्या. अशा प्रकारची नीतीची 'व्यक्तिगत' व 'सामाजिक' अशी विभागणी अजूनही दिसून येते. आणि कुठल्याही सर्वांगीण नीतिशास्त्रीय सिद्धांताला ही विभागणी विचारात घ्यावी लागेल. सामाजिक नीतिबंधने नसतील तर समाज रसातळाला जाईल. व्यक्तिगत नीती नसेल तर समाज जिवंत राहण्यात मौलिक असे काहीच असणार नाही. म्हणून सामाजिक आणि व्यक्तिगत अशा प्रकारच्या नीतीची चांगल्या जगाच्या निर्मितीसाठी गरज आहे.

आपल्या शेजाऱ्यांविषयीचे आपले कर्तव्य जरी आपण कितीही अचूकपणे हेरले तरी नीतीचा प्रश्न फक्त 'शेजाऱ्याशी मी कसे वागावे' या प्रश्नाच्या उत्तराने पुरा होत नाही. आदर्श जीवनात सामाजिक कर्तव्यपूर्तीच्याही पलीकडे काही आहे; पुरुषोत्तम होण्याची वैयक्तिक साधनाही प्रत्येकाला करावयाची असते. कारण मनुष्य जरी काही प्रमाणात समाज करून राहणारा प्राणी असला, तरी तो पूर्णपणे तसा नाही. त्याच्या मनात काही विचार, भावना आणि प्रेरणा असे येतात की ज्या कधी शहाणपणाच्या असतात, तर कधी मूर्खपणाच्या असतात, कधी उदात्त असतात, तर कधी नीच असतात. कधी त्याचे विचार प्रेममूलक असतात, तर कधी द्वेषमूलक असतात. आणि यांतील जे चांगले विचार, भावना व प्रेरणा असतील त्यांना योग्य तो वाव मिळाला तरच त्याचे जीवन समाधानी होईल. एकाकी जीवनात रमणारे लोक फारच थोडे असतात ही गोष्ट खरी आहे; परंतु जो समाज व्यक्तीला सामाजिक जीवनापलीकडच्या वैयक्तिक

जीवनाचे स्वातंत्र्य ठेवत नाही अशा समाजात सुखी होणारे लोक त्याहूनही थोडे असतात.

दुसऱ्याशी योग्य प्रकारे वागणे हे जरी पुरुषोत्तमाच्या जीवनाचे एक अंग असले, तरी त्याला दुसरेही अंग आहे. लहानसहान हौसेमौजेसाठी तुम्ही जर तुमच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केलेत, तर तुमची सदसद्विवेकबुद्धी तुम्हाला टोचत राहील. परंतु जर तुम्ही उत्कृष्ट संगीत ऐकण्यात, किंवा एखादा सुंदर सूर्यास्त पाहाण्यात तुमचा काही वेळ खर्च केलात, तर परत जेव्हा तुमच्या कामाकडे तुम्ही वळाल, तेव्हा आपण व्यर्थ वेळ दवडला अशी भावना तुमच्या मनात उद्भवणार नाही, व वेळ घालविल्याबद्दल तुम्हाला शरम वाटणार नाही. पुरुषोत्तमाची आपली आदर्श कल्पना सामाजिक व राजकीय कर्तव्याच्या विचारांनी फाजील प्रभावित होऊ देणे धोक्याचे आहे. मी जे काही सांगावयास पहातो आहे, ते कुठल्याही धार्मिक श्रद्धांवर अवलंबून नसले तरी ख्रिश्चन नीतीशी बरेचसे मिळते-जुळते आहे. सॉक्रेटीस व द अॅपोसल्स यांनी असे सांगून ठेवले आहे की आपण मानवाचे आज्ञापालन करण्यापेक्षा ईश्वरी आज्ञेचे पालन करावे आणि गॉस्पेलसमध्ये असे म्हटले आहे की आपण आपल्या शेजाऱ्यावर प्रेम केले पाहिजे. सर्व थोर धर्मप्रेषित व संत, तसेच सर्व कलाकार व अभिजात विचारवंत यांची चरित्रे पाहिली तर असे दिसते की स्वतःच्या ठिकाणच्या सर्जनशील प्रेरणांची पूर्ती करण्याचे सर्वप्रथम नैतिक बंधन आपल्यावर आहे अशी त्यांची अनुभूती होती. आणि त्यात ते यशस्वी झाले म्हणजे त्यांना उच्च प्रकारचे नैतिक समाधान व आनंदाचे भरते येई. या भावनेवरच गॉस्पेलसमधील 'देवाविषयीचे कर्तव्य' ही संकल्पना उभारलेली आहे आणि (मी पुन्हा एकदा हे सांगतो) ही भावना धार्मिक श्रद्धेपासून अलग करणे शक्य

आहे. माझ्या शेजाऱ्याविषयीचे माझे कर्तव्य, किंबहुना माझ्या शेजाऱ्याच्या दृष्टिकोनातून त्याला दिसणारे माझे त्याच्याविषयीचे कर्तव्य, एवढेच माझे सर्व कर्तव्य असे म्हणता येणार नाही. माझी सदसद्विवेकबुद्धी जर मला ठामपणे सांगत असेल की शासकीय सत्तेने निषिद्ध ठरविलेल्या मार्गानेच मला गेले पाहिजे, तर शासनसंस्थेच्या विरुद्ध जाऊनही मला जे योग्य वाटते तसे मी वागले पाहिजे. याचीच दुसरी बाजू अशी की, माझ्या निष्ठांप्रमाणे वागण्यास, जोपर्यंत त्या निष्ठांविरुद्ध त्यांना अतिशय समर्थ कारणे देता येत नाहीत तोपर्यंत, समाजाने मला स्वातंत्र्य दिले पाहिजे.

परंतु वैयक्तिक कर्तव्याच्या जाणिवेतून आपण ज्या कृती करतो त्याच कृती तेवढ्या फाजील सामाजिक दडपणापासून मुक्त असाव्यात असे नाही. एखादा कलाकार किंवा एखादा शास्त्रज्ञ समाजासाठी अगदी उपयुक्त असे एखादे कार्य करीत असला तरी केवळ कर्तव्याच्या भावनेने त्याला खरी निर्मिती करता येण्यासारखी नसते. त्याच्या मनात चित्र काढावे वा शोध घ्यावा अशी उत्स्फूर्त प्रेरणा उत्पन्न व्हावयास पाहिजे. तशी उत्स्फूर्त प्रेरणा नसेल तर त्याचे चित्र कवडीमोलाचे ठरेल व त्याचे संशोधन महत्त्वाचे असणार नाही.

सामाजिक जीवनापेक्षा वैयक्तिक जीवन नैतिक दृष्ट्या कमी प्रतीचे आहे असे मानण्याचे कारण नाही; किंबहुना, याच्या उलट, काही सर्वोच्च मानवी कृती या, निदान भावनेच्या दृष्टीने तरी, सामाजिक असण्यापेक्षा, व्यक्तिगत स्वरूपाच्याच असतात. मी माझ्या तिसऱ्या व्याख्यानात म्हटल्याप्रमाणे, प्रेषित, संत, कवी, संशोधक यांची जीवने एका दृष्टीने भारून गेलेली असतात. अशी माणसे मूलतः एकाकीच असतात. त्यांच्या ठिकाणची प्रभावी प्रेरणा जेव्हा बलिष्ठ असते तेव्हा त्यांना जे काही अंतःकरणापासून योग्य वाटते त्याविरुद्ध जर सत्ता

जात असेल तर सत्तेचा आदेश आपण पाळू शकत नाही असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांना जरी पुष्कळदा त्यांच्या काळात खूप छळ सहन करावा लागतो, तथापी भविष्यकाळ मात्र इतर कोणाहीपेक्षा अशा व्यक्तींनाच सर्वोच्च मान देईल अशी शक्यता असते. ही माणसेच जगातल्या ज्या गोष्टी आपल्याला सर्वात मूल्यवान वाटतात त्या गोष्टीची देणगी जगाला देत असतात. आणि हे फक्त धर्माच्या, कलेच्या, विज्ञानाच्या क्षेत्रांतच खरे आहे असे नाही. शेजारधर्माची भावना, जी आपण सुसंस्कृत माणसाचा विशेष मानतो, ती देखील अशा व्यक्तींनीच समाजाला दिलेली देणगी आहे. कारण इतर क्षेत्रांतल्याप्रमाणेच सामाजिक कर्तव्याची जाणीवदेखील भावना व विचार यांवरील समूहाचे दडपण न जुमानणाऱ्या एकाकी व्यक्तींच्या मुळेच प्रगल्भ होत गेली आहे.

मानवी जीवन जर जीर्ण व नीरस व्हावयास नको असेल, तर जीवनात उपयोगी नसणाऱ्याही काही मूल्यवान गोष्टी असू शकतात हे ओळखणे महत्त्वाचे आहे. एखादी गोष्ट उपयोगी असते याचा अर्थ दुसरे काही मिळविण्याचे साधन म्हणून ती उपयोगी असते. परंतु ही दुसरी गोष्ट जर तिसरी गोष्ट मिळविण्याचे साधन म्हणून नसेल, तर तिचे स्वतःसाठीच काही मोल असले पाहिजे. कारण शेवटी कोणत्याच गोष्टीचे जर स्वतःसाठी मूल्य नसेल, तर उपयुक्तता हा एक भ्रमच ठरतो.

साधने आणि साध्य यांचा समतोल साधणे हे फार अवघड आहे, परंतु तितकेच महत्त्वाचेही आहे. साधनांचे महत्त्व तुम्हाला प्रतिपादन करावयाचे असले तर सुसंस्कृत माणसांतील व रानटी माणसांतील, किंवा मोठ्या माणसातील व लहान मुलातील किंवा माणसातील व जनावरातील फरक हा, बऱ्याचशा प्रमाणात, आपल्या वर्तणुकीत साधन

व साध्य यांच्यावर ती जो वेगवेगळा भर देतात त्यातील फरक आहे, असे तुम्ही म्हणू शकाल. सुसंस्कृत माणूस आपल्या आयुष्याचा विमा उतरवितो, रानटी माणूस उतरवीत नाही; मोठा माणूस आपले दात खराब होऊ नयेत म्हणून ते घासतो, तर लहान मूल त्याला दात घासावयास भाग पाडल्याखेरीज ते घासत नाही. थंडीच्या काळात अन्न मिळावे म्हणून माणसे शेतात काम करतात, जनावरे करीत नाहीत. भविष्यकाळात सुख मिळावे म्हणून आज नावडणारे कष्ट करण्यात जी दूरदृष्टी आहे ती दूरदृष्टी हे मानसिक विकासाचे एक महत्त्वाचे लक्षण आहे. असे दूरवर पाहाणे अवघड असते, आणि त्यासाठी उत्स्फूर्त प्रेरणेला मुरड घालावी लागते. यामुळे नीतिशास्त्रज्ञ दूरदृष्टीवर भर देतात आणि आजच्या त्यागापासून भविष्यकाळात मिळणाऱ्या सुखापेक्षा आज स्वार्थत्याग केल्याने मिळणाऱ्या पुण्यावर भर देतात. तुम्ही सदाचाराने वागले पाहिजे; तो स्वर्गात जाण्याचा मार्ग आहे म्हणून नाही तर सदाचाराने वागणे योग्य आहे म्हणून. सर्व विचारी माणसे पैशाची बचत करतात म्हणून तुम्ही ती केली पाहिजे. केवळ भविष्यकाळात तुम्हला मजेत राहता येईल इतके उत्पन्न बचत केल्याने मिळेल म्हणून बचत करावी असे नव्हे. अशा प्रकारचे हे प्रतिपादन असते.

परंतु ज्या माणसाला साधनांपेक्षा साध्याला अधिक महत्त्व द्यावयाचे आहे, त्याला याच्या अगदी उलट वाद करता येईल, आणि त्याचे म्हणणेही तितकेच खरे म्हणता येईल. तारुण्यात केलेल्या श्रमांमुळे आणि काळजीमुळे अपचनाचा रोग जडलेल्या श्रीमंत माणसाला फक्त रोटी आणि पाणी यांवर रहावे लागते आहे आणि त्याचे बेफिकीर पाहुणे मात्र मजेत त्याच्याकडील पंचपक्वान्नांवर ताव मारीत आहेत हे दृश्य केविलवाणे आहे. कंटाळवाण्या कष्टाच्या प्रदीर्घ काळात त्याने

वृद्धपणी, निवृत्तीच्या काळात श्रीमंतीच्या सुखांची स्वप्ने पाहिलेली असतात. ते सौख्य त्याच्या हातातून निसटून जाते. पैशामुळे मिळणाऱ्या सत्तेच्या जोरावर तो फक्त एकच सुख अनुभवू शकतो. आणि ते म्हणजे, तो आपल्या मुलांनाही आपल्यासारखेच निष्फळ काबाडकष्ट करावयास लावतो. पैशाचा संचय करण्याचे वेड असणाऱ्या चिक्कू लोकांना, साधनामधील ज्यांची व्यस्तता विकृतीच्या थराला गेलेली असते त्यांना, आपण सामान्यतः मूर्ख समजतो. परंतु याच चिक्कूपणाच्या रोगाच्या सौम्य प्रकारांची बाधा झालेल्यांची मात्र फारच स्तुतिस्तोत्रे गाइली जातात. साध्यांची जाणीव न ठेवताच जर आपण केवळ साधनांची उपासना करीत बसलो, तर जीवन उदास आणि रसहीन बनते. अशा परिस्थितीत उत्कट अनुभवाची इच्छा, एरवी शोधला असता त्यापेक्षा अधिक वाईट मार्ग शोधते. युद्ध, अहेतुक क्रौर्य, कटकारस्थाने वा अन्य विध्वंसक मार्ग यांचा अवलंब करण्याकडे प्रवृत्ती होते.

आपण 'व्यवहारी' आहोत असा गर्व जी माणसे करीत असतात, ती आपला बहुतेक वेळ केवळ साधनांच्या मागे लागण्यातच दवडीत असतात. हा केवळ अर्धा शहाणपणा झाला. दुसरा अर्धा भाग हा साध्याशी निगडीत आहे. त्या बाजूचा जर आपण विचार केला, तर आर्थिक प्रक्रिया, किंबहुना संपूर्ण मानवी आयुष्य, यांविषयीचा आपला दृष्टिकोणच संपूर्णपणे बदलतो. उत्पादकांनी काय निर्माण केले आणि त्या निर्माण केलेल्याचा उपभोग घेऊन उपभोग घेणारांनी परत काय उत्पादन केले, असे प्रश्न त्यानंतर आपण विचारीत बसत नाही. त्यापेक्षा आपण असे प्रश्न विचारू : उपभोग घेणारे आणि उत्पादन करणारे यांना जीवनात आनंद देणारे असे काय मिळाले? भावना, ज्ञान किंवा कृती यांच्या क्षेत्रात जीवनाला काही अर्थ यावा असे त्यांनी

काही अनुभवले आहे काय? नवीन ज्ञाननिर्मितीतील भव्योदात्तता त्यांनी अनुभवलेली आहे का? प्रेम व मैत्री यांचा त्यांनी अनुभव घेतला आहे का? सोनेरी उन्हाने, कोवळ्या पालवीने वा फुलांच्या सुवासाने ते कधी धुंद झालेत का? छोट्या छोट्या जमाती नृत्यातून व गीतातून आपला जगण्यातील आनंद व्यक्त करीत असतात, तशा प्रकारचा आनंद त्याने उपभोगिला आहे का? लॉस अँजेलीसमध्ये राहत असताना एकदा त्या शहरात मेक्सिकन मोहल्ला बघायला मला नेले होते. हे लोक आळशी, उडाणटप्पू आहेत म्हणून मला सांगण्यात आले होते. परंतु कामाच्या व काळजीच्या भाराखाली खंगलेल्या माझ्या यजमान मंडळीपेक्षा, ज्यामुळे जीवन हे शाप न ठरता वरदान ठरते त्या जीवनातील आनंददायक गोष्टींचा तेच अधिक रसिकतेने उपभोग घेत आहेत असे मला वाटले. ही माझी भावना मी माझ्या यजमानांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांचे चेहरे मख्ख होते. कुणाच्याच लक्षात मला काय म्हणावयाचे आहे ते आले नाही.

राजकारण, अर्थकारण आणि समाजसंघटन ही साधारणपणे, साधनांच्या मालिकेत बसतात, साध्याच्या नव्हेत, ही गोष्ट लोकांच्या ध्यानात येत नाही. आपली राजकीय व सामाजिक विचारसरणी 'शासकाच्या भ्रमा'ला बळी पडत असते. समाज हा सुसंघटित, एकसंध असला पाहिजे; सुव्यवस्थेचा तो एक उत्कृष्ट नमुना असला पाहिजे; त्याचे सर्वभाग एकमेकात चपखलपणे व योजनाबद्ध रीतीने बसविले असले पाहिजेत असे मानावयाची जी सवय असते तिला मी 'शासकांचा भ्रम' असे म्हणतो. परंतु बाहेरून नीट सुसंघटित दिसावा यासाठी कुठलाही समाज अस्तित्वात येत नाही, निदान येऊ नये; त्या समाजातील व्यक्तीला चांगले जीवन व्यतीत करता यावे यासाठी समाजाची धारणा

असावी. समष्टीच्या नाही तर व्यक्तीच्या ठिकाणी हे सर्वोच्च व अंतिम मूल्य शोधले पाहिजे. चांगला समाज हे, समाजात राहाणाऱ्या व्यक्तीचे जीवन सुखी करण्याचे एक साधन आहे, याखेरीज समाजाचा चांगुलपणा अशी काही वेगळी चीज अस्तित्वात असू शकत नाही.

राष्ट्राला एखाद्या सजीव संघटनेची उपमा देण्यात येते तेव्हा, त्या उपमेच्या मर्यादा लक्षात घेतल्या नाहीत तर, त्यातून धोका संभवतो. उच्चतर प्राणी आणि माणसे यांची संघटनाही खऱ्याखुऱ्या अर्थाने सजीव संघटना असते. एखाद्या मनुष्याला जो काही आनंद अथवा दुःख मिळते ते संपूर्ण व्यक्तीला मिळते; त्याच्या ह्या किंवा त्या भागालाच मिळते असे नव्हे. जर माझा एखादा दात दुखत असला, किंवा पायाचे एखादे बोट दुखत असले, तर *मला* त्याचे दुःख सहन करावे लागते; मज्जातंतूंनी तो भाग माझ्या मेंदूशी जोडलेला नसेल, तर माझ्या दृष्टीने ते दुःख अस्तित्वात नसेल. परंतु हर्फर्डशायरमधील एखादा शेतकरी बर्फाच्या वादळात सापडतो तेव्हा थंडी त्याला वाजते. लंडनमधील सरकारला थंडी वाजत नाही. सुखाचे किंवा दुःखाचे ओझे व्यक्ती वाहते. ते ओझे एका बाजूला व्यक्तीच्या शरीराचा कोणताही एखादा भाग सुटेपणाने वाहत नाही, त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूला व्यक्तींचा समूहही ते ओझे वाहत नाही. व्यक्तिव्यक्तीच्या बऱ्या-वाइटापेक्षा वेगळे असे समष्टीचे बरे किंवा वाईट असू शकते असे मानणे ही एक चूक आहे. इतकेच नव्हे तर ह्या चुकीच्या समजुतीची परिणती हुकुमशाहीत होते, आणि म्हणून ही चूक फार धोकादायक आहे.

काही तत्त्वज्ञानी आणि राजकारणी पुरुषांना असे वाटते की नागरिकांच्या कल्याणाचा मार्ग सुकर करण्यापुरती शासनसंस्थेची साधनरूप उत्कृष्टता सीमित नसून, त्याहिपलीकडे शासनसंस्थेचा एक

स्वतःचा आदर्श असू शकतो. ह्या विचाराशी सहमत होण्याचे मला काही कारण दिसत नाही. 'शासनसंस्था' ही एक अमूर्त निराकार गोष्ट आहे, तिला सुखदुःखाची संवेदना नाही, आशा-निराशा वाटत नाही, की भयाने तिच्या अंगावर काटा उभा राहत नाही. शासनसंस्थेची उद्दिष्टे असे आपण म्हणतो, तेव्हा खरे पाहिले असता शासनसंस्थेतील धुरिणांच्या उद्दिष्टांविषयी आपण बोलत असतो. आपण जेव्हा 'शासनसंस्थेचा'चा अमूर्त स्वरूपात विचार न करता प्रत्यक्ष सत्तेवर असलेल्या शासनाचा विचार करतो तेव्हा शासनसंस्था म्हणजे वस्तुतः बहुसंख्य लोकांपेक्षा अधिक सत्ता ज्यांच्या हातात आहे अशा काही सत्ताधारी व्यक्तींचा गट होय ही गोष्ट आपल्या ध्यानात येते. आणि म्हणून 'शासनसंस्थेची पूजा' ही प्रत्यक्षात शासनात अधिकारावर असणाऱ्या लहानशा गटाची पूजा ठरते. कुठल्याही लोकशाहीवादी माणसाला असले मूलतः अन्याय्य तत्त्वज्ञान खपणार नाही.

दुसराही एक नीतिशास्त्रीय सिद्धांत माझ्या मते असाच अपुरा आहे. या सिद्धांताला 'जीवशास्त्रीय नीतिसिद्धांत' असे म्हणता येईल. परंतु मला हे स्पष्ट केले पाहिजे की जीवशास्त्रज्ञ हा नीतिसिद्धांत प्रतिपादतात असे नाही. मानवी उत्क्रांतीच्या चिंतनावर आधारित असा हा दृष्टिकोण आहे. अस्तित्वासाठी चाललेल्या संघर्षातून हळूहळू अधिकाधिक गुंतागुतीची जीवरचना निर्माण झाली, आणि या प्रक्रियेतून निर्माण झालेला (आजपर्यंत तरी) अत्युच्च प्राणी मानव हा होय, असे या दृष्टिकोणात मानले जाते. ह्या दृष्टिकोणानुसार 'अस्तित्व टिकविणे' हे सर्वोच्च ध्येय आहे; त्यातही विशेषतः आपल्या जातीचे अस्तित्व टिकविणे हे सर्वोच्च उद्दिष्ट आहे. हे जर बरोबर असेल, तर ज्यामुळे मानवांची पृथ्वीतलावरील संख्या वाढेल ते सर्व चांगलेच

म्हटले पाहिजे आणि ज्यामुळे लोकसंख्या कमी होईल ते वाईट समजले पाहिजे.

अशा प्रकारचा यांत्रिक आणि अंकगणिती दृष्टिकोण मला समर्पक वाटत नाही. जगात जितकी माणसे आहेत त्यापेक्षा अधिक मुंग्या ज्यात सापडतील असा एक एकर जमिनीचा तुकडा आपल्याला सापडेल. परंतु त्यामुळे मानवांपेक्षा मुंग्या अधिक श्रेष्ठ आहेत असे आपण म्हणत नाही. आणि दारिद्र्यात व दुःस्थितीत राहणाऱ्या मोठ्या लोकसंख्येपेक्षा, सुखात व सुस्थितीत राहणारी कमी लोकसंख्या कुठल्या करुणावान माणसाला अधिक आवडणार नाही?

अर्थात, इतर काहीही साध्य करावयाचे असेल, तर प्रथम जिवंत असणे ही एक प्राथमिक गरज आहे ही गोष्ट खरी. परंतु इतर गोष्टी मिळविण्यासाठीची आवश्यक शर्त म्हणून अस्तित्व टिकविण्यास महत्त्व आहे, केवळ जगण्याला स्वतःचे असे काही महत्त्व असेल असे नाही. आधुनिक विज्ञान आणि उत्पादन यांनी निर्माण केलेल्या आधुनिक जगात केवळ जिवंत राहण्यासाठी देखील शासनाची फार मोठी गरज आहे. परंतु जिवंत राहण्याला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या गोष्टी शासनाच्या कक्षेबाहेरील स्रोतांपासून निर्माण होणाऱ्या असतात. ह्या दोन विरोधी आवश्यकतांचा मेळ कसा घालावा हा आपल्या विवेचनामागील हेतू आहे.

आतापर्यंत केलेल्या वेगवेगळ्या विवेचनाचा एकत्र विचार करून, आणि आजच्या काळातील सारे धोके लक्षात ठेवून, मी काही निष्कर्ष पुन्हा मांडणार आहे. विशेषतः भविष्याविषयीचे आशादायी चित्र मी रेखाटणार आहे; भविष्याविषयी अशी आशा बाळगण्यास वाजवी कारणे आहेत असे मला वाटते.

समाजसंघटन म्हणजे सर्व काही असे मानणारे एका बाजूला आणि

वैयक्तिक उपक्रमशीलता सर्वांत मूल्यवान मानणारे दुसऱ्या बाजूला, असा झगडा अगदी प्राचीन ग्रीकांच्या काळापासून आज पुष्कळ वर्षे चालू आहे. अशा या अनादिअनंत चालणाऱ्या वादविवादाच्या दोन्हीही बाजूंत सत्याचा अंश असणारच. त्यामुळे या बाबतीत एक बाजू बरोबर, दुसरी चूक असा स्पष्ट निर्णय करणे शक्य नाही. शेवटी जो तोडगा निघेल त्यासाठी दोन्ही भूमिकांतून कमीअधिक अंश घेऊन तडजोड करावी लागेल.

मानवजातीच्या इतिहासात, मी माझ्या दुसऱ्या व्याख्यानात दिग्दर्शित केल्याप्रमाणे, अतिशय अराजकाचा काळ आणि अत्यंत कडक सरकारी नियंत्रण असणारा काळ, अशा दोन विरुद्ध टोकांमध्ये हेलकावे दिसून येतात. सध्याच्या काळी (जागतिक शासनसंस्थेविषयीचा विचार वगळता) शासनसंस्थेच्या हाती अधिकाधिक अधिकार देण्याकडे प्रवृत्ती आहे, आणि उपक्रमशीलतेचे संरक्षण करण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. प्रचंड संघटना ज्यांच्या ताब्यात आहेत अशा माणसांची विचारांची बैठक प्रत्यक्षापासून फार दूर गेली आहे. हाडामासाच्या माणसाची सुखदु:खे काय असतात हे विसरण्याकडे त्यांची प्रवृत्ती आहे. आणि माणसासाठी पद्धती वाकविण्याऐवजी, पद्धतीच्या साच्यात माणसे बसविण्याचा प्रयत्न ते करतात.

दूरस्थ असणाऱ्या शासनाकडून मोठमोठ्या विस्तीर्ण प्रदेशांचे नियंत्रण केले जाते या वस्तुस्थितीचा घनिष्ठ संबंध आपल्या अत्यंत संघटित समाजात उत्स्फूर्ततेचा अभाव आढळतो या घटनेशी आहे.

विकेंद्रीकरणाचा एक महत्त्वाचा फायदा असा की त्यामुळे मनुष्यास आशा बाळगण्यास अधिक अवसर मिळतो आणि या आशा ज्यात मूर्त होतात अशा प्रकारची कार्ये करण्यास व्यक्तींना वाव मिळतो. आपले सर्व राजकीय विचार जर अंती जटिल प्रश्नांवर आणि जागतिक

विनाशाच्या संकटाच्या धोक्यावर केंद्रित झाले तर आपण चटकन निराशावादी होण्याची शक्यता आहे. युद्धाची भीती, वा क्रांतीची भीती, वा प्रतिगामी शक्तींची भीती यांपैकी, तुमच्या मनोवृत्तीप्रमाणे आणि तुमच्या राजकीय विचारसरणीप्रमाणे, एखादी भीती तुम्हांला भेडसावील. मूठभर सत्ताधीशांपैकी तुम्ही एक नसलात तर या विराट प्रश्नांबद्दल आपल्याला काहीच करता येणे शक्य नाही असे तुम्हांला वाटत राहील. परंतु लहानसहान प्रश्नांविषयी, उदाहरणार्थ, तुमच्या गावच्या किंवा तुमच्या मजूर-संघटनेमधील, किंवा तुमच्या राजकीय पक्षांच्या स्थानिक शाखेशी संबंधित अशा प्रश्नांच्या सोडवणुकीवर यशस्वीपणे आपला प्रभाव पाडता येईल अशी आशा तुम्ही बाळगू शकता. ह्यामुळे तुमचे मन आशावादी होईल, आणि अधिक महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीत आपल्याला यश मिळवावयाचे असेल तर अशा आशावादी मनोवृत्तीची सर्वात अधिक गरज आहे. युद्धे, सर्व प्रकारच्या वस्तूंची टंचाई, आणि आर्थिक तंगी यामुळे जवळजवळ सर्व जग मनोमन शिणून गेलेले आहे आणि आशा बाळगणे हेच अत्यंत उथळपणाचे व अप्रामणिक वाटत आहे. यश, मग ते सुरुवातीला लहानशा प्रमाणात का मिळेना, हाच, मनाला आलेला निराशवादी थकवा दूर करण्याचा उत्तम उपाय आहे. मोठमोठ्या प्रश्नांचे लहानलहान विभाग करून, त्यांपैकी ज्या विभागांची उत्तरे आपल्याला शोधता येणे शक्य असेल त्या विभागांवर आपले लक्ष केंद्रित करणे हाच सर्वसामान्य माणसाचा यश संपादन करण्याचा मार्ग असतो.

हे जग दुराग्रही राजकीय तत्त्वज्ञानांना बळी पडत आहे. आणि भांडवलशाही व साम्यवाद ही दोन आजच्या जगातील अशी प्रबळ राजकीय तत्त्वज्ञाने आहेत. आजच्या दुराग्रही व 'शुद्ध'

स्वरूपात जगातील टाळता येण्यासारखी दुःखे नाहीशी करण्याच्या दृष्टीने ती उपयोगी आहेत असे मला वाटत नाही. भांडवलशाहीत थोड्या लोकांच्या उपक्रमशीलतेला वाव मिळतो. कैद्याला असते तशी लाचार सुरक्षितता साम्यवादी समाजरचनेत सर्व लोकांना मिळू शकेल; तीही आज प्रत्यक्षात मिळते असे नाही. परंतु लोकांनी या फारच सरधोपट असलेल्या तत्त्वज्ञानांना आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या झगड्यांना झुगारून दिले, तर शास्त्रशुद्ध तंत्राचा योग्य उपयोग करून सर्वांना संधी मिळवून देता येईल व सुरक्षितताही प्राप्त करून देता येईल. दुर्दैवाने आपली राजकीय तत्त्वज्ञाने आपल्या विज्ञानापेक्षा अधिक निर्बुद्ध आहेत आणि आपले जीवन आनंदी–आणि पुढे जाऊन भव्योदात्त–करण्यासाठी आपल्या ज्ञानाचा आणि कसबाचा कसा उपयोग करून घ्यावा हे काही अजून आपण शिकलेलो नाही. युद्ध हे आजच्या काळातील मोठ्यात मोठे अनिष्ट आहे खरेच; परंतु केवळ युद्धाचा अनुभव आणि युद्धाची भीती यांच्याखालीच माणसाचा जीव दडपून गेला आहे असे नव्हे. आपल्या दैनंदिन जीवनावर हुकुमत गाजविणाऱ्या अमानवी संघटनारूपी शक्तीच्या खालीही आपण दडपले जातो, त्यामुळे कायद्याने जरी आपण आज गुलाम नसलो, तरी परिस्थितीचे गुलाम बनून राहतो. हे असे असण्याची काहीच जरुरी नाही. खोट्या दैवतांची पूजा केल्यामुळे ही परिस्थिती प्राप्त झालेली आहे. कर्तृत्ववान माणसे साध्यासुध्या सुखापेक्षा आणि स्नेहभावनेपेक्षा, सत्तेची अधिक पूजा करतात. कमी कर्तृत्ववान माणसांनी त्यांच्यापुढे मान तरी तुकविली आहे, नाहीतर आपल्या दुःखाचे मूळ कशात आहे याचे चुकीचे निदान करून ती गोत्यात तरी आलेली आहेत.

ज्यावेळेपासून मनुष्यप्राण्याने गुलामगिरीच्या पद्धतीचा शोध

लावला, त्यावेळेपासून दुसऱ्यांना दुःख देणाऱ्या साधनांनी, मार्गांनी आपल्याला सुख मिळू शकते अशी बलिष्ठांची श्रद्धा बनली आहे. हळूहळू लोकशाहीचा विकास होत गेल्याने, आणि आधुनिक काळात ख्रिश्चन नीतिकल्पनांची जी सांगड राजकारण आणि अर्थकारण या दोहोंशी घातली गेली त्यामुळे, गुलामांच्या मालकांच्या डोळ्यासमोर होता त्याहून अधिक चांगला आदर्श मान्यता पावू लागला आहे. आणि पूर्वीच्या काळात कधीही मान्यता पावले नव्हते एवढ्या व्यापक अर्थाने आर्थिक न्यायाचे तत्त्व आज स्वीकारले गेले आहे. परंतु न्यायप्रस्थापनेसाठी आपण जी गुंतागुंतीची रचना करीत गेलो आहोत तिच्यामुळे केवळ आर्थिक न्याय मिळाला म्हणजे सर्व मिळाले असे नव्हे, हे आपण विसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. दैनंदिन जीवनातील पार्थिव आनंद, काळजीपासून काही काळ मुक्तता, साहसासाठी आणि सर्जनशील कार्यासाठी अवसर, ही सर्व जीवनाला मोल देण्याच्या दृष्टीने आर्थिक न्यायाइतकीच महत्त्वाची आहेत. सुख आणि दुःख यांच्या फेऱ्यांपेक्षाही तेच तेच कंटाळवाणे जीवन माणसांच्या वृत्तींना अधिक मारक असेल हे शक्य आहे. ज्या व्यक्ती प्रशासकीय सुधारणांचा विचार करतात आणि समाजकल्याणाच्या योजना आखीत असतात त्या बहुधा प्रामाणिक असतात पण सहसा तरुण नसतात. बहुतेक लोकांना सुखी होण्यासाठी उत्स्फूर्तपणे क्रिया करता आली पाहिजे इतकेच पुरत नाही, तर त्या क्रियेबद्दल आत्मगौरवाची भावना बाळगता येणे आवश्यक असते याचा त्यांना अनेकदा विसर पडतो. सुनियंत्रित जगात जगज्जेत्याला वाटणाऱ्या गर्वाच्या भावनेला वाव देणे शक्य नाही; परंतु कलावंताची, संशोधकाची, वैराण वाळवंटात बाग फुलविणाऱ्याची, किंवा दुःखी जीवांना स्वतःच्या प्रयत्नांनी सुखी केलेल्याची, आत्मगौरवाची भावना ही चांगली आहे आणि स्वतःसंबंधी

स्वरूपात जगातील टाळता येण्यासारखी दुःखे नाहीशी करण्याच्या दृष्टीने ती उपयोगी आहेत असे मला वाटत नाही. भांडवलशाहीत थोड्या लोकांच्या उपक्रमशीलतेला वाव मिळतो. कैद्याला असते तशी लाचार सुरक्षितता साम्यवादी समाजरचनेत सर्व लोकांना मिळू शकेल; तीही आज प्रत्यक्षात मिळते असे नाही. परंतु लोकांनी या फारच सरधोपट असलेल्या तत्त्वज्ञानांना आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या झगड्यांना झुगारून दिले, तर शास्त्रशुद्ध तंत्राचा योग्य उपयोग करून सर्वांना संधी मिळवून देता येईल व सुरक्षितताही प्राप्त करून देता येईल. दुर्दैवाने आपली राजकीय तत्त्वज्ञाने आपल्या विज्ञानापेक्षा अधिक निर्बुद्ध आहेत आणि आपले जीवन आनंदी–आणि पुढे जाऊन भव्योदात्त–करण्यासाठी आपल्या ज्ञानाचा आणि कसबाचा कसा उपयोग करून घ्यावा हे काही अजून आपण शिकलेलो नाही. युद्ध हे आजच्या काळातील मोठ्यात मोठे अनिष्ट आहे खरेच; परंतु केवळ युद्धाचा अनुभव आणि युद्धाची भीती यांच्याखालीच माणसाचा जीव दडपून गेला आहे असे नव्हे. आपल्या दैनंदिन जीवनावर हुकुमत गाजविणाऱ्या अमानवी संघटनारूपी शक्तीच्या खालीही आपण दडपले जातो, त्यामुळे कायद्याने जरी आपण आज गुलाम नसलो, तरी परिस्थितीचे गुलाम बनून राहतो. हे असे असण्याची काहीच जरुरी नाही. खोट्या दैवतांची पूजा केल्यामुळे ही परिस्थिती प्राप्त झालेली आहे. कर्तृत्ववान माणसे साध्यासुध्या सुखापेक्षा आणि स्नेहभावनेपेक्षा, सत्तेची अधिक पूजा करतात. कमी कर्तृत्ववान माणसांनी त्यांच्यापुढे मान तरी तुकविली आहे, नाहीतर आपल्या दुःखाचे मूळ कशात आहे याचे चुकीचे निदान करून ती गोत्यात तरी आलेली आहेत.

ज्यावेळेपासून मनुष्यप्राण्याने गुलामगिरीच्या पद्धतीचा शोध

लावला, त्यावेळेपासून दुसऱ्यांना दुःख देणाऱ्या साधनांनी, मार्गांनी आपल्याला सुख मिळू शकते अशी बलिष्ठांची श्रद्धा बनली आहे. हळू-हळू लोकशाहीचा विकास होत गेल्याने, आणि आधुनिक काळात खिश्चन नीतिकल्पनांची जी सांगड राजकारण आणि अर्थकारण या दोहोंशी घातली गेली त्यामुळे, गुलामांच्या मालकांच्या डोळ्यासमोर होता त्याहून अधिक चांगला आदर्श मान्यता पावू लागला आहे. आणि पूर्वीच्या काळात कधीही मान्यता पावले नव्हते एवढ्या व्यापक अर्थाने आर्थिक न्यायाचे तत्त्व आज स्वीकारले गेले आहे. परंतु न्यायप्रस्थापने-साठी आपण जी गुंतागुंतीची रचना करीत गेलो आहोत तिच्यामुळे केवळ आर्थिक न्याय मिळाला म्हणजे सर्व मिळाले असे नव्हे, हे आपण विसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. दैनंदिन जीवनातील पार्थिव आनंद, काळजीपासून काही काळ मुक्तता, साहसासाठी आणि सर्जनशील कार्यासाठी अवसर, ही सर्व जीवनाला मोल देण्याच्या दृष्टीने आर्थिक न्यायाइतकीच महत्त्वाची आहेत. सुख आणि दुःख यांच्या फेऱ्यांपेक्षाही तेच तेच कंटाळवाणे जीवन माणसांच्या वृत्तींना अधिक मारक असेल हे शक्य आहे. ज्या व्यक्ती प्रशासकीय सुधारणांचा विचार करतात आणि समाजकल्याणाच्या योजना आखीत असतात त्या बहुधा प्रामाणिक असतात पण सहसा तरुण नसतात. बहुतेक लोकांना सुखी होण्यासाठी उत्स्फूर्तपणे क्रिया करता आली पाहिजे इतकेच पुरत नाही, तर त्या क्रियेबद्दल आत्मगौरवाची भावना बाळगता येणे आवश्यक असते याचा त्यांना अनेकदा विसर पडतो. सुनियंत्रित जगात जगज्जेत्याला वाटणाऱ्या गर्वाच्या भावनेला वाव देणे शक्य नाही; परंतु कलावंताची, संशोधकाची, वैराण वाळवंटात बाग फुलविणाऱ्याची, किंवा दुःखी जीवांना स्वतःच्या प्रयत्नांनी सुखी केलेल्याची, आत्मगौरवाची भावना ही चांगली आहे आणि स्वतःसंबंधी

अशी आत्मगौरवाची भावना बाळगणे थोड्याथोडक्यांनाच नव्हे, तर बहुसंख्य लोकांना शक्य होईल अशी आपली समाजरचना असली पाहिजे.

ज्या सहजप्रेरणांमुळे आपले प्राचीन पूर्वज शिकार व लढाया करण्यास उद्युक्त होत होते, त्या प्रेरणा बाहेर वाट मिळण्यासाठी धडपडत असतात. त्यांना जर दुसरी कुठलीच वाट मिळाली नाही तर त्या मत्सर आणि दुष्टावा यांत परिवर्तित होतात. परंतु ह्या सहजप्रेरणांच्या आविष्कारास फक्त अशा प्रकारचे अनिष्ट मार्गच मोकळे आहेत असे नव्हे. युद्धाऐवजी आपल्याला विविध स्पर्धा आणि जोमदार खेळ ठेवता येतील. शिकारीची जागा, साहसातील आनंद किंवा संशोधनातील वा निर्मितीतील आनंद घेऊ शकतील. या सहजप्रेरणांकडे आपण दुर्लक्ष करता कामा नये, तसेच त्यांच्या अस्तित्वाबद्दल खंतही करण्याचे कारण नाही. मानवी संस्कृतीतील हीन आणि श्रेष्ठ दोन्ही गोष्टींचा मूल स्रोत या प्रेरणांमध्ये आहे. (मनुष्य ज्या ज्या गोष्टी करतो, त्यांतील फक्त वाईट गोष्टींनाच या प्रेरणा जबाबदार आहेत असे नव्हे, तर मानवात जे काही उत्कृष्ट आहे त्याचा उगमही या प्रेरणांतूनच होतो.) एकदा सर्व जगात सुरक्षितता प्रस्थापित झाली म्हणजे मानवी कल्याणासाठी झटणाऱ्या लोकांचे सर्वात महत्त्वाचे काम राहील, ते, या प्राचीन आणि बलशाली प्रेरणांना, शक्यतोवर व शक्य तितक्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या, जीवनाला प्रतिष्ठा देणाऱ्या व जीवन वैभवशाली बनविणाऱ्या वाटांनी मोकळीक करून देण्याचे. या प्रेरणांना निव्वळ प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करणे किंवा फक्त विध्वंसाला कारणीभूत होणाऱ्या वाटा मोकळ्या ठेवणे पुरेसे होणार नाही.

मानवजातीच्या विकासाच्या अनेक युगांच्या कालात मनुष्यमात्राला

दोन प्रकारचे दु:ख सहन करावे लागले आहे. एक बाह्य नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेले दु:ख आणि दुसरे माणसांनी चुकीच्या विचारसरणीमुळे एकमेकांना भोगावयास लावलेले दु:ख. सुरुवातीच्या काळात, नैसर्गिक आपत्तींमुळे सोसावे लागणारे दु:ख अधिक मोठे होते. मानव हा एक दुर्मिळ प्राणी होता आणि त्याचे जीवित असुरक्षित होते. मानव वानराप्रमाणे चपळ नव्हता, थंडीपासून रक्षण करणारा उबदार केसाळ कातड्याचा कोट त्याच्यापाशी नव्हता, जंगली श्वापदांपासून स्वत:स बचावणे त्याला अवघड जात होते आणि जगातील बऱ्याच मोठ्या भागांतली कडक थंडी त्याला सहन होत नव्हती. जीवशास्त्रीय दृष्टया दोन बाबतींत माणूस इतर प्राण्यांहून सरस होता. तो दोन पायांवर उभा राहू शकत असल्यामुळे त्याचे हात त्याला मोकळे मिळाले ही एक सरस गोष्ट आणि दुसरी सरस गोष्ट म्हणजे, अनुभवावरून शहाणपणा शिकण्याची आणि तो दुसऱ्यास शिकविण्याची बुद्धी त्याच्या ठिकाणी होती. हळूहळू या दोन गोष्टींमुळे तो सर्वश्रेष्ठ ठरला. मानवांची संख्या इतर कुठल्याही सस्तन प्राण्यांपेक्षा अधिक झाली. परंतु महापूर, दुष्काळ आणि रोगराई यांमधून आपली शक्ती दाखवून निसर्ग अजूनही मानवावर मात करू शकत असे. आणि आपल्या रोजच्या भाकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी बहुसंख्य मानवांना जे अपार काबाडकष्ट करावे लागतात, त्यातही निसर्गाची शक्ती दिसून येत होती.

आजच्या काळात बाह्य निसर्गाची आपली गुलामगिरी भराभर कमी होत आहे. याचे श्रेय वैज्ञानिक हुशारीत झालेल्या वाढीला द्यावे लागेल. दुष्काळ आणि रोगराई यांचा प्रादुर्भाव अजूनही होतो. परंतु प्रत्येक वर्षी हे कसे टाळावयाचे याचे आपल्याला अधिकाधिक ज्ञान होत आहे. अजूनही आपल्याला काबाडकष्ट करावे लागतात. परंतु

त्याचे मुख्य कारण आपल्या मूर्खपणातच सापडेल. शांतता राखली आणि सहकार्याची वृत्ती बाळगली तर आपल्या उपजीविकेसाठी आपल्याला फारसे कष्ट करावयास लागणार नाहीत. आपण जेव्हा केव्हा शहाण्यासारखे वागायचे ठरवू तेव्हा आजच्या उत्पादनतंत्रांच्या साहाय्याने कितीतरी बाबतींत बाह्य निसर्गाच्या दास्यात पूर्वीसारखे अडकून न राहता आपणास स्वतःची मुक्तता करून घेता येईल.

परंतु मानवप्राणी एकमेकांशी वागताना जो दुष्टपणा दाखवीत आहे तो मात्र अजून फारसा कमी झालेला नाही. अजूनही युद्धे, जुल्म आणि भयानक क्रौर्य दिसून येत आहे. अजूनही लोभी माणसे आपल्यापेक्षा कमी हुशार किंवा कमी निष्ठुर असलेल्यापासून संपत्ती लुबाडून घेत आहेत. अजूनही सत्तेच्या अभिलाषेमुळे फार मोठ्या जुलमी शाह्या अस्तित्वात येत आहेत. जेव्हा फार मोठा जुल्म करणे जमत नाही. तेव्हा सत्तेच्या हव्यासातून उगीचच अडवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो. आणि भीती—एक सखोल, अबोध भीती—अजूनही बहुसंख्य व्यक्तींच्या जीवनातील प्रभावी प्रेरक शक्ती आहे.

हे सर्व अनावश्यक आहे. ह्या अनिष्ट गोष्टी आपण अटळपणे सहन केल्याच पाहिजेत असे मानवी स्वभावात काही नाही. माणसातल्या स्पर्धात्मक सहजप्रेरणांचा आधार देऊन, युद्ध व इतर विनाशक संघर्ष करणे हा माणसाचा स्वभावच आहे, असे काही लोकांचे प्रतिपादन आहे. त्यांच्याशी मी अजिबात सहमत नाही असे मला येथे पुन्हा एकदा ठासून म्हणावयाचे आहे. माझे मत याच्या अगदी विरुद्ध आहे. माझ्या मते स्पर्धात्मक सहजप्रेरणा एक महत्त्वाचे कार्य बजावतात आणि त्या वृत्तीचा अपायकारक आविष्कार बऱ्याच मोठ्या प्रमाणात सौम्य व कमी करता येणे शक्य आहे.

दारिद्र्याची भीती नाहीशी होईल, तेव्हा मालकीहक्काची हावदेखील

आपोआप कमी होईल. दुसऱ्यांना त्रास होणार नाही अशा प्रकाराने सत्तेची अभिलाषा भागविता येणे शक्य आहे. शोध आणि संशोधन यांमुळे निसर्गावर मात करून ही अभिलाषा भागविता येईल. उत्कृष्ट ग्रंथ, किंवा उत्कृष्ट कलाकृती यांच्या निर्मितीतूनही ही अभिलाषेची भूक पुरी करता येईल. आणि दुसऱ्याचे यशस्वीपणे मतपरिवर्तन करीत असताना सत्तेचीच अभिलाषा तृप्त केली जाऊ शकेल. उत्साह व दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याची इच्छा यांना जर योग्य वाट मिळाली तर त्या गोष्टी उपकारक असतात. तसे जर झाले नाही, तर त्याच शक्ती अपायकारक ठरतात. ज्याप्रमाणे वाफेने आगगाडी चालू शकते किंवा याच्या उलट, वाफेमुळेच एखाद्या बॉयलरचा स्फोटही होऊ शकतो.

बाह्य निसर्गाच्या गुलामगिरीतून आज आपण बऱ्याच मोठ्या प्रमाणात मुक्त झालो आहोत. त्यामुळे आजपर्यंत कधीही अस्तित्वात नव्हते इतक्या मोठ्या प्रमाणात सुख संपादन करणे सध्या शक्य झाले आहे. परंतु ही शक्यता जर प्रत्यक्षात आणावयाची असेल, तर खात्रीपूर्वक अपायकारक असलेल्या वाटा सोडून बाकी सर्व वाटा उपक्रमशीलतेला मोकळ्या असल्या पाहिजेत. आणि मानवाचे आयुष्य त्यातून अधिक संपन्नाही होणार असेल त्या सर्व प्रकारच्या उपक्रमशीलतेला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. माणसे भित्री आणि नेभळट करण्याचा प्रयत्न करून आपण चांगले जग निर्माण करू शकणार नाही; माणसांना निर्भय, साहसी आणि बेडर बनण्यास प्रोत्साहन दिल्यानेच आपण जगाचे मंगल करू शकू. परंतु हे साहस वा बेडरपणा वा ही निर्भयता म्हणजे इतरांवर क्लेश वा दुःख लादण्याचे साहस वा बेडरपणा वा निर्भयता नसावी याची दक्षता आपण घेतली पाहिजे. आज आपण ज्या जगात आहोत, त्या जगात कल्याणकारक गोष्टी करण्याची शक्यता जवळजवळ अमर्याद आहे, परंतु अनिष्ट गोष्टी

करण्याची शक्यताही तितकीच अमर्याद आहे. बाह्य निसर्गाचे 'अंतरंग' जाणण्याची व बाह्य निसर्गावर ताबा मिळविण्याची आपली कुवत आज अतिशय भयंकर कोटीला पोचलेली आहे. परंतु आपल्या अंतःकरणातील शक्तीचे ज्ञान करून घेण्याची कुवत त्याच्या जवळपासही कोठे पोचत नाही. आणि हेच माणसाला पडलेले सर्वांत मोठे संकट आहे. मनोनिग्रहाविषयी नीतिशास्त्रज्ञ नेहमीच आग्रह ठेवीत आले आहेत. परंतु या निग्रहाला पूर्वी ज्ञानाची बैठक नव्हती. बहुतेक राजकारणी पुरुषांची किंवा अर्थशास्त्रज्ञांची मानवी गरजांच्या विषयी जी समज असते त्याहून अधिक व्यापक पायावर मानवी गरजांचे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न मी या व्याख्यानांतून केला आहे. कारण अशी सखोल समज आली तरच आपली स्वप्ने, जी आपल्या ज्ञानाने व तंत्रावरील प्रभुत्वाने आज आपल्या आटोक्यात आणून ठेवली आहेत; पण जी अद्याप आपल्या मूर्खपणामुळे स्वप्नेच राहिली आहेत, ती साकार करण्याचा मार्ग आपणास सापडेल.

राजा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 20092 वि: निबंध
क्रमांक 9628 नोंद दि 27.11.88

## परिशिष्ट : टीपा

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| ३ | २१ | **'आफ्रिकेतील जंगलातल्या'... :** मध्य आफ्रिका हे आद्य मानवाचे वसतिस्थान होय. |
| ३ | २२ | **सर ऑर्थर कीथ :** (१८६६–१९५५) नामवंत स्कॉटिश मानववंशशास्त्रज्ञ. |
| ६ | १७ | **पॅलिऑलिथिक मॅन :** अश्मयुगाच्या पहिल्या टप्प्यातील मानव. |
| ८ | ९ | **निनेव्हे :** असीरियाची प्राचीन राजधानी. इराकमध्ये टायग्रीस नदीच्या काठी अवशेष. |
| | | **बॅबिलोन :** खि. पू. २००० पासून इतिहासात नोंद असलेली बॅबिलोनियाची राजधानी. बगदादच्या दक्षिणेस युफ्राटिस नदीच्या काठी अवशेष. |

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| ८ | १८ | **स्पार्टा** : लॅकोनिया या प्राचीन ग्रीक राज्याची राजधानी. लष्करी शिस्त, चिकाटी, साधेपणा, रणातील शौर्य आणि दुर्दम्य वृत्ती यांसाठी गाजलेल्या डोरियन लोकांचे निवासस्थान. |
| ८ | १९ | **हेलॉट्स** : पुरातन स्पार्टामधील गुलाम वर्ग. |
| ९ | ४ | **ऑर्फिक** : ग्रीक पुराणातील कवि ऑर्फियस याच्यापासून प्रेरणा घेणारा गूढवादी धर्मपंथ. |
| ९ | १३ | **क्रुसेड्स** : अकराव्या, बाराव्या व तेराव्या शतकांत मुस्लिमांच्या ताब्यातून 'पवित्र भूमी' (पॅलेस्टाइन) मुक्त करण्यासाठी ख्रिस्ती सत्तांनी चालवलेली युद्धे. |
| ९ | १९ | **हूजेनॉट्स** : सोळाव्या व सतराव्या शतकातले फ्रेंच प्रॉटेस्टंट. |
| ९ | २३ | **'धर्मग्रंथ'** : मार्क्सचा 'कॅपिटल' ग्रंथ येथे अभिप्रेत दिसतो. |
| १० | ५ | **ॲब्राहम लिंकन** : (१८०९–१८६५) अमेरिकेचे सोळावे राष्ट्राध्यक्ष. यांनी गुलामीची प्रथा नष्ट केली. या प्रश्नावरून अमेरिकेत झालेले यादवी युद्धही यांच्याच मताच्या विजयाने समाप्त झाले. १८६५ त त्यांचा खून झाला. |
| १३ | २५ | **पापुआ बेट** : ऑस्ट्रेलियाच्या उत्तरेकडील मले द्वीपसमूहातील न्यू गिनी. |
| २२ | १ | **अर्वाचीन अश्मयुग** : अश्मयुगाचा अखेरचा टप्पा. |
| २२ | ६ | **पिरॅमिड** : ख्रि. पू. तीन हजार वर्षांच्या आसपास ईजिप्तमध्ये बांधलेली ईजिप्शियन राजांची प्रचंड थडगी. कैरोनजीक. |
| २२ | ७ | **स्टोनहेंज** : इंग्लंडमध्ये सॅलिस्बरी माळावर |

पृष्ठ ओळ

प्रागैतिहासिक काळातले उंच उभट शिलाखंडांचे बांधकाम. ही बहुधा त्या काळातली प्रार्थनेची जागा असावी असा अंदाज केला जातो.

२३ १० **एक्झोडस** : जुन्या करारातले दुसरे पुस्तक. मोझेसच्या नेतृत्वाखाली इझरायली लोकांनी ईजिप्तमधून केलेल्या निर्गमनाचा वृत्तांत.

२५ ११ **शिकंदर** : प्राचीन ग्रीसमधील मॅसीडॉनचा राजा. जगजेता 'अलेक्झांडर व ग्रेट' (खि. पू. ३५६–३२३).

**ॲटिला** : हूणांचा राजा (४०६–४५३). डॅन्यूबकाठी वसतिस्थान. युरोपातील मोठाले प्रदेश त्याने जिंकले.

**चेंगीजखान** : मोगल वीरपुरुष (११६२–१२२७). मध्ययुगीन जगज्जेता.

२७ ५ **टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी** : अमेरिकन कॉंग्रेसच्या कायद्याने १९३३ मध्ये टेनेसी नदीकाठच्या प्रदेशाच्या विकासासाठी निर्माण झालेले सरकारनियुक्त मंडळ. पूरनियंत्रण, जलवहातूक, वीजनिर्मिती वगैरे उद्देश. असलेला जगातील एक प्रमुख समाज-विकास प्रकल्प.

**सेंट लॉरेन्स वॉटरवे** : कॅनडा आणि अमेरिका यांच्या अंतर्गत प्रदेशांना महासागरापर्यंतचा जलमार्ग उपलब्ध करून देण्यासाठी सेंट लॉरेन्स नदी महासरोवरांना जोडण्याची प्रचंड योजना. अमेरिका व कानडा यांनी संयुक्तपणे आखलेली ही योजना १९६४ मध्ये पूर्ण करण्यात आली.

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| २८ | ४ | **ॲझटेक** : तेराव्या शतकात या रानटी जमातीने प्राचीन मेक्सिकन साम्राज्याची उभारणी केली. स्पॅनिश सरदार कार्टेझ याने १५१९ मध्ये या साम्राज्याचा पाडाव केला. |
| | | **इन्का** : दक्षिण अमेरिकेतील पेरूमध्ये क्वेचुआ जमातीने स्थापलेले साम्राज्य; हेही स्पेनिश मुलुखगिरीत नष्ट झाले. ॲझटेक व इन्का संस्कृतीच्या विकसित रूपाने विजेत्या स्पॅनिशांनाही चकित केले. |
| २८ | २१ | **फीनिशियन्स** : सीरियाच्या पश्चिमेस असलेल्या फीनिशिया या प्राचीन दर्यावर्दी राष्ट्राचे नागरिक. |
| २९ | २२ | **मॅसिडोनिया** : आजच्या ग्रीस, युगोस्लाव्हिया व बल्गेरिया या देशांच्या काही भागांचा मिळून प्रदेश. प्राचीन काळी साम्राज्य. |
| ३० | १ | **ऑगस्टस** : रोमन सम्राट (खि. पू. ६३ ते खि. उ. १४). ज्यूलियस सीझरचा नातू. |
| ३० | ७ | **जस्टिनियन** : (४८३-५३५) बायझँटियन सम्राट. याच्या साम्राज्यास प्रारंभी 'पूर्वेकडील रोमन साम्राज्य' म्हणत. |
| ३० | ११ | **गॉथ्स** : (उत्तर युरोपियन जमात) आणि **व्हँडल्स** (बाल्टिक प्रदेशाच्या दक्षिणेकडील जमात) यांनी चवथ्या व पाचव्या शतकांमध्ये रोमन साम्राज्यावर आक्रमण करून बराच विध्वंस केला. |
| ३१ | ४ | **ट्यूटॉनिक** : प्राचीन उत्तर युरोपियन — मुख्यतः जर्मन टोळ्या. |
| ३१ | १६ | **अंधारयुग** : मध्ययुगाचा प्रारंभीचा टप्पा. बौद्धिक |

चळनवळनाच्या अभावामुळे या काळाला हे नाव पडले. (इ. स. ४५० ते ११५०)

मध्ययुग : रोमन साम्राज्याच्या पाडावापासून (५ वे शतक) अर्वाचीन युगाच्या प्रारंभापर्यंतचा (१४०० पर्यंतचा) काळ.

३४ १८ **शेक्सपियर** : (१५६४-१६६६). इंग्रज कवी व नाटककार.

४१ १२ **ज्यूलियस सीझर** : (खि. पू. १००–४४) रोमन सेनानी व सर्वाधिकारी, लेखक व वक्ता.

४१ १३ **कॅथॉलिक चर्चसंस्था** : १४७२ मध्ये खिश्चन धर्मसंस्थेची पौरस्त्य (ऑर्थांडॉक्स) व पाश्चात्य (कॅथॉलिक) अशी विभागणी झाली. आता 'कॅथालिक' ही संज्ञा रोमन कॅथॉलिकांना किंवा खिस्तशिष्यांचे ब्रीद मानणाऱ्या सर्वांना लावली जाते.

४१ १५ **मार्क्स** : (१८१८-१८८३). जर्मन राजकीय तत्त्वज्ञ 'कॅपिटल' व कम्युनिस्ट जाहीरनामा (एंगल्ससह) इत्यादी ग्रंथांचा लेखक. समाजवादी व साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रणेता.

४६ २ **पिरॅनीज** : फ्रान्स व स्पेन यांमध्ये २७० मैल पसरलेली पर्वतराजी.

४७ १४ **होमर** : खि. पू. ८५० च्या सुमारास आलेला ग्रीक महाकवी. 'इलियड' व 'ओडिसी' यांचा कर्ता.

**व्हर्जिल** : (खि. पू. ७०-१९) रोमन कवी. 'एनिड' या महाकाव्याचा कर्ता.

४७ १८ **आर्थरराजा** : सहाव्या शतकातील इंग्लिश राजा. टेनिसनने आपल्या काव्यात याचे अद्‌भुतरम्य चरित्र

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| | | वर्णिले आहे. तो प्रत्यक्षात होऊन गेला की नाही, याविषयी वाद आहे. |
| ४७ | २१ | **पार्थेनॉन** : ग्रीसमधील अथेन्सच्या ॲक्रॉपॉलिस या गढीत असलेले अथीना देवतेचे मंदिर. |
| ४८ | १ | **प्लेटो** : (खि. पू. ४२७-३४७) ग्रीक तत्त्ववेता. सॉक्रेटीसचा शिष्य. चाळीस वर्षे तत्त्वज्ञानाचे ज्ञानपीठ ईजिनामध्ये चालवले. |
| ४९ | १४ | **स्टॉइकपंथीय** : खि. पू. ३०८ मध्ये झेनो या ग्रीक तत्त्वज्ञाने अथेन्समध्ये स्थापलेला निसर्गवादी, स्थितप्रज्ञत्वाची साधना करणारा पंथ. |
| ५१ | ८ | **सॉक्रेटीस** : (खि. पू. ४७०-३९९) ग्रीक तत्त्वज्ञ. |
| ५२ | ६ | **लेनिन** : (१८७०-१९२४) रशियन साम्यवादी क्रांतीचा नेता. |
| ५२ | ७ | **जॉन डी. रॉकफेलर** : (१८३९-१९३७) अमेरिकन उद्योगपती. संपत्ती व दातृत्व यांसाठी महशूर. |
| ५२ | २३ | **लावासिये** आंत्वान लोरान : (१७४३-१७९४) फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ. |
| ५४ | १२ | **अनाक्झागोरस** : (खि. पू. ५००-४२८) ग्रीक तत्त्वज्ञ. पेरिक्लीज, युरिपिडीज व सॉक्रेटीस यांचा गुरू. 'पाखंडी' मतांमुळे मध्यवयातच कायम हद्दपार. |
| ५६ | ५ | **झरझिस** द ग्रेट : (खि. पू. ५१९-४६५) पर्शियाचा राजा. याने ग्रीसवर आक्रमण केले; पण ते टिकले नाही. |
| ५६ | १६ | **नेपोलियन** बोनापार्ट : (१७६९-१८२१) फ्रेंच सम्राट, जगप्रसिद्ध सेनानी. |

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| ५७ | ९ | **रॉबस्पियर** : (१७५८-१७९४). १७९१ मधील फ्रेंच क्रांतीचा नेता. क्रांतिविरोधक म्हणून हजारो लोकांना कंठस्नान घातले. अखेर इतर पुढाऱ्यांनी खुद्द रॉबस्पियरचा शिरच्छेद करविला. |
| ५७ | २२ | **कॅप्टन किड** : (१६४५-१७०१). स्कॉच दर्यावर्दी व चाचे लोकांचा प्रसिद्ध सरदार. |
| ५८ | १ | **वेनव्हेनुत्तो सेलिनी** : (१५००-१५७१). इटॅलियन सुवर्णकार व शिल्पकार. |
| ५८ | ८ | **मॉर्गन**, जॉन पिअरपॉट : (१८३७-१९३७). अमेरिकन भांडवलदार. |
| ५८ | १३ | **स्पिनोझा** बारुक (१६३२-१६७७). डच तत्त्वज्ञ. 'एथिक्स' हा ग्रंथ प्रसिद्ध. |
| ६० | ९ | बाख जॉन सेबॅस्टियन : (१६८५–१७५०). जगप्रसिद्ध जर्मन ऑर्गनवादक आणि संगीतकार. |
| ६० | २५ | **अथीनियन** : ग्रीसची राजधानी अथेन्स येथील रहिवासी. |
| ६१ | १ | **कोरिंथियन** : कोरिंथ या प्राचीन ग्रीक शहराचा रहिवासी. |
| ६२ | ५ | **मिल्टन जॉन** (१६०८–१६७४) इंग्रज महाकवी. 'पॅरेडाइज लॉस्ट'चा कर्ता. |
| ६२ | १८ | **'मजेतून सामर्थ्य'** : 'स्ट्रेंग्थ थ्रू जॉय'. |
| ६३ | ७ | **रेनेसांस** : युरोपीय संस्कृतीला मध्ययुग आणि आधुनिक युग यांना जोडणारा नवचैतन्याचा काळ (१४ वे शतक ते १६ वे शतक). |

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| ६६ | २१ | **अश्मयुग** : मानवी संस्कृतीचा पहिला ज्ञात टप्पा. ‘ब्राँझयुगा’पूर्वीचा. ओबडधोबड दगडी हत्यारे व वस्तू यांच्या वापराचा. |
| ६८ | ११ | **जेफर्सन टॉमस** : (१७४३-१८२६). अमेरिकेचा तिसरा राष्ट्राध्यक्ष. ब्रिटनबरोबर झालेल्या स्वातंत्र्य-युद्धातील एक बिनीचा नेता. |
| ७६ | ११ | **स्टॅखानोव्हाइट पद्धती** : रशियन खाणकामगार अलेक्झी ग्रिगॉरिविच स्टॅखनॉव्ह हा या पद्धतीचा प्रवर्तक होय. |
| ७९ | १२ | **नाझी** : आता विसर्जित झालेल्या नॅशनल सोशलिस्ट जर्मन कामगारपक्षाचा सदस्य. १९२१ मध्ये हिटलर या पक्षाचा नेता झाला. सर्वाधिकार-शाही व वर्णश्रेष्ठत्व यांचा पुरस्कार या पक्षाने केला. |
| ८० | ६ | **स्विस रॉबिन्सन** : ‘रॉबिन्सन क्रुसो’पासून स्फूर्ती घेऊन जे. आर. विस यांनी लिहिलेली ‘स्विस फॅमिली रॉबिन्सन’ ही जर्मन साहसप्रधान कादंबरी. |
| ८३ | १५ | **औद्योगिक क्रांती** : १७६० नंतर इंग्लंडांत औद्योगिक उत्पादनासाठी हाताने काम करण्याऐवजी शक्तीवर चालणाऱ्या यंत्रांचा वापर सुरू झाला, त्यामुळे समाजाच्या स्वरूपात झालेला सर्वांगीण पालट. |
| ८५ | १७ | **ग्लॅडिएटर्स** : उत्सवप्रसंगी शस्त्रांनी लढून लोकांचे मनोरंजन करणारे रोमन योद्धे. |
| ८५ | १९ | **झार निकोलस** : (पहिला; १७९६-१८५५) : रशियाचा बादशहा. |
| ८५ | १९ | **डोस्टोएव्हस्की** : फ्योदोर मिकायलोविच (१८२१-१८८१) : प्रसिद्ध रशियन कादंबरीकार. ‘क्राइम |

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| | | ॲंड पनिशमेंट'; 'ब्रदर्स कॅरमॅझॉव्ह' इत्यादी कादंबऱ्यांचा कर्ता. |
| ८५ | १९ | **बाकुनिन** : मिखाइल अलेक्झांड्रोविच : (१८१४-१८७६); रशियन अराजकवादी. |
| १०३ | ११ | **डस्ट बाउल** : अमेरिकेत कॅन्झस, टेक्सस, ओक्लाहामा इत्यादि राज्यांतील निर्जल प्रदेश. अवर्षण व धुळींची वादळे यांमुळे नापीक. |
| १०५ | ७ | **मुसोलिनी** बेनिटो : (१८८३-१९४५). इटालीचा फॅसिस्ट पंतप्रधान व सर्वाधिकारशहा. |
| १०७ | ५ | **कॅव्हेंडिश हेन्री** : (१७३१-१८१०). इंग्लिश शास्त्रज्ञ. |
| | | **फॅरेडे** हेन्री : (१७९१-१८६७). इंग्लिश. रसायन व भौतिकी-शास्त्रज्ञ. |
| | | **मेंडेल** ग्रेगर योहान : (१८२२-१८८४). ऑस्ट्रियन वनस्पतिशास्त्रज्ञ. |
| १०७ | ७ | **डार्विन** चार्लस रॉबर्ट : (१८०९-१८८२). इंग्लिश निसर्गशास्त्रज्ञ. उत्क्रांतिवादाचा प्रणेता. |
| ११५ | १५ | **वेल्स** एच. जी. : (१८६६-१९४६). इंग्लिश कादंबरीकार, इतिहासकार व समाजशास्त्रज्ञ. 'अदृश्य माणूस', 'द टाइम मशीन' इत्यादी कादंबऱ्यांचा व 'द आउटलाइन ऑफ हिस्टरी' इत्यादी ग्रंथांचा कर्ता. |
| ११६ | २२ | **न्यूटन** सर आयझॅक : (१६४२-१७२७). इंग्लिश गणिती व निसर्ग-तत्त्वज्ञ, गुरुत्वाकर्षणाचे नियम शोधून काढले. |

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| १२५ | १५ | **द अपोसल्स :** येशू ख्रिस्ताचे पहिले बारा शिष्य व अधिकृत उपदेशक. नव्या करारात त्यांच्याविषयीचा अध्याय आहे. |
| १२५ | २३ | **गॉस्पेल्स :** बायबलच्या नव्या कराराचे पहिले चार अध्याय. |

दा. क. १५८३६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७७०९२ वि: निबंध
REFBK-0015936

"आज आपण ज्या जगात आहोत, त्या जगात कल्याणकारक गोष्टी करण्याची शक्यता जवळजवळ अमर्याद आहे, परंतु अनिष्ट गोष्टी करण्याची शक्यताही तितकीच अमर्याद आहे. बाह्य निसर्गाचे 'अंतरंग' जाणण्याची व बाह्य निसर्गावर ताबा मिळवण्याची आपली कुवत आज अतिशय भयंकर कोटीला पोचलेली आहे. परंतु आपल्या अंतःकरणातील शक्तीचे ज्ञान करून घेण्याची कुवत त्याच्या जवळपासही कोठे पोचत नाही. आणि हेच माणसाला पडलेले सर्वात मोठे संकट आहे. मनोनिग्रहाविषयी नीतिशास्त्रज्ञ नेहमीच आग्रह ठेवीत आले आहेत. परंतु या निग्रहाला पूर्वी ज्ञानाची बैठक नव्हती. बहुतेक राजकारणी पुरुषांची किंवा अर्थशास्त्रज्ञांची मानवी गरजांच्या विषयी जी समज असते त्याहून अधिक व्यापक पायावर मानवी गरजांचे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न मी या व्याख्यानांतून केला आहे. कारण अशी सखोल समज आली तरच आपली स्वप्ने, जी आपल्या ज्ञानाने व तंत्रावरील प्रभुत्वाने आज आपल्या आटोक्यात आणून ठेवली आहेत; पण जी अद्याप आपल्या मूर्खपणामुळे स्वप्नेच राहिली आहेत, ती साकार करण्याचा मार्ग आपणास सापडेल."

—बर्ट्रांड रसेल

['शासनसंस्था आणि व्यक्ती'च्या समारोपातील शेवटच्या काही ओळी]

'शासनसंस्था आणि व्यक्ती' ही रसेल यांनी १९४८-४९ मध्ये गुंफलेली 'रीथ व्याख्यानमाला' होय. ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनचे—बी० बी० सी० चे—प्रवर्तक लॉर्ड रीथ यांच्या स्मरणार्थ १९४७ पासून ही वार्षिक व्याख्यानमाला सुरू झाली. दरवर्षी विद्येच्या क्षेत्रांतील एखाद्या नामवंत तज्ञाला विशिष्ट विषय देऊन नभोवाणीवर ही व्याख्यानमाला गुंफण्यासाठी पाचारण करण्यात येते.

समाज प्रबोधन संस्था

शासनसंस्था आणि व्यक्ती

बर्ट्रांड रसेल

भाषांतर : सुमन देवदत्त दाभोलकर

किंमत तीन रुपये